**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७२२

निर्णय दिनांक १६-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अजित मुरलीधरराव देशमुख,<br>व्दारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड,<br>बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा निवासी उपजिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | |
| २ जन माहिती अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी रो. ह. यो.<br>जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, बीड | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपजिल्हाधिकारी रो. ह. यो. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अजित मुरलीधरराव देशमुख हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी रो. ह. यो. श्री. रामराव रायभानजी देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय

अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी श्री. भगवान नारायणराव गुट्टे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जून २००५ पासूनच्या कालावधीपासून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ प्रमाणे केलेल्या कारवाई संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" या कायद्याच्या कलम ४ (१) प्रमाणे व सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रक क्र. केमाअ-२००५/प्र.क्र.१९०/०५१५ मंत्रालय मुंबई – ३२ दि. १८-०६-२००५ अन्वये १७ कामे सर्व प्राधिकरणांनी / आपल्या कार्यालयाने करणे बंधनकारक करण्यात आले होते. यासह केंद्र शासनाचा दि. २६ मे २००५ चा आदेशही आपणाकडे शासनाने दिलेले आहे. या १७ कामांची (आपण मुदतीत केलेल्या) परिपूर्ण माहिती मला मुद्दानिहाय फीस सह कळवावी. मला ही सर्व माहिती परिपूर्णरित्या पाहीजे आहे. कृपया अर्धवट माहिती देऊ नये. "
अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस दिनांक २४-०२-२००६ रोजी निर्गमीत केले आहे. यावरुन अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यास ते कितपत उत्सूक होते याचा अंदाज बांधता येतो. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस खालील प्रमाणे कळविले आहे.

" आपणास नेमकी कोणत्या शासकीय माहिती अधिकारी यांचेकडील माहिती आवश्यक आहे ती समजलेनंतर त्या माहितीचे पेजेसवरुन फीसची आकारणी करुन तसे

आपणांस कळविण्यात येईल. या कार्यालयातील शासकीय माहिती अधिका-यांची यादी आपले तोंडी विनंतीवरुन यापूर्वीच आपणांस पुरविण्यात आलेली आहे. "

अपिलार्थीस लिहिलेल्या या पत्रावरुन अपिलार्थीस माहिती पुरविण्यास जन माहिती अधिकारी यांनी नकार दिला हे म्हणणे जास्त संयुक्तीक ठरेल असे आयोगाचे मत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सदर अपिलावर दिनांक २७-०३-२००६ रोजी सुनावणी घेऊन दिनांक २८-०३-२००६ रोजी आपला या प्रकरणातील अंतीम निर्णय दिला व तो अपिलार्थीस दिनांक २९-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविला. या निर्णया-मध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे. अपिलार्थीचे अपील फेटाळून लावतांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये "माहिती" या शब्दाच्या व्याख्येत मोडत नसल्याने व अपिलार्थीस कोणते अभिलेखे हवे आहे याचा स्पष्ट बोध होत नसल्याने अपिलार्थीच्या अपिलामध्ये तथ्यांश आढळून येत नसल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना परिपूर्ण माहिती न दिल्याने त्यांच्या-वर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एकूण ३६ माहिती अधिकारी नेमले असून यापैकी १८ माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयात असून उर्वरीत १८ माहिती अधिकारी हे क्षेत्रीय स्तरावर कार्यरत आहेत. या अधिका-यापैकी जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व १८ अधिकारी व क्षेत्रीय स्तरावरील ८ अधिकारी अशा एकूण २६ अधिका-यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ मधील तरतुदीप्रमाणे करावयाची कारवाई पूर्ण केली आहे. या सर्व अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत १७ अभिलेख्यासंदर्भात माहिती प्रसिध्द केलेली आहे. उर्वरीत १० अधिका-यांकडून सदर काम अद्याप प्रलंबीत आहे. अधिनियमाव्दारे विहित केलेले १७ अभिलेखे उर्वरीत १० जन माहिती अधिका-यांकडून प्रसिध्द करण्याची येत्या १० दिवसात व्यवस्था करण्यात येईल. यासंदर्भात त्यांनी संबंधीत अधिका-यांना वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता येथे एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, जिल्हाधिकारी कार्यालयाला माहिती अधिकार अधिनियमाशी कोणतेही सोयरसुतक नाही. वास्तविकताः अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१) (ब) (क) व (ख) नुसार १५ ऑक्टोंबर २००५ पूर्वी सदर अभिलेखे प्रसिध्द करणे हे जिल्हास्तरावरील महसूल विभागाचे सार्वजनिक प्राधिकरण प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी यांची प्रमुख जबाबदारी आहे. तथापि या प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाने कोणत्याही प्रकारचा पुढाकार घेऊन स्वंयप्रेरणेने प्रसिध्द करावयाची माहिती प्रसिध्द केलेली दिसून येत नाही.

जिल्हाधिकारी कार्यालयाने या कायद्याची अंमलबजावणी करतांना त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिका-यांना मार्गदर्शन करुन त्यांच्या कार्यालयाची माहिती महसूल खात्याचे जिल्हास्तरावरील सार्वजनिक प्राधिकरण म्हणून एकाच पुस्तिकाव्दारे अथवा अन्य प्रकारे प्रसिध्द करणे हे कलम ४ (१) मधील तरतुदीमध्ये अभिप्रेत आहे. तथापि येथे जिल्हाधिकारी यांनी ३६ जन माहिती अधिका-यांच्या नेमणुका केल्या व त्यांचे कर्तव्य संपले अशा समजुतीत ते राहिले. सदर माहिती प्रसिध्द केल्याचा दिनांक संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही. एकंदरीत माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी करण्यामध्ये बीड जिल्हाधिकारी कार्यालयाने कमालीची उदासीनता दाखविल्याचे जाणवते. इतर जिल्हाधिकारी कार्यालयात याहून वेगळी परिस्थिती असेल असे महसूल अधिका-यांनी दिलेल्या माहितीवरुन वाटत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीचे विशेषतः कलम ४ च्या तरतुदीचे गांभीर्याने पालन केल्याशिवाय शासनाच्या दैंनदिन कारभारात पारदर्शकता येणे शक्य नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ च्या तरतुदीमध्ये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने, स्वंयप्रेरणेने काही माहिती घोषित करणे अभिप्रेत आहे. अशा प्रकारे घोषित करावयाच्या माहितीचा तपशिल कलम ४ (ख) मध्ये दिलेला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी निहाय अशा प्रकारची माहिती अधिनियमातील तरतुदीमध्ये अपेक्षित नसून जिल्हाधिकारी कार्यालयाने -- म्हणजेच सार्वजनिक प्राधिकरणाने -- ही माहिती एकत्रित स्वरुपात वेगवेगळ्या प्रकारे (कलम ४ (ब)) प्रसिध्द करणे येथे अभिप्रेत आहे. या प्रकरणी असे घडल्याचे आढळून येत नाही. स्वतः जिल्हाधिकारी यांनी या कामी पुढाकार घेतल्याशिवाय या कलमांतील तरतुदींचे पालन होणार नाही. उपरोक्त प्रकरणी बीड जिल्हाधिकारी कार्यालयाने दर्शविलेल्या उदासीनतेची आयोगाने नोंद घेतली असून सचिव (महसूल) यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना, माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे अनिवार्य असलेल्या

कलम ४ (१) नुसार करावयाची कारवाई केली आहे किंवा कसे याचा प्रथम आढावा घेऊन सदर माहितीचे प्रमाणकीकरण (Standardisation) आपल्या स्तरावर करावे व सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना त्यांच्या कार्यालयाने स्वंयप्रेरणेने घोषित करावयाची माहिती येत्या दीड ते दोन महिन्यात प्रसिध्द करण्यास भाग पाडावे. सदर माहिती नियमीत अद्यावत करणे अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक असल्याने ही माहिती प्रत्येक जिल्ह्याच्या, जिल्हाधिकारी कार्यालयाने स्वतः वेबसाईटवर उपलब्ध करुन देणे हे जास्त सोईस्कर पडेल असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत नाकारल्याचा वर उल्लेख केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती वेगवेगळ्या जन माहिती अधिका-यांकडून घेऊन द्यावयाची होती. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिका-यास माहिती पुरविण्यासाठी जे त्यांचे इतर सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत त्यांना देखील माहिती म्हणून समजावे अशी तरतूद आहे. अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत संपून आज रोजी दोन वर्षे तीन महिने इतका प्रदीर्घ कालावधी व्यपगत झाला आहे. एवढे असूनही अद्याप जन माहिती अधिकारी यांनी स्वंयप्रेरणेने घोषीत करावयाची माहिती तयार केली नाही ही बाब महसूल विभागास निश्चितपणे भुषणावह नाही यास कोणीही सहमत होईल. सदर माहिती इतका प्रदीर्घ कालावधी ओलांडल्यानंतरही तयार न करुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई आपल्या कृतीव्दारे सिध्द केली आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब सचिव (महसूल) यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी संबंधीत १० जन माहिती अधिकारी (जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड, तहसीलदार, संजय गांधी योजना बीड, तहसीलदार, बीड, पाटोदा, आष्टी, शिरुर, वडवणी, माजलगाव, परळी व धारुर)

यांच्यावर, त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल बेपर्वाईबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. त्याचबरोबर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतूद क्रमांक ४ (१) (ब) (क) व (ख) प्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्यामुळे ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीस खचितच पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, वर नमूद केलेल्या सर्व जन माहिती अधिका-यांना, त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक “ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ” या लेखाशीर्षाखाली, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एकाच हप्त्यामध्ये भरावी. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी जिल्हाधिकारी, बीड यांनी यथायोग्यरित्या करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठवावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व वरील निर्णयामध्ये नमूद केलेले संबंधीत १० जन माहिती अधिकारी यांचेवर सचिव (महसूल) यांनी या प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी व वरील निर्णयामध्ये निर्देशीत केलेले १० जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये माहिती न पुरविल्या-बद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात उल्लेख केल्याप्रमाणे करावा.

५.	सदर शास्तीची जन माहिती अधिकारीनिहाय विभागणी जिल्हाधिकारी, बीड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करुन तदनंतर ७ दिवसाच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )
दिनांक	१६-०१-२००८	राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. अजित मुरलीधरराव देशमुख, व्दारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड

२	जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी रो. ह. यो. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	सचिव, (महसूल), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८२७

निर्णय दिनांक  १६-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे,<br>माणिकनगर, माणिक चौक,<br>उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. संतोष गजानन शेलार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांचे प्रतिनिधी वरिष्ठ लिपीक श्री. केंद्रे शत्रुघ्न सखाराम हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ०१ जानेवारी १९९५ ते जून २००६ पर्यतच्या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील विविध प्रकारच्या कामाची माहिती त्यांच्याकडून खालील प्रमाणे मागितली होती.

“ माहितीचा अधिकार २००५ च्या अधिनियमातील कलम ४ (१) (ब) नुसार कार्यवाही करुन विविध प्रकारच्या १७ बाबींवरील प्रसिध्द केलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. उस्मानाबाद जिल्ह्यातील रस्ते, पूल, इमारती बी. ओ. टी. तत्वावर करण्यात आलेले आहेत त्याची निविदा प्रक्रिया व निविदा मंजुरीची माहिती पहावयाची असून पाहणी करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती घ्यावयाच्या आहेत.

रस्ते, पूल बांधणे, रस्त्याची व इमारतीची दुरुस्ती, मजबुतीकरण करणे यासह खात्याच्या वतीने सन २००१ पासून आजपर्यत केलेल्या सर्व कामांची व त्यावरील खर्च झालेल्या निधीची आकडेवारी देण्यात यावी. सदरील माहिती ही प्रत्येक कामाची व त्यावर खर्च झालेल्या निधीची द्यावी.

तसेच १९९५ पासून आजपर्यत जाहीर निविदा प्रसिध्दीकरण केल्याच्या जाहिरातींची माहिती देण्यात यावी. जाहिरात कोणत्या राज्यस्तरीय, विभागीय व जिल्हास्तरीय दैनिक व साप्तहिक वृत्तपत्रास दिली, त्यांनी जाहिरात किती आकारात छापली, त्यांच्या बीलाची रक्कम व प्रत्यक्ष बील अदा केल्याची रक्कम आदी माहिती देण्यात यावी. जाहिरातीच्या मूळ प्रतीच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. खात्याच्या वेबसाईटवर प्रसिध्द केलेल्या जाहिरातींची संख्या व वेबसाईटवर जाहिरात कोणत्या ठिकाणी प्रसिध्द केली त्याची माहिती देण्यात यावी आणि या जाहिरातीचा मजकूर सीडीमध्ये देण्यात यावा. तसेच आपल्या कार्यालयाच्या संगणकातील संपूर्ण डाटा सीडीमध्ये देण्यात यावा.

तरी संबंधीत माहिती पाहण्यासाठी व झेरॉक्स करुन घेण्यासाठी तसेच सीडीसाठी होणारा खर्च मी भरण्यास तयार आहे. तेव्हा वरील सर्व कागदपत्रे, माहिती, सीडी मला उपलब्ध करुन द्यावी ही विनंती. "

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस असे कळविले आहे की, त्यांनी मागणी केलेल्या ०१ जानेवारी १९९५ ते जून २००६ पर्यतच्या कालावधीतील त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर माहितीची पाहणी करण्यासाठी या कार्यालयातील श्री. वाघमारे एस. एस. वरिष्ठ लिपीक यांच्याशी संपर्क करुन आवश्यक ती माहिती प्राप्त करणे सोईस्कर होईल व अपिलार्थीने केलेली मागणी पूर्ण करणे सुलभ होईल.

जन माहिती अधिकारी यांनी पत्रात सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी त्यांचे कार्यालयात दिनांक ११-०९-२००६ रोजी उपस्थित झाले व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची पाहणी केली व सदर पाहणी करुन त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीने मागणी केल्यावरुन अपिलार्थीस सदर कागदपत्राच्या प्रती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये ३०६ /- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. याचबरोबर या पत्रामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती काढण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याचेही त्यांनी अपिलार्थीस कळवून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना पाहण्यासाठी पुनश्चः उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली.

अपिलार्थी यांनी तदनंतर आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात न भरता, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये आपला निर्णय पारीत केला. सदर निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे निर्देश देऊन हे अपील कार्यकारी अभियंता यांच्या जबाबदारीवर निकाली काढल्याचे म्हटले आहे. सदर अपील सुनावणीस जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना निमंत्रित केले नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता अपिलावर परस्पर निर्णय घेतल्याचे अपिलार्थी यांनी आज (१६-०१-२००८ रोजी) आयोगास पाठविलेल्या फॅक्स संदेशावरुन सिध्द होते. अपिलाची सुनावणी कशी असू नये याचे हे प्रकरण म्हणजे उत्तम उदाहरण आहे. अपिलावर निर्णय घेण्यासाठी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या प्रकरणी सदर निर्णयावर जन अपिलीय अधिकारी यांची सही नसून त्यांचेकरिता त्यांच्या कार्यालयातील दुय्यम दर्जाच्या अधिका-याने त्यावर सही केली आहे. अपिल निर्णय पारित करीत असतांना जो अधिकारी निर्णय घेतो त्यानेच आदेशावर सही करणे हे आदेश वैधतेचे दृष्टीने आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक ०२-१२-२००६ रोजीच्या निर्णयापुर्वीच अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१२-२००६ रोजी व्दितीय

अपील केले आहे.  या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे व आज रोजी त्यांच्या आयोगास प्राप्त झालेल्या फॅक्समधील त्यांचे म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजण्यात येत आहे.  आयोगाकडे सादर केलेल्या फॅक्समध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट स्वरुपाची असून अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ च्या तरतुदीनुसार प्रसिध्द करावयाच्या १७ बाबीवरील माहिती प्राप्त झालेली नाही.  संगणकातील माहितीची सीडी त्यांना देण्यात आलेली नाही व कामाची व त्यावरील खर्चाची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नसल्याचे म्हटले आहे.  या पत्रामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासंदर्भात दिरंगाई व उदासीनता दाखविली असल्याची दखल घेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठ्या प्रमाणात असल्यामुळे अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे.  त्यांच्या सुचनेनुसार अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात दिनांक ११-०९-२००६ रोजी उपस्थित झाले व त्यांनी संबंधीत नस्तीमधील काही कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या.  सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये ३०६ /- भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले.  अपिलार्थीने सदर शुल्क न भरता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे परस्पर

दिनांक २६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीस उर्वरीत माहिती विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, ते अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येईल की, अपिलार्थीने या प्रकरणी मागितलेली माहिती सर्वसाधारण स्वरुपाची असून त्यांनी विशिष्ट अशी कोणतीही मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेली नाही. त्यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड स्वरुपाची असून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील जवळ जवळ सर्व कागदपत्राची माहिती मागविल्याचे येथे दिसून येते. सदर माहितीच्या झेरॉक्स प्रती काढून त्या अपिलार्थीस पुरविणे जन माहिती अधिकारी यांना आवश्यक त्या निधी अभावी शक्य नसल्याने त्यांनी सदर माहिती पाहण्यासाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांचे पत्र प्राप्त झाल्यानंतर सुमारे दीड महिना इतक्या कालावधीने ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले. प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना, त्यांनी निवडलेली माहिती देण्याची तयारी दर्शविली व त्याप्रीत्यर्थ रुपये ३०६ /- इतके शुल्क भरण्यास सांगितले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क त्यांचे कार्यालयात न भरता जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक २६-१०-२००६ रोजी सरळ प्रथम अपील केले. अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी लावलेल्या विलंबामुळे अपिलार्थी हे माहिती मिळण्यासाठी कितपत गंभीर होते याबाबत आयोगास शंका आहे. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे त्यांच्या आदेशात सूचित केल्यावरुन नंतर जन माहिती अधिकारी यांनी काही माहिती अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००७ रोजी उपलब्ध करुन

दिली. तथापि ही माहिती प्राप्त करुनही अपिलार्थीस अद्यापही १७ बाबीवरील प्रसिध्द केलेली माहिती देण्यात आली नसल्याचे त्यांचे म्हणणे अपिलार्थीने आयोगासमोर सादर केलेले आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे. याचबरोबर खात्याच्या वतीने पूर्ण करण्यात आलेल्या कामावरील खर्चाबाबतची माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नसल्याचे दिसून येते. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती विलंबाने पुरविल्याचे या ठिकाणी दिसून येत आहे. या ठिकाणी अपिलार्थीने त्यांना, त्यांच्या कार्यालयातील संगणकातील संपूर्ण डाटा पुरविण्याची मागणी केली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या या माहितीचे स्वरुप पूर्णतः मोघम असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे आवश्यक नाही. तथापि जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती का देऊ शकले नाहीत याचाही विचार करणे आयोगास आवश्यक वाटते किंबहुना याचा विचार न करता जन माहिती अधिकारी यांचेवर दोषारोपण केल्यास तो त्यांच्यावर एक प्रकारे अन्याय केल्यासारखे होईल असे आयोगास वाटते. या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप व जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता लागणा-या निधीची कमतरता पाहता यामध्ये अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी मुद्दाम अथवा कोणत्याही असद्‌हेतुने टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी सकारात्मक प्रतिसाद विहित मुदतीत जरी दिला असला तरी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिली व व्यक्तिशः माहिती मागवून अपिलार्थी माहिती पाहण्यासाठी विलंबाने उपस्थित होतात या दोन्ही बाबी लक्षात घेण्यासारख्या आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी आता द्यावयाची उर्वरीत माहिती (संगणकातील माहितीची सीडी वगळता) हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये कोठेही, मागण्यात येणा-या माहितीच्या व्याप्तीवर व आकारमानावर कोणतेही बंधन नाही. जरी मागण्यात येणा-या माहितीच्या आकारमानावर कोणतेही बंधन नसले तरीही माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या काही मानवी मर्यादा असू शकतात हे येथे विसरुन चालणार नाही किंबहुना याचे मूलतः भान ठेवूनच अपिलार्थीच्या व्दितीय अपिल अर्जावर निर्णय घ्यावा लागेल. याच अपिलार्थीने शासनाच्या १६ कार्यालयाकडून २३ अर्जाव्दारे अशीच भरपूर व्याप्ती असलेली माहिती मागविली आहे. माहितीच्या प्रचंड व्याप्तीमुळे (या प्रकरणी अपिलार्थीने एकूण १० वर्षाची माहिती मागविली आहे) अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांना माहिती देणे शक्य होत नाही तदनंतर जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे अपिल करण्याची तसेच एकाही अपील सुनावणीस हजर न राहण्याच्या अपिलार्थी यांच्या कार्यपध्दतीची आयोगाने सखेद नोंद घेतली असून, माहिती मागतांना त्यांनी यापुढे विवेक बाळगावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अशा प्रवृत्ती जर यापुढे बळावत राहिल्या तर माहिती अधिकाराचे शस्त्र बोथट होईल यात शंका नाही. असे प्रकार पाहिले असता मागण्यात येणा-या माहितीच्या आकारमानावर / व्याप्तीवर काही बंधने घालण्यासंबंधी अवश्य विचार करावा लागेल हे मत येथे मुद्दाम नोंदवून ठेवण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी आता द्यावयाची उर्वरीत माहिती निर्णयामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक १६-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, माणिकनगर, माणिक चौक, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८२८

निर्णय दिनांक १६-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. नळगीरकर शेषराव दिगंबरराव,<br>३०१, श्रीकृष्ण, क्रांतीनगर, निडेबन,<br>तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, लातूर | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,<br>लातूर विभाग, लातूर | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नळगीरकर शेषराव दिगंबरराव व त्रयस्त पक्ष म्हणून आमंत्रित केलेले सचिव, संस्कार शिक्षण संस्था उदगीर हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी अधीक्षक वर्ग-२ श्री. पवार अमोल श्रीधर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल)

व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर श्री. सय्यद जियाउल्ला खतीब (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे संस्कार शिक्षण संस्था उदगीर अंतर्गत शांती निकेतन विद्यालय कोदळी तालुका उदगीर या शाळेचे नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळ रावणकोळा तालुका मुखेड जिल्हा नांदेड या संस्थेकडे झालेल्या हस्तांतरणाविषयीच्या कागदपत्राची खालीलप्रमाणे सन १९९६-९७ या कालावधीची माहिती मागितली होती.

> “ संस्था हस्तांतरणात लेखी दिलेली व इतर सर्व कागदपत्रांचा संपूर्ण बंचच्या साक्षांकीत प्रती. ”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्राच्या दोन प्रती आयोगासमोर आल्या असून एकाच क्रमांकाचे सदर पत्र हे दिनांक ३१-०७-२००६ व २९-०७-२००६ रोजी पाठविल्याचे या ठिकाणी दिसून येते. एकाच पत्राला दोन क्रमांक देण्याचा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांचा काय उद्देश आहे हे आयोगास समजून येत नाही. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात, संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक हे माहिती अधिकारी असल्याने त्यांच्याकडे या कागदपत्राची मागणी करावी असे अपिलार्थीस सूचित केले आहे. या पत्राची प्रतिलिपी मुख्याध्यापक शांतीनिकेतन विद्यालय कोदळी तालुका उदगीर यांना देऊन अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती त्यांना देण्याचे मुख्याध्यापक यांना सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सुनावणी न घेण्याचे कारण जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी ही सुनावणी घेतली नाही असे सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१२-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या माहितीच्या व अपील अर्जावर निर्णय घेतला नसल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, शाळेचे एका संस्थेकडून दुस-या संस्थेकडे करावयाच्या हस्तांतरण संदर्भातील सर्व कागदपत्रे शिक्षण उप संचालक अथवा संबंधीत शाळेकडे उपलब्ध असतात. अशा प्रकारच्या शाळेच्या एका संस्थे-कडून दुस-या संस्थेकडे हस्तांतरण प्रक्रियेमधील कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात कोणत्याही प्रकारे प्राप्त होत नाहीत. सदर प्रक्रिया उपसंचालक स्तरावरुन केली जाते. प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीचा अर्ज

त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकास, जे या प्रकरणी प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी आहेत त्यांना ही माहिती अपिलार्थीस देण्याचे त्यांनी सूचित केले व त्याची प्रत मुख्याध्यापक शांतीनिकेतन विद्यालय कोदळी तालुका उदगीर यांना दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने हीच माहिती त्यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये मागितली होती. सदर पत्राचे त्यांनी दिनांक १७-०१-२००६ रोजी अपिलार्थीस उत्तर दिले होते. अपिलार्थीच्या या माहितीच्या मागणीसाठी पूर्वीच्या पत्रान्वये त्यांनी कारवाई केली असल्यामुळे व अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही. आज रोजी त्यांच्याकडे शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांचेकडून अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद लक्षात घेता, सर्व प्रथम अपिलार्थीने ही माहिती चुकिच्या प्राधिकरणाकडे मागितली होती. सदर माहितीसाठीचा अर्ज, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) च्या तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत प्राधिकरणाकडे पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस देणे अभिप्रेत आहे. या ठिकाणी त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कृती केली आहे. या ठिकाणी ते अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्याकरिता मुख्याध्यापक शांतीनिकेतन विद्यालय कोदळी यांच्या कार्यक्षमतेवर जास्त अवलंबून राहिले. जन माहिती अधिकारी स्वतः शिक्षणाधिकारी असल्याने त्यांना ही माहिती शिक्षण उपसंचालकाच्या कार्यालयाकडूनही प्राप्त करुन घेता येते हे माहीत असूनही त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाची प्रत शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे पाठविला नाही. थोडक्यात अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे

अतिरिक्त सकारात्मक प्रयत्न केले नसल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी, केवळ ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही म्हणून सुनावणी घेतली नाही व अपिलार्थीस याच माहिती संदर्भात पूर्वी मार्गदर्शन केले असल्यामुळे त्यांना आता अपिलाची सुनावणी घेतली नाही ही त्यांची कृती बरोबर नाही. अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे अपील केल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर आपला निर्णय पारीत करणे गरजेचे होते तथापि अशी कोणतीही कृती त्यांनी केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. गेल्या वर्षभरात आयोगाकडे शिक्षण विभागाच्या ज्या ज्या सुनावण्या झाल्या त्या त्या सुनावण्यामध्ये शिक्षण विभागाचे उपसंचालक, संचालक वा शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावर कोठेही सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत केल्याचे आयोगास आढळून आले नाही. शिक्षण विभागाच्या गलथान व अकार्यक्षम कारभारावर आयोगाने वेळोवेळी ताशेरे ओढून व सर्व संबंधितांना सूचना देऊन देखील अद्यापावेतो शिक्षण विभागाच्या अधिका-यांच्या कार्यपध्दतीमध्ये कोणताही सकारात्मक बदल झाल्याचे आयोगास आढळून येत नाही. माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीकरिता संबंधितांना शिक्षण देण्याकरिता वेळोवेळी कार्यशाळा व शिबीरे आयोजीत करण्याच्या सूचना देखील शिक्षण संचालक व सचिव (शालेय शिक्षण) यांना दिलेल्या आहेत. तथापि या सुचनांचे अनुपालन केले गेले किंवा कसे हे आयोगास ठाऊक नाही. सद्यस्थितीत आयोगासमोर येणा-या शिक्षणाधिका-यांचा युक्तिवाद पाहता त्यांना अद्यापही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे पुरेसे ज्ञान नसावे किंवा या तरतुदींची ते जाणीवपूर्वक अंमलबजावणी करत नसावेत हे दोनच पर्याय या खात्यासंदर्भात विचारार्थ दिसून येत आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आज विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्याकडे तयार असल्याचे त्यांनी सांगितले. सदर माहितीचे अवलोकन

करता अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी ही माहिती सर्वसाधारणपणे सुसंगत वाटते. सदर माहिती तयार असल्याचे पत्र विभागीय शिक्षण उपसंचालक औरंगाबाद विभाग यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-०३-२००६ रोजी पाठविले असून, या पत्रामध्ये त्यांनी, अपिलार्थीने मागितलेल्या माहिती पोटी रुपये ८८ /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन न देता त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस रुपये ८८ /- भरण्याची विनंती करणे आयोगास मान्य नाही. विहित मुदत आता संपली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरवावी लागेल.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांच्याकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती आता प्राप्त करुन घेतली असल्यामुळे ती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. मुख्यध्यापक शांतीनिकेदन विद्यालय कोदळी तालुका उदगीर यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केला असल्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा

आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

अपिलार्थीस माहिती मिळण्याप्रीत्यर्थ संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही अतिरिक्त सकारात्मक प्रयत्न न करुन त्यांच्या कार्यशैलीतील बेपर्वाईचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची नोंद शिक्षण संचालक, पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. विभागीय शिक्षण उप संचालक, लातूर यांनी, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत मुख्याध्यापक शांतीनिकेतन विद्यालय कोदळी तालुका उदगीर जिल्हा लातूर यांनी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये माहिती न पुरविल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न

झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

औरंगाबाद
दिनांक १६-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नळगीरकर शेषराव दिगंबरराव, ३०१, श्रीकृष्ण क्रांतीनगर, निडेबन, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ मुख्याध्यापक, शांतीनिकेतन विद्यालय, कोदळी, तालुका उदगीर जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, संस्कार शिक्षण संस्था, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर)

५ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८०१
निर्णय दिनांक- १६ जानेवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.शिरीष भास्कर साठ्ये,<br>२, ''दर्पण'' मालकंस अपार्टमेंटसमोर,<br>कॉलेज रोड, नाशिक-५. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>झोपडपट्टी सुधारणा अधिकारी,<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>आयुक्त,<br>नाशिक महानगरपालिका, नाशिक. | | |

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १६-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.शिरीष भास्कर साठ्ये (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी झोपडपट्टी सुधारणा अधिकारी, नाशिक महानगरपालिका नाशिक, श्री. हांडोरे दत्तात्रय नामदेव (यापुढे त्यांना जनमाहिती

अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १७-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९१ ते २००६ या कालावधीतील त्यांच्या मालकीच्या प्लॉटवरील झोपडपट्टी हटविण्याच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याची खालील प्रमाणे विचारणा केली .

''१) मे.सहाय्यक संचालक, नगररचना, नाशिक महानगरपालिका यांनी मा.झोपडपट्टी सुधारणा अधिकारी, नाशिक महानगरपालिका, यांना त्यांचे पत्र क्र.नगररचना/वशि/टीपी/२/८२ दि.४-५-२००० अन्वये पत्र पाठवून कळविले की, '' न.र.यो.क्र.२ हीची अंमलबजावणी १-१-८६ पासून चालू झाली आहे व तिचे कलम ८८ अन्वये जागा मालकास अंतिम भूखंडाचा खुला कबजा द्यावयाचा आहे. मूळ भूखंड क्रं.१५७-अ हा लोणारी यांचे मालकीचा असून त्यात काही प्रमाणात व लगतच्या १२ मीटर (४० फूट) रस्त्यावरही काही प्रमाणात झोपडपट्टी झाली आहे, ती हलवावी.''

सदर पत्रावर झोपडपट्टी सुधारणा अधिका-यांनी पुढे काय कारवाई केली? सदर फाईलची टिपणे व शेरे याच्या झेरॉक्स प्रती मिळाव्यात.

२) दिनांक- १०-०७-९१ रोजी मे.विभागीय अधिकारी, अतिक्रमण व स्लम निर्मूलन अधिकारी, तसेच दि. २९-१२-९७ रोजी मे. उप आयुक्त, अतिक्रमण निर्मूलन, नाशिक महानगरपालिका, यांना पत्र, फोटो देऊनही टी.पी. स्कीममधील ४० फूटी रस्त्यावरील मंदीरे, टप-या हटविलेल्या नाहीत. सदर

पत्रांवर पुढे काय कारवाई झाली, त्या फाईलमधील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती मिळाव्यात.''

अपिलार्थीचा सदर अर्ज दिनांक- १७-०१-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाला. अपिलार्थीने येथे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतूदीनूसार केलेल्या प्रपत्रावर माहितीसाठीचा अर्ज केला नाही, याची नोंद घेण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक-२३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे प्रतिसाद दिला.

'' उपरोक्त संदर्भीय अर्जान्वये आपणास कळविण्यात येते की, नगररचना योजना क्र.२ नूसार सर्व्हे नं. ६१५ पार्ट मधील अंतीम भूखंड १०३, १०४ अ, १०४-ब क्षेत्रावर सहवासनगर झोपडपट्टीचे विकासाचे काम कार्यान्वीत असून, वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

सिटी सर्व्हे नं.७२७९/२ व फायनल प्लॉट नं.१०५ ब हे क्षेत्र खाजगी जागेवर असून, मंदिर, टप-या व इतर अतिक्रमण हटविणे, काढणेबाबत- धोरणात्मक निर्णय घेणे कार्यान्वीत आहे.

उपरोक्त क्षेत्राबाबतची मुळनस्ती आपण इकडील कार्यालयात प्रत्यक्ष संपर्क साधून बघितली आहे व आपले समाधान झाले आहे. आपणास मुळ नस्तीच्या टिपणी व शेरे यांच्या छायांकित प्रतीची आवश्यकता नाही असे आपण सांगितले आहे.

दि. १०-७-१९९१ व २९-१२-१९९७ रोजीचा आपला अर्ज अतिक्रमण विभागाशी संबंधीत असल्याने आपणास आवश्यकती माहिती मिळणेकामी अतिक्रमण विभागाशी संपर्क साधावा ही विनंती.

सबब सदरचा अर्ज इकडील विभागाकडून निकाली काढणेत आला आहे, याची नोंद घ्यावी.''

अपिलार्थीस पुरविलेल्या वरील माहितीवरुन असे दिसून येईल की, अपिलार्थीच्या मालकीच्या प्लॉटच्या संबंधीत अभिलेख्याची टिपणी व शे-यांची झेरॉक्सप्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०२-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन, या प्रकरणी आपले अंतिम आदेश दिनांक- २६-०५-२००६ रोजी पारीत केले आहेत. सदर आदेशामध्ये त्यांनी कार्यकारी अभियंता, नगररचना व उप-आयुक्त, अतिक्रमण यांनी आवश्यक ती कार्यवाही करुन अर्जदारास १५ दिवसाचे मुदतीत यथायोग्य उत्तर देण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २२-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ३० दिवसाच्या आत माहिती दिली नाही. अपिलार्थीस माहितीच्या कागदपत्राची आवश्यकता नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा अर्ज निकाली काढला व अद्यापही त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आज झालेल्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, नाशिक महानगरपालिका नाशिक च्या कार्यक्षेत्रामधील सर्व्हे नंबर ६१५/२/३, मध्ये फायनल प्लॉट क्रमांक १०५-ब हा त्यांच्या मालकीचा असून त्या प्लॉटवर काही

झोपडपट्टीवासीयांनी अतिक्रमणे केली आहेत. टाऊनप्लॅनिंग ॲक्ट १९६६ मधील कलम ८८ प्रमाणे सदर प्लाट टाऊनप्लॅनींग स्कीम क्रमांक- २ मध्ये आहे. सदर क्षेत्राकरिता टाऊनप्लॅनिंग स्कीम मंजूर झाली असल्यामूळे व हा प्लॉट त्यांच्या मालकीचा असल्याने महानगरपालिकाने त्यावरील अतिक्रमण काढून तो त्यांना हस्तांतरीत करणे गरजेचे आहे. नाशिक महानगरपालिकने त्यांना त्यांच्याकडील दिनांक- ०५-०९-१९९१ च्या पत्रान्वये सदर प्लॉट हस्तांतरण करण्याचे आश्वासन दिले आहे. या संदर्भात महानगरपालिकेकडे पाठपूरावा करीत असतांना त्यांनी सहाय्यक संचालक, नगररचना व महानगरपालिकेच्या अधिका-याकडे पत्रव्यवहार केला या पत्रव्यवहारा संबंधात काय कार्यवाही झाली याची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. थोडक्यात अपिलार्थीस त्यांनी महानगरपालिका कडे पाठविलेल्या दिनांक- १०-०७-१९९१ रोजीच्या, २९-१२-१९९७ रोजीच्या अर्जा संबंधात काय कार्यवाही झाली, हे जाणून घ्यावयाचे आहे. तव्दतच सहाय्यक संचालक नगररचना यांनी झोपडपट्टी सुधारणा  अधिकारी यांना दिनांक- ०४-०५-२००० च्या पाठविलेल्या पत्रावर झालेल्या कार्यवाही संदर्भातील नस्तीचे उतारे, टिपणी व अभिप्राय अपिलार्थीस हवे आहेत, असे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागीतलेल्या मूळ माहितीच्या अर्जा संदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनाक- १३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ते ७ दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे युक्तीवाद करण्यास त्यांचे कोणतेही प्राधिकृत प्रतिनिधी हजर नाहीत, याची येथे सखेद नोंद घेण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक हे आयोगाच्या सुनावणीसाठी नेहमीच गैरहजर असल्याचे आयोगास आढळून आले आहे. त्यांच्या आयोगाच्या सुनावणीस गैरहजर राहण्याच्या

सवयीची आयोगाने गांर्भीयपूर्वक नोंद घेतली असून या प्रकरणी मुख्य सचिव, महाराष्ट्रराज्य यांनी त्यांना राज्य माहिती आयोगाकडे ज्या ज्या वेळी त्यांना सुनावणीसाठी बोलाविण्यात येईल, त्या त्या वेळी आयोगाच्या विनापरवानगी गैरहजर राहू नये, अशा अर्थाच्या सूचना द्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा उशिराने प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज दिनांक- १७-०१-२००६ रोजी केलेला असल्याने अधिनियमातील तरतुदीनूसार अपिलार्थीस त्यांच्या अर्जा सबंधातील निर्णय दिनांक- १६-०२-२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे भाग होते. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीपेक्षा २५ दिवसाच्या विलंबाने प्रतिसाद दिल्याचे येथे दिसून येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संबंधीत नस्तीची टिपणी व शेरे व इतर कागदपत्राची झेरॉक्सप्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागविल्या आहेत तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशा प्रकारच्या कोणत्याही कागदपत्राच्या प्रती न पुरविता त्यांच्याकडील दिनांक- १३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये मोघम स्वरुपाचे उत्तर दिले आहे. अपिलार्थीने या ठिकाणी उपस्थित केलेला प्रश्न जन अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक त्या गार्भीयांने घेतला नसल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, खाजगी जागेवरील झोपडपट्‌टी महानगरपालिका उठवित नाही, त्यावर धोरणात्मक निर्णय घेणे भाग आहे, असे झोपडपट्‌टी सुधारणा अधिका-यांनी त्यांना कळविले आहे. परंतू अपिलार्थी सोडून इतर खाजगी जागेवरील झोपडपट्‌टी मात्र महानगरपालिकेने उठविल्या आहेत. महानगरपालिकेच्या कार्यपध्दतीतील या विसंगतीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये बोट ठेवले असून त्यांच्या मालकीच्या प्लॉटवरील झोपडपट्‌टी

न उठविण्याची कारणे त्यांना हवी आहेत. सदर कारणे संबंधीत कागदपत्राच्या नस्तीवरुनच कळू शकतील, हे उघड आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या सर्व अर्जावर नाशिक महानगरपालिकेने नेमकी काय कार्यवाही केली आहे. हे संबंधीत प्रकरणाच्या नस्तीचे अवलोकन केल्यानंतर अपिलार्थीस समजू शकेल. सबब अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या अर्जा संबंधात महानगरपालिकेकडे तयार झालेल्या नस्तीमधील सर्व कागदपत्रांच्या प्रती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे भाग आहे. अपिलार्थीस माहिती देण्याची मुदत आता व्यपगत झाली असल्याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) च्या तरतुदीनूसार, सदर माहिती, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल.

या प्रकरणी अपिलार्थीपासून कोणतीही माहिती असद्हेतूने लपविण्याची किंवा ती देण्यास टाळाटाळ करण्याचा जन माहिती अधिकारी यांचा हेतू निःसंशयपणे सिध्द झाला नाही परंतू अपिलार्थीचा अर्ज नीट न वाचून अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा पुरेशा प्रमाणात स्पष्ट केल्याचेही त्याच बरोबर सिध्द होत आहे. आपल्या कार्यशैलीतील त्यांनी दर्शविलेल्या अशा प्रकारच्या कर्तव्यपराणतेच्या अभावाबद्दल व बेजबाबदार वृतीबद्दल ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशीत करण्यात येत आहे की, आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी वरील प्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यदक्षतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानूसार हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत आवश्यक ती कार्यवाही करुन तद्नंतर आपला अनुपालन अहवाल १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी

केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यात यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानूसार हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत यथायोग प्रशासकीय कार्यवाही करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- १६-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.शिरीष भास्कर साठ्ये, २, 'दर्पण' मालकस अपार्टमेंट समोर, मलेरिया बस स्टॉपजवळ, कॉलेजरोड, नाशिक-५.
२. जनमाहिती अधिकारी तथा झोपडपट्‌टी सुधारणा अधिकारी, नाशिक महानगरपालिका नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका,नाशिक,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८०२
निर्णय दिनांक-१६ जानेवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जयदेव गंगाराम पाटील<br>राहणार-शेवगे प्रगणे बहाळ<br>पो.मुंदाणे, तालूका- पारोळे<br>जि.जळगांव | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>गटविकास अधिकारी, पंचायत<br>समिती पारोळा, ता.पारोळा जिल्हा-<br>जळगांव. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हापरिषद, जळगांव. | : | |
| | प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | ग्रामविकास अधिकारी, ग्रा.पं.शेवगे |
| | प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी | : | गटविकास अधिकारी, पं.स.पारोळे |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १६-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.जयदेव गंगाराम पाटील(यापुढे त्यांना

अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जनमाहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंयायत समिती पारोळे यांचे प्रतिनिधी वरिष्ठ लिपीक, श्री. मिलिंद गंगाधरराव पवार, हे हजर आहेत. तर जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगांव (या पुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १७-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगांव यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

“ आपण आपले कडील जा.क्र./ वि.अ.१३/ आर.आर./४१०/०५, जळगांव दि.२०-०६-०५ अन्वये मौजे शेवगे प्र.बहाळ ता.पारोळा येथील नियमबाहय ठराव रद्द करणेचे आदेश ग्रामपंचायतीस दिलेने, सरपंच शेवगे प्र.बहाळ ता.पारोळा यांनी दिनांक- २५-०१-२००६ रोजी मिटींग घेवून दिनांक- २८-११-१९८६ चा ठराव रद्द केलेला आहे आणि त्याच्या नकला पण आपले कडून पाठविण्यात आलेल्या आहे म्हणून मला आपले कडून खालील प्रमाणे माहितीची आवश्यकता आहे.

१) दिनांक- २८-११-१९८६ चा ठराव मोघम स्वरुपाचा असल्यास दि ३०-१२-९४ चा ठराव हा पण मोघम स्वरुपाचा आहे अथवा कसे ?

२) दि. ३०-१२-९४ च्या ठरावाची माहिती आपणास होती अथवा कसे ?

३) दि. २८-११-१९८६ चा ठराव मोघम स्वरुपाचा असले बद्दल आपणास कधी समजले आणि दि ३०-१२-९४ चा मोघम स्वरुपाचा आपणास न समजणेचे कारण?

४) दि २८-११-१९८६ चा ठराव रद्द केले नंतर ज्यांना ग्रामपंचायतीच्या दैनंदीन खर्चासाठी जागा देण्यात आल्या व ज्यांनी आपली कच्ची पक्की घरे बांधुन घेतलेली आहे ती बांधलेली घरे कायदेशिर ठरतात अथवा बेकायदेशीर ठरतात.

५) मोघम व बेकायदेशिर ठरावास एकटा ग्रामसेवकच जबाबदार ठरतो सरपंच आणि सभासद जबाबदार ठरत नाही अथवा कसे ? याची माहिती

६) बांधण्यात आलेली घरे काढुन टाकणे अथवा नियमीत करणे कामी आपण कार्यवाही करणार अथवा कसे याची माहिती सोबत दि ३०-१२-९४ च्या ठरावाची नकल माहितीसाठी दिली आहे.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलाथीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देऊन अपिलार्थीने मागीतलेली सर्व माहिती ग्रामपंचायतशी संबंधीत असल्यामूळे ही मागणी ग्रामपंचायत कार्यालय, शेवगे यांच्याकडे मागणी करण्याचे अपिलार्थीस सूचित केले त्याचबरोबर त्यांनी संबंधीत ग्रामपंचायतीने पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नाही तर गटविकास अधिकारी यांच्याकडे अपील करण्याचेही अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्या प्रमाणे अपिलार्थीने संबंधीत ग्रामपंचायतीकडे अर्ज न करता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून, राज्य माहिती आयोगाकडे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनूसार दिनांक- १३-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणाचे संबंधीत जन माहिती अधिकारी हे मौ.शेवगे ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी हे असून, गटविकास अधिकारी पंचायत समिती, पारोळा हे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत. तथापि अपिलार्थीने या ठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगांव यांना जन माहिती अधिकारी असे संबोधून त्यांच्याकडून काही माहिती मागविली आहे. जर ही माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगांव यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधीत प्राधिकरणाकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (त) नूसार अभिप्रेत आहे, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- १५-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत प्राधिकरणांकडे वेगळा अर्ज करावयाचे सूचित केले, ही त्यांची कृती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (त) चा भंग करते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनाचे पालन न करता व कोणत्याही प्रथम प्राधिकरणाकडे अपील न करता सरळ राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केलेले आहे.

या प्रकरणी, प्रथम अपिलीय प्राधिकरणाकडून सुनावणी होणे अनिवार्य आहे, असे आयोगास वाटत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत पाठवावा व माहिती अधिकार अधिनियमातील विहित केलेल्या कालावधीमध्ये त्यावर पुढे कार्यवाही होईल, असे

पहावे. अपिलार्थीने केलेल्या अर्जा संदर्भातील पुढील उर्वरित आवश्यक त्या प्रक्रिया अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये पार पडतील, याची त्यांनी दक्षता घ्यावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१.अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक-१६-०१-२००८**

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक**

प्रत

१. श्री.जयदेव गंगाराम पाटील, रा.शेवगे. प्रगणे बहाळ, पो.मुंदाणे, ता.पारोळे, जि.जळगांव
२. जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पारोळे, ता.पारोळे, जिल्हा- जळगांव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, जळगांव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००८/रामाआ/तक्रार/सिआर/१३९

निर्णय दिनांक : १६-०१-२००८

१ श्री. गोवर्धन शंकरलाल बिहाणी, : तक्रारदार
रा. शुक्लेश्वर मंदिराजवळ, राहुरी.
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा दि. राहुरी पिपल्स को.ऑप. बँक, लि. राहुरी ता.
राहुरी जि. अहमदनगर

## विवेचन

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. गोवर्धन शंकरलाल बिहाणी (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी, दि. राहुरी पिपल्स को.ऑप बँक, लि. राहुरी ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) दोघेही गैरहजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २६.४.२००६ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे, जिल्हा उपनिबंधकांनी राहुरी पिपल्स बँककडून मागविलेल्या अहवालाची नक्कल त्यांना प्राप्त न झाल्यामुळे तक्रार केली होती. या तक्रारीची नोंद राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दिनांक १०.०५.२००६ रोजी झालेली आहे.

आयोगाकडे केलेल्या तक्रारदार यांच्या या तक्रारीचे अवलोकन करता, त्यांनी संदिग्ध स्वरुपाची तक्रार केल्याचे दिसून येते. त्यांच्या तक्रारीवरुन असे अनुमान काढणे शक्य आहे की, तक्रारदार यांनी दि. राहुरी पिपल्स को.ऑप. बँक, राहुरी, जि.अहमदनगर यांच्या कार्यपध्दतीबाबत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे जो तक्रार अर्ज केला होता, तो तक्रार अर्ज, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांनी

अभिप्रायार्थ मुख्य कार्यकारी अधिकारी, राहुरी पिपल्स को.ऑप बँककडे त्यांचे दिनांक १८.२.२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविला होता. जिल्हा उपनिबंधक, अहमदनगर यांनी बँकेस पाठविलेल्या या पत्रासंदर्भात राहुरी पिपल्स को-ऑप बँक यांच्याकडून प्राप्त झालेला खुलाशाची प्रत तक्रारदारास हवी आहे. तथापि सद्य:स्थितीमध्ये जिल्हा उपनिबंधक यांच्या दि. १८.२.२००६ रोजीच्या पत्रास राहुरी पिपल्स को.ऑप बँकेने कशा प्रकारे प्रतिसाद दिला आहे हे कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे व संबंधितांच्या गैरहजेरीमुळे कळणे शक्य नाही. मूळात राहुरी पिपल्स को.ऑप बॅन्केने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांचेकडे तक्रारदारांने बँकेविषयी केलेल्या तक्रारी संदर्भात खुलासा सादर केला आहे किंवा कसे, हे कळण्यासही काही मार्ग नाही. राहुरी पिपल्स को.ऑप बँकेने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांचेकडे तक्रारदाराच्या तक्रारी संदर्भात काही खुलासा केला असेल तर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून त्याची प्रत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांनी अपीलार्थीस देण्यास सकृतदर्शनी काहीही हरकत नसावी. सबब जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांचेकडे राहुरी को.ऑप. बँकेने तक्रारदाराने केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात काही खुलासा पाठविला असल्यास, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्याची छाननी करुन सदर अहवालाची प्रत तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत देण्यासंदर्भात आपल्या पातळीवर यथायोग्य निर्णय घेऊन तो तक्रारदारास परस्पर कळवावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, राहुरी यांचेकडे दि. राहुरी पिपल्स को.ऑ. बँकेने काही खुलासा पाठविला असल्यास त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्याची छाननी करुन सदर अहवालाची प्रत तक्रारदारास देण्यासंदर्भात आपल्या पातळीवर यथायोग्य निर्णय घेऊन तो तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत परस्पर कळवावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०१-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोवर्धन शंकरलाल बिहाणी, रा. शुक्लेश्वर मंदिराजवळ, राहुरी जि. अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा दि. राहुरी पिपल्स को. ऑप. बँक लि. राहुरी जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८२९

निर्णय दिनांक १७-०१-२००८

श्रीमती प. गं. कोदरकर, : अपिलार्थी

स्वा. सै. व्दारा - श्री. अकोलकर,

३३ (अ) "रेणुका", छत्रपतीनगर, गारखेडा

परिसर, औरंगाबाद – ४३१ ००५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य

सैनिक कक्ष, मंत्रालय, मुंबई – ३२

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सामान्य प्रशासन विभाग, स्वातंत्र्य

सैनिक कक्ष, मंत्रालय, मुंबई – ३२

प्रत्यक्षत : जन माहिती अधिकारी : अवर सचिव, (स्वातंत्र सैनिक कक्ष), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

जन अपिलीय अधिकारी : उपसचिव, (स्वातंत्र सैनिक कक्ष), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

# <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती प. गं. कोदरकर या गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय श्री. ज्ञानदेव लक्ष्मण सुळ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय सौ. स्मिता दत्तात्रय मंत्री (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वातंत्र्य सैनिक अवलंबितासंदर्भात उपलब्ध असलेल्या सवलतीविषयक खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १९-११-२००३ चे परिपत्रक स्वातंत्र्य सैनिक अवलंबितांसाठी सुध्दा लागू आहे काय ? या परिपत्रकामुळे शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दिनांक ०४-०३-१९९१ मधील तरतूदी आणि त्या अनुषंगाने न्यायालयाने दिलेला निकाल आता बाद ठरले आहे काय ? ”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०५-२००६ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की,

“ शासन सेवेतील गट-क व गट-ड पदावरील सेवाभरतीची महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या सुचनानुसार एकत्रित मार्गदर्शक तत्वे शासन परिपत्रक दिनांक २५-१०-२००५ अन्वये स्पष्टपणे विहित करण्यात आलेली आहेत. सदर आदेशातील धोरण स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना लागू आहे. या शासन निर्णयाची प्रत आपणास समक्रमांकाच्या दिनांक १७-०५-२००६ च्या पत्रान्वये पाठविण्यात आली आहे. तथापि सदर आदेशाची प्रत पुन्हा यासोबत पाठवित आहे.”

तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि, त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी केलेल्या अपिला-संदर्भात आवश्यक तो खुलासा केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या खुलाशाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम माहितीसाठीचा अर्ज त्यांना दिनांक १६-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दिनांक १५-०६-२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने संदर्भित केलेले दिनांक १९-११-२००३ चे परिपत्रक शासनाच्या, दिनांक २५-१०-२००५ च्या आदेशाव्दारे अधिक्रमित झालेले असून अपिलार्थीने संदर्भित केलेले दिनांक १९-११-२००३ व सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक ०४-०३-१९९१ चे परिपत्रकाचे विषय पूर्णतः भिन्न आहेत. या दोनही परिपत्रकाचा एकमेका-वर परिणाम होणार नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी ह्या वयोवृध्द, अशिक्षित व औरंगाबाद येथे राहणा-या महिला असल्यामुळे त्यांना अपिलार्थीच्या सुनावणीस हजर राहण्याकरिता त्रास होऊ नये म्हणून त्यांच्या अपिलाची सुनावणी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी यांचे अपिलार्थीबाबत सहानुभूतीचे धोरण स्वागतार्ह असले तरी त्यांच्या-कडे माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त होणा-या अपिलाची सुनावणी करणे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे अनिवार्य आहे. अशा प्रकारची सुनावणी करतांना त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर आपले आदेश पारीत करणे अभिप्रेत आहे याची नोंद घेण्याचे त्यांना सूचित करण्यात येत आहे. आपल्या युक्तिवादामध्ये त्यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांचे माहिती अधिकारात याच विषयावर त्यांच्याकडे बरेच अर्ज प्राप्त झाले असून

त्यांना शासनाच्या शासननिर्णयाच्या प्रती वेळोवेळी पाठविण्यात आल्या आहेत. तसेच त्यांनी वेळोवेळी मागितलेली माहिती देखील त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी शासननिर्णयाच्या एखाद्या वाक्याचा / शब्दांचा विपर्यास करुन पुन्हा पुन्हा अर्ज सादर करत असल्याचे दिसून आले आहे. त्याच बरोबर अशाच प्रकारच्या विषयासंदर्भात अपिलार्थी सुनावणीसाठी यापूर्वी देखिल आयोगासमोर उपस्थित राहिल्या नाहीत याकडे देखील त्यांनी आयोगाचे लक्ष वेधले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादामध्ये तथ्य आहे. आयोगाचे देखिल अपिलार्थी संदर्भात अशाच प्रकारचे निरीक्षण आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असून ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येमध्ये बसत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी अशी आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांचा खुलासा किंवा स्पष्टीकरण मागण्याची तरतूद नाही. एवढे असून देखील अपिलार्थीचे शंकानिरसन करण्याचे सामान्य प्रशासन विभागाच्या अधिका-यांनी वेळोवेळी प्रयत्न केल्याचे दिसून येते. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने शासनाच्या दोन आदेशाचे एकमेकावर होणा-या परिणामासंदर्भात जन माहिती अधिका-यास प्रश्न विचारले आहेत. दोनही आदेशांचे विषय पूर्णतः भिन्न असल्याने त्यांचा एकमेकांवर परिणाम होणार नाही असे सामान्य प्रशासन विभागाच्या अधिका-यांनी आयोगासमोर स्पष्ट केले. हे स्पष्टीकरण त्यांनी जर पूर्वी केले

असते तर कदाचित अपिलार्थीने आयोगाकडे अपील दाखल केले नसते. मुळात अपिलार्थीने विचारलेली माहिती ही ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येत बसत नसल्यामुळे व अपिलार्थी यांची उपरोक्त वर्णन केलेली कार्यपध्दती (प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारणे, आयोगासमोरील सुनावणीस अनुपस्थित राहणे इत्यादी) लक्षात घेता अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

सबब, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १७-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती प. गं. कोदरकर, स्वा. सै. व्दारा - श्री. अकोलकर, ३३ (अ) ‘‘रेणुका’’, छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद – ४३१ ००५
२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, (स्वातंत्र सैनिक कक्ष), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, (स्वातंत्र सैनिक कक्ष), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८३०

निर्णय दिनांक १७-०१-२००८

श्री. सरदार हरजितसिंग पिता तिरथसिंग सहानी, : अपिलार्थी
५-१-५५/१, उस्मानपूरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्रशासन अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
शहर विभाग क्रमांक १, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी शहर
विभाग क्रमांक १, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सरदार हरजितसिंग पिता तिरथसिंग सहानी हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. सौ. शिल्पा राजेश काबरा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य

विद्युत वितरण कंपनी श्री. सरिचंद गोपा पवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ए. जी. कृषि पंप कनेक्शनचे न्यू सर्व्हिस कनेक्शन व सी. पी. एल. बाबत १९७७ ते ०३-०४-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १. सर्व्हे नंबर ९७ सातारा परिसर तालुका जिल्हा औरंगाबाद येथील श्री. मकबुल खा रहीम खा यांच्या नावाने ए. जी. कृषि पंप कनेक्शन ज्याचा ग्राहक क्रमांक ४९००१०२३४९४५ आहे ज्या कागदपत्राआधारे (न्यू सर्व्हिस कनेक्शन रिपोर्ट) देण्यात आलेले आहे त्याची तपशिलवार माहिती कागदपत्रासह द्यावे.

२. सदरील पंप कनेक्शनचा सी. पी. एल. रिपोर्ट आजपर्यत द्यावे.

३. एका विहीर ज्याचे नावाने ७/१२ वर नोंद आहे त्याचे नावावर एक ए. जी. पंप कनेक्शन देण्यात येते किंवा एकापेक्षा जास्त ए. जी. पंप कृषि कनेक्शन्स देऊ शकतात नियमाने याची माहिती द्यावे. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने केलेला हा अर्ज चुकिच्या जन माहिती अधिका-यास उद्देशून केला असल्यामुळे त्यांनी हा अर्ज उप कार्यकारी अभियंता, छावणी उपविभाग -- जे या प्रकरणी प्रत्यक्षः जन माहिती अधिकारी आहेत -- त्यांना दिनांक ०५-०४-२००६ रोजी पाठविला. प्रशासन अधिकारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांनी सदर अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०४-२००६ रोजी पाठविल्याचे आयोगासमोर कबूल केले. तथापि सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०४-२००६ रोजी प्रत्यक्ष प्राप्त झाला. औरंगाबाद शहरातल्या शहरामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण

कंपनीच्या एका कार्यालयातून दुस-या कार्यालयाकडे साधा अर्ज पाठविण्यासाठी १२ दिवसांचा कालावधी लागला यावरुन या कंपनीच्या ढिसाळ प्रशासनाची कल्पना यावी.  सदर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा माहितीचा अर्ज कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. शहर विभाग यांच्याकडे पाठविला.  कार्यकारी अभियंता यांनी सदर अर्ज पाठवितांना दिनांक १९-०४-२००६ च्या पत्रामध्ये उप कार्यकारी अभियंता (प्रत्यक्षः जन माहिती अधिकारी) यांना असे म्हटले आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याच कार्यालयात उपलब्ध आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीतील संदर्भित ग्राहक क्रमांक ४९००१०२३४९४५ हा १० ते १५ वर्षापुर्वीचा जुना असून शेती पंपाची वीज देयके कार्यकारी अभियंता यांच्याच कार्यालयातून दिली जात होती व त्यामुळे अपिलार्थीने मागितलेल्या नाहरकत प्रमाणपत्राची प्रत देखील कार्यकारी अभियंता कार्यालयातच असावी असे त्यांनी या पत्रामध्ये अनुमान काढले आहे.  उप कार्यकारी अभियंता यांनी लिहिलेले दिनांक १९-०४-२००६ रोजीचे पत्र संबंधीत कार्यकारी अभियंता यांना दिनांक २१-०४-२००६ रोजी प्राप्त झाले.  तदनंतर अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०६-२००६ रोजी कळविली.  अपिलार्थीस माहिती देण्याप्रीत्यर्थ लागलेला विलंब हा प्रामुख्याने कार्यालयाचे स्थलांतर, कार्यालयाची विभागणी, क्षेत्रीय अधिका-यांच्याकडे अधिका-यामध्ये केलेले बदल असे कार्यकारी अभियंता यांच्याकडून सांगण्यात आले.  तथापि  या माहितीमध्ये अपिलार्थीने मागितलेल्या सी. पी. एल. (कंझुमर पर्सनल लेझर) संदर्भात ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.  कारण मध्यंतरीच्या काळात त्यांच्या कार्यालयात झालेल्या संगणकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये संबंधित सर्व अभिलेखे उपविभागीय कार्यालयास हस्तांतरीत करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.  कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक २१-०६-२००६ रोजीच्या पत्रामध्ये तसा

उल्लेख करुन अपिलार्थीस सी. पी. एल. रिपोर्ट त्यांच्या छावणी कार्यालयातून (उपविभागस्तर) घेऊन जाण्यास सूचित केले आहे. संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस ही माहिती साध्या पोस्टाने पाठविली असून अपिलार्थीस ही माहिती पाठविल्यापुष्ट्यर्थ ते आयोगासमोर, आयोगाने पुर्वसूचना देऊनही कोणताही पुरावा सादर करु शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न प्राप्त झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने अपील अर्ज श्री. सरिचंद गोपा पवार कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्या नांवाने केला असल्यामुळे व या प्रकरणी प्रत्यक्ष अपिलीय अधिकारी हे श्री. एस. डी. शिंदे हे असल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची कोणतीही सुनावणी घेतली नाही व अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३ जून २००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे कळविले. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती अत्यंत बेजबाबदारपणाची असल्याचे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी जर ते प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी नव्हते तर त्यांनी अपिलार्थीस न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने सदरचे अपील प्रत्यक्षतः जे जन अपिलीय अधिकारी होते त्यांच्याकडे पाठविणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती न करता, अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची कोणतीही संधी न देता, अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे कळविण्याच्या त्यांच्या कृतीवरुन वरील अभिप्रायास पुष्टी मिळते. त्यांच्या या अशा वर्तनाची नोंद व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. मुंबई यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले असून, या अपिलामध्ये त्यांनी, त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी जन अपिलीय अधिकारी यांनी दिली नाही, जन माहिती अधिकारी यांनी, आजतागायत माहिती दिली नाही असे नमूद करुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) अन्वये कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगा-कडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती मुख्यत्वेः कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत कार्यकारी अभियंता यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्याची विनंती केली. सी. पी. एल. संदर्भातील माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असतांनाही त्यांनी ती अपिलार्थीस का पुरविली नाही हे विचारले असता ही माहिती देखील कार्यकारी अभियंता यांच्याकडे उपलब्ध असण्याची शक्यता असल्याने ते ही माहिती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत असे त्यांनी सांगितले. अपिलार्थीस माहिती देण्यास प्रत्यक्षतः जबाबदार असणारे कार्यकारी अभियंता यांनी युक्तिवादामध्ये असे सांगितले की, त्यांनी अथक प्रयत्नाने अपिलार्थीने मागितलेली मूळ सर्व्हिस कनेक्शन संदर्भात माहिती दिनांक २१-०६-२००६ रोजी पुरविली आहे. सी. पी. एल. संदर्भातील सर्व प्रक्रिया उप विभागीय अधिकारी स्तरावर पार पडत असल्यामुळे ही माहिती उपविभागीय स्तरावर उपलब्ध असते. त्यांच्या या विधानास उपस्थित कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांनी दुजोरा

दिला. यावरुन अपिलार्थीने विचारलेल्या माहितीतील सी. पी. एल. संदर्भातील माहिती संबंधीत उपविभागाकडे सर्वसाधारण परिस्थितीत उपलब्ध असावयास हवी असे अनुमान काढण्यास हरकत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी २००१ ते सप्टेंबर २००७ पर्यंतची सी. पी. एल. ची माहिती त्यांनी बरोबर आणली आहे. २००१ पुर्वीचे रेकॉर्ड त्यांनी सर्वत्र शोध घेऊनही त्यांना सापडू शकले नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

वरील घटनाक्रम व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिका-यांनी केलेला युक्तिवाद पाहता या प्रकरणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या सर्व अधिका-यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात उदासीनता दाखविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहिती मागितल्यानंतर अपिलार्थीस ती विहित मुदतीमध्ये कशी देता येईल याचा कोणत्याही अधिका-याने सकारात्मक विचार केल्याचे या प्रकरणी आढळून येत नाही. अपिलार्थीने मूळ माहितीसाठीचा अर्ज दिनांक ०३-०४-२००६ रोजी केला असतांना देखील अंदाजे पावणे दोन वर्षाच्या कालावधीनंतरही अपिलार्थीस फक्त ४ वर्षाचे सी. पी. एल. अहवाल मिळावे ही बाब दुर्दैवाची आहे. जुने अभिलेखे व्यवस्थित ठेवण्यासंदर्भात, त्यांचे व्यवस्थापन करण्यासंदर्भात योग्य ती दक्षता न घेतल्याने हा प्रसंग उद्‌भवल्याचे दिसून येते. वास्तविक उप कार्यकारी अभियंता, छावणी उपविभाग व कार्यकारी अभियंता शहर विभाग हे एकाच प्राधिकरणाचे दोन भाग आहेत. उप कार्यकारी अभियंता हे कार्यकारी अभियंता शहर विभाग यांच्या कार्यालयातील एक भाग आहेत. एवढे असूनही या अधिका-यांनी विशेषतः उप कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने कोणतेही आवश्यक ते प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाहीत.

अपिलार्थीने मागितलेल्या सी. पी. एल. संदर्भातील माहिती २००१ या सालापासून तयार असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले. यापुर्वीची माहिती त्यांना प्राप्त होऊ शकली नाही. हरत-हेने प्रयत्न करुन देखील ती त्यांना प्राप्त होऊ शकली नाही असे त्यांचे

म्हणणे आहे. सी. पी. एल. संदर्भातील माहिती जतन करण्याचा कालावधी हा दहा वर्ष इतका असल्याचे कार्यकारी अभियंता प्रशासन यांनी आयोगासमोर सांगितले. अपिलार्थीने मागितलेली माहिती, सदर माहिती जतन करण्याचा कालावधी संपण्यापुर्वीच, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकत नाही ही या कंपनीची शोकांतिका आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अर्थात या शोकांतिकेस संबंधीत कंपनीचे अधिकारी जबाबदार आहेत. त्यांनी अपिलार्थीने विचारलेल्या माहितीचे योग्य त्या प्रकारे जतन व व्यवस्थापन न करुन ठेवल्यामुळे आज अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. आवश्यक ते अभिलेखे व्यवस्थित जतन न करुन व पर्यायाने अपिलार्थीस उशिराने माहिती देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य दक्षतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला असल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. मुंबई यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन, तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. मुंबई यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक १७-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सरदार हरजितसिंग पिता तिरथसिंग सहानी, ५-१-५५/१, उस्मानपूरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. शहर विभाग क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी शहर विभाग क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, प्रकाशगड, ५ वा मजला, बांद्रा (पुर्व), मुंबई – ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८३१

निर्णय दिनांक १७-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. जी. एस. रायबोळे,<br>तालुका अध्यक्ष, भारिप बहुजन महासंघ<br>तालुका किनवट व विशेष कार्यकारी<br>अधिकारी, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>किनवट, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>किनवट, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. जी. एस. रायबोळे हे गैरहजर आहेत तर

जन माहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट श्री. गुणवंत किशनराव टारपे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट श्री. नंदकिशोर वसंतराव नाईनवाड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००६ या कालावधीतील चालू असलेल्या कामांची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " तालुका कृषि कार्यालय तालुका किनवट जिल्हा नांदेड मध्ये तुम्ही केलेल्या व चालू असलेल्या कामाची माहिती देणे १) कामाचे नांव, २) गावांचे नांव, ३) शेत सर्व्हे नंबर, ४) कामाचा प्रकार, ५) कामाची अंदाजित किंमत, ६) वरील कामावर पैशाचा व खर्च व धान्य कुपन्स खर्चाची माहिती देणे तसेच मातीबंधारे, अर्दनस्ट्रक्चर कामे, शेततळी कामे, पु. भ. च. कामे, सी. ना. वा. कामे. मा. ना. बा. कामे, डा. बा. कामे इत्यादी कामाची माहिती देणे.
>
> तालुका कृषि कार्यालय तालुका किनवट जिल्हा नांदेड मार्फत वरील प्रकारच्या केलेल्या कामाचे मजुराचे हजेरीमस्टरची छायांकीत प्रत, कामाचे मोजमाप (एम. बी.) पुस्तिकांची छायांकीत प्रत व तसेच वरील कामाचे कॅश बुकाची छायांकीत प्रत इत्यादी प्रकारच्या कामाची वरील माहिती व वरील कामावरील कागदपत्राची माहिती देणे. "

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती

विस्तृत व मोठी असल्यामुळे विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागणार असल्याची कल्पना दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न प्राप्त झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. सदर अपील करण्याचे कारण -- कलम १८ (१) (क, ड, ई) अन्वये शासकीय माहिती अधिकारी / प्रथम / व्दितीय अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन -- असे दिले आहे. एकंदरीत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-११-२००६ रोजी घेऊन आपले आदेश दिनांक २७-११-२००६ रोजी पारीत केले आहेत. सदर आदेशाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या त्याच्या कार्यालयातील जावक नोंदवहीच्या उता-यावरुन त्यांनी सदर निर्णय अपिलार्थीस कळविल्याचे सिध्द होते. या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर माहिती अपिलार्थीस सशुल्क अथवा विनामूल्य द्यावयाची याबाबत त्यांनी त्यामध्ये कोणतेही भाष्य केलेले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील दिनांक २७-११-२००६ च्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पुरविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्रत्यक्षतः दिनांक ०८-१२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या त्यांच्या

दिनांक ०५-१२-२००६ च्या पत्राच्या झेरॉक्स प्रतीवरील अपिलार्थीच्या पोच नोंदीवरुन दिसून येते.

तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होण्यापुर्वीच अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१२-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपिलाची राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयामध्ये दिनांक २०-१२-२००६ रोजी नोंदणी झाली आहे. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना ३० दिवसाच्या आत माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जाचा ९० दिवसापर्यत कोणताच निर्णय दिला नाही असे नमूद करुन संबंधितांवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांना एकूण रुपये ४७७५० /- इतकी शास्ती लावून ती शासकीय कोषागारात जमा करण्याची व जमा केलेल्या पावतीची छायांकीत प्रत त्यांना मोफत पाठविण्याची देखील पुढे आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगा-कडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही त्यांना त्यांच्या अधिनस्त असलेल्या ४ मंडळ कार्यालयाकडून घ्यावयाची होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती प्रचंड प्रमाणात असल्याने व ती वेगवेगळ्या सहाय्यकाकडून त्यांना गोळा करावयाची असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांना विलंब लागणार आहे हे लक्षात येताच त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६

रोजीच्या पत्राव्दारे माहिती देण्यास विलंब लागणार असल्याची माहिती दिली. सर्व संबंधितां-कडून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती गोळा झाल्यानंतर त्यांनी दिनांक १९-०८-२००६ रोजी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याप्रीत्यर्थ रुपये २२२४ /- इतकी रक्कम त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने हे शुल्क जमा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थी हे त्यांचे कार्यालयात माहितीसाठी नियमितपणे वेगवेगळ्या प्रकारचे अर्ज करत असतात. आतापर्यंत त्यांना पुरविलेल्या माहितीवरुन त्यांनी कोणतेही व्यापक जनहित साध्य केल्याचे आढळून येत नाही. आजतागायत अपिलार्थी यांचे माहिती मागण्याचे उद्योग चालू आहेत. अपिलार्थी नियमीतपणे मागवित असलेल्या माहितीचे स्वरुप प्रचंड व विस्तृत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०८-१२-२००६ रोजी त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २४-११-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्यांनी दिनांक २७-११-२००६ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशान्वये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम व कृषि विभागाच्या अधिका-यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्यासाठी वेळ लागेल याची कल्पना त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. अपिलार्थीस सदर

कल्पना जन माहिती अधिकारी यांनी थोड्या उशीराने दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीच्या अर्जाची, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या व आयोगाकडे केलेल्या अपील अर्जाची पाहणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने एका छापील फॉर्ममध्ये ही माहिती मागविली असून / अपिल केले असून, त्यामध्ये काही ठिकाणी मोकळी जागा सोडली आहे. या मोकळ्या जागेवर जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांची नांवे, त्यांच्या कार्यालयाची नांवे लिहिली की, माहितीसाठीचा अर्ज व अपील अर्ज तयार होत असल्याचे दिसून येते. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी केलेल्या दिनांक ३१-०८-२००६ रोजीच्या अपील अर्जाचे अवलोकन करता, अपील करण्याचे कारण त्यांनी खालीलप्रमाणे दर्शविले आहे असे दिसून येते.

" कलम १८ (१) (क, ड, ई) अन्वये माननीय शासकीय माहिती अधिकारी, प्रथम / व्दितीय अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन "

प्रस्तुत प्रकरणी अनावश्यक तो भाग खोडण्याची तसदी देखील अपिलार्थीने घेतल्याचे दिसून येत नाही. यावरुन अपिलार्थी माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात कितपत गंभीर आहेत याबद्दल आयोग साशंक आहे. अपिलार्थीने अशाच प्रकारे या छापील अर्जाच्या माध्यमातून वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडून मागविली आहे. अपिलार्थीच्या सर्वसाधारण कार्यपध्दतीबाबत जन माहिती अधिकारी यांनी आज झालेल्या युक्तिवादामध्ये वरील प्रमाणे भाष्य केलेले आहे. अशाच प्रकारचे भाष्य इतर विभागाच्या अधिका-यांनी देखील आयोगासमोरील सुनावणीत केलेले आहे. पुरेशा गांभीर्याने मागणी न करता विस्तृत स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मागण्याच्या अपिलार्थीसारख्या प्रवृत्तींच्या सवयीमुळे माहितीचा अधिकार अधिनियमाची धार बोथट होईल अशी आयोगास शंका वाटते. माहितीचा अधिकार कायद्याचा उपयोग अपिलार्थीने त्यांच्या सद्सदविवेकबुध्दीला स्मरुन करणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपेक्षित आहे. प्रस्तुत प्रकरणी अशा प्रकारची कारवाई

अपिलार्थी यांच्याकडून झाली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ०८-१२-२००६ रोजी माहिती प्राप्त झाली असल्याने व अपिलार्थीने त्याची पोच दिल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी असद्‌हेतुने कोणतीही माहिती दडविल्याचे अथवा माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे आयोगास दिसून न आल्यामुळे त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगाने दंड वसूल करण्याची मागणी राज्य माहिती आयोगाच्या कार्यकक्षेमध्ये नसल्यामुळे अपिलार्थीची आयोगास दंड वसूल करण्याची विनंती मान्य करता येत नाही. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागवितांना थोडा विवेक बाळगणे इष्ट होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक १७-०१-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, तालुका अध्यक्ष, भारिप बहुजन महासंघ तालुका किनवट व विशेष कार्यकारी अधिकारी, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८०४
निर्णय दिनांक- १७ जानेवारी, २००८.

१ श्री.नरेंद्र भाऊसाहेब मराठे, : अपिलार्थी
प्लॉट नं-३२, महालक्ष्मी कॉलोनी,
शरद शिंपीचा घराजवळ,
मु.पो.ता.शिरपूर,जि.धुळे.--४२५४०५

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य, मराठी अध्यापक विद्यालय, मालेगांव
कॅम्प मालेगांव, जिल्हा- नाशिक.
२. जनअपिलीय अधिकारी तथा विभागीय
शिक्षण उपसंचालक कार्यालय, नाशिक,
जि.नाशिक.

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १७-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.नरेंद्र भाऊसाहेब मराठे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, मराठी अध्यापक विद्यालय, मालेगांव कॅम्प मालेगांव, श्रीमती.देशपांडे शोभा दत्तात्रय (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी

तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,नाशिक, श्री. संतोष नामदेव पाटील (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-१२-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील शिक्षणशास्त्र विद्यालयातील काही कर्मचा-यांच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" आपल्या विद्यालयातील खालील कर्मचारी (शिक्षक/शिक्षकेत्तर) यांच्या शैक्षणिक पात्रता, धर्म/जात/वर्ग व मागासवर्गीय अनुशेषसंबंधी माहिती खालील कोष्टाकान्वये माहिती मिळावी, ते पुढील प्रमाणे.

| क्र. | कर्मचारी (शिक्षक/शिक्षकत्तर)यांचे नाव व पद | धर्म / जात/ वर्ग | शैक्षणिक पात्रता व टक्के | | | | संबंधीत संस्थेत मागासवर्गीय अनुशेष पुर्ण/ अपूर्ण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पदवी (टक्के) | पदवीत्तर (टक्के) | बीएड (टक्के) | एमएड (टक्के) | |
| १. | श्रीमती देशपांडे शोभा दत्तात्रय | | | | | | |
| २. | श्री.पाटील दिलीप शिप्रु | | | | | | |
| ३. | श्री.सोनवणे वाल्मिक दगा | | | | | | |
| ४. | श्री. वाबळे शरद रामदास | | | | | | |
| ५. | श्री.बोरसे रुपा शामराव (शिपाई) | | | | | | |
| ६. | श्री.तुकारामसखुदेव कुळीर (शिपाई) | | | | | | |

टीपः- आपल्या संस्थेची/ संबंधीत संस्थेची मागासवर्गीय अनुशेषची प्रत देखील सोबत द्यावी.

प्राचार्य/ मुख्याध्यापकाची सही व शिक्का"

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २५-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व सदर माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०१-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक- २४-०५-२००६ अन्वये अपिलार्थीस, त्यांना अपेक्षित असलेल्या अनुशेषाच्या प्रतिची मागणी त्यांनी सेक्रेटरी, महात्मा गांधी विद्यामंदीर, मालेगांव या संस्थेकडे करण्याचे सूचित केले. मागासवर्गीय अनुशेषाच्या संदर्भात प्रत्येक शिक्षण संस्था अपापल्या कर्मचा-यांची वेगवेगळया शाळातील कर्मचा-यांची माहिती संस्थानिहाय ठेवत असल्यामूळे त्यांनी अपिलार्थीस असे उत्तर दिले असावे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीच्या अपीलअर्जावर सुनावणी न घेता अपिलार्थीस एका पत्राव्दारे आपला निर्णय कळविण्याची कृती चुकीची आहे. माहिती अधिकार अधिनियमा व्दारे त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अपीलअर्जा संदर्भात त्यांनी संबंधीत अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून घेवून त्यावर आपले अंतिम निर्णय पारीत करणे, हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणामध्ये केल्याचे आढळून येत नाही. याची नोंद घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या कार्यपध्दतीत सुधारणा घडवून आणावी, असे त्यांना सूचित करण्यात येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले असून या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना मागासवर्गीय अनुशेषाची प्रत पाठवून देण्यां संदर्भात आयोगाने सूचना द्याव्यात, अशी विनंती केली आहे. तव्दतच मिळालेली माहिती अपूर्ण व सदोष असल्याचे देखिल त्यांनी या अपीलअर्जात म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामूळे त्यांनी आयोगासमोर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून

सुनावणी पुढे घेण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांच्याकडील दिनांक- २५-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्यापृष्ठ्यर्थ त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीचा उतारा आयोगासमोर सादर केला. त्यावरुन त्यांनी अपिलार्थीस दिनांक- २५-०४-२००६ रोजी ही माहिती पाठविल्याचे सिध्द होत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांना फक्त अनुशेषाची प्रत हवी असल्याने सदर प्रत कशी मिळवावी याचे मार्गदर्शन करणारे पत्र त्यांनी अपिलार्थीस लिहीले. जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय घेण्याची ही कृती बरोबर नाही. त्यांनी अपिलार्थीचे अपील अर्जावर कोणत्या पध्दतीने निर्णय घ्यावयाचा आहे. याचे विवेचन वरील परिच्छेदात केलेले आहे. अपिलार्थीच्या कार्यपध्दती बाबत आयोगास विषद करतांना त्यांनी अशी माहिती दिली की, अपिलार्थी यांनी अशाच प्रकारची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे वेगवेगळया एकूण २० वेळा मागितली आहे.

वरील घटनाक्रम जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीस मागितलेल्या माहितीपैकी, “ संबंधीत संस्थेत वेगवेगळे अनुशेष पूर्ण / अपूर्ण ” या सदराखाली माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी मागासवर्गीय अनुशेष हा संस्थेच्या स्तरावर एकत्रीत स्वरुपात आहे, अशा स्वरुपाचे मोघम उत्तर दिले आहे. तथापि सदर उत्तर अपिलार्थीस मान्य नसावे, असे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जाचे अवलोकन करता दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ती सदोष, अपूर्ण व दिशाभूल करणारी अशी वाटते, अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी का वाटते, हे स्पष्ट करण्याकरिता त्यांनी प्रत्येक कर्मचा-यांचे नेमणूकीस शिक्षण खात्याकडून मान्यता घेत असतांना त्यावेळच्या अनुशेष स्थीतिबाबत प्रत्येक प्रस्तावावर भाष्य केलेले असते व असा प्रस्ताव मुख्याध्यापक यांच्याकडे असल्याने, मुख्याध्यापकाकडे ही माहिती असणे अपेक्षित असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये संबंधीत संस्थेमधील अनुशेषा बाबत माहिती मागविली आहे. मात्र सदर माहिती सदोष असल्यापृष्ठ्यर्थ जे कारण दिले आहे ते शिक्षकाच्या नेमणूकीच्या प्रस्तावा संदर्भात दिले आहे.

त्यामूळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली, हे म्हणणे विसंगत वाटते. एवढे जरी असले तरी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत शिक्षण संस्थेच्या अनुशेषाच्या संदर्भातील माहिती संस्थेच्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देणे, हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनूसार अनिवार्य आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही भाग उपलब्ध नव्हता तर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम क्र.६ (३) (त्त) मधील तरतूदीनुसार अर्जाचा सदर भाग संबंधीत संस्थेकडे पाठवून त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावयास हवी होती. तथापि अशा प्रकारची कृती जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जी माहिती दिली आहे ती त्यांच्या सदसद्विवेकबुधीस स्मरुन दिल्याचे दिसते. सदर माहिती अपिलार्थीस देण्यामध्ये त्यांनी मुद्दाम टाळाटाळ केली किंवा कोणत्याही असद्हेतूने सदर माहिती देण्यास टाळली हे येथे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामूळे त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत. तथापि अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळवून देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेल्या मागासवर्गीय अनुशेषाची त्यांच्या संस्थेकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी आवश्यक वाटल्यास, संबंधीत संस्थेकडून हस्तगत करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील माहिती अधिका-यांने त्यांच्या अपीला संदर्भात दिनांक- २४-०५-२००६ रोजी निर्णय दिल्या बाबत काही आक्षेप आयोगाकडे त्यांच्या व्दितीय अपीलामध्ये नोंदविले आहेत. अपिलार्थीने नोंदविलेले आक्षेप योग्य असून अपिलार्थीच्या अपील निर्णयावर आदेश देतांना संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

आदेश

१ अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या मागासवर्गीय अनुशेषाची त्यांच्या संस्थेकडे उपलब्ध असलेली माहिती आवश्यक

वाटल्यास संस्थेकडून हस्तगत करुन घेऊन ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि.बा.बोरगे )**

**दिनांक- १७-०१-२००८** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ - औरंगाबाद/ नाशिक**

प्रत

१. श्री.नरेंद्र भाऊसाहेब मराठे, प्लॉट नं. ३२, महालक्ष्मी कॉलनी, शरद शिंपीच्या घराजवळ, मु.पो.ता.शिरपूर जिल्हा- धुळे- ४२५४०५.

२. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, मराठी अध्यापक विद्यालय, मालेगांव कँप मालेगांव, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक, महसूल, विभागीय आयुक्त कार्यालयाच्या आवारात, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००८/रामाआ/तक्रार/सिआर/१४०

निर्णय दिनांक १७-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जे. बी. वाघ, निवृत्त मेकॅनिक,<br>राऊळवाडी, चित्तोड रस्ता, धुळे. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>धुळे | : | उत्तरवादी |

## विवेचन

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. जे. बी. वाघ (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री. पद्माकर भागवतराव भोसले, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री. रामेश्वर अवधूत मंगळे सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांच्याविरुध्द त्यांच्याकडील दि. २७.१०.२००६ रोजीच्या तक्रार अर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, त्यांच्या सेवेसंदर्भात बेजबाबदारपणे वागणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करण्याची त्यांनी उत्तरवादी यांना विनंती केली होती, तथापि संबंधितांवर उत्तरवादी यांचेमार्फत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने, माहिती अधिकाराच्या अधिनियमातील तरतुदींचा आधार घेऊन त्यांनी उत्तरवादी यांचेकडून काही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. तथापि त्यांना सदर माहिती उत्तरवादी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.तद्वतच उत्तरवादी यांनी

त्यांना स्पष्ट व नेमकी माहिती न देता वस्तुस्थितीचा विपर्यास करणारी व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. त्यामुळे उत्तरवादी यांचेवर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार दंडात्मक व प्रशासकीय कार्यवाही करावी.

उपरोक्त प्रकरणाची पार्श्वभूमी उपस्थित उत्तरवादी यांच्याकडून समजून घेतली असता, त्यांनी सुनावणीमध्ये असे सांगितले की, तक्रारदार यांना धुळे सा.बां.विभागात असतांना "यांत्रिकी" या पदावर नियमित आस्थापनेवर दि. २४.६.१९८१ रोजी नेमणूक दिली होती. तथापि सदर नियुक्ती कालेलकर करारानुसार कार्यव्ययी आस्थापनेवरुन रुपांतरित आस्थापनेवर घेण्याचे आदेश शासनाकडून दि. २.२.८२ रोजी पारीत झाल्यामुळे तक्रारदार यांना, त्यावेळी दि. २३.२.८२ रोजी अस्थायी आस्थापनेवर घेतले गेले. तक्रारदार यांची नियुक्ती नियमित आस्थापनेवरुन रुपांतरित आस्थापनेवर होण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्याच्या विरुध्द काय कार्यवाही केली, हे जाणून घेण्यासाठी, तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचा आधार घेतला होता. तक्रारदार यांनी त्यांच्या या मूळ प्रश्नासंदर्भात उत्तरवादी यांच्याकडे दि. २.५.२००६ व २९.५.२००६ रोजीच्या अर्जान्वये उत्तरवादी यांच्याकडून माहिती मागितली होती. या दोन्ही अर्जावर उत्तरवादी यांनी अनुक्रमे दि. २२.५.२००६ व २.६.२००६ च्या पत्रान्वये तक्रारदारास उत्तर दिलेले आहे. तक्रारदाराच्या आस्थापनेतील स्वरुपातील बदल उत्तरवादी यांनी शासननिर्णयानुसार केलेला असल्यामुळे त्यांचे आस्थापना बदलास कोणीही जबाबदार नाही, असा निर्णय उत्तरवादी यांनी घेतला होता. त्याप्रमाणे त्यांनी तक्रारदारास माहिती अधिकार अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत उत्तर दिलेले आहे. उत्तरवादी यांनी तक्रारदारास दिलेले उत्तर वस्तुस्थितीनिष्ठ असल्याचे दिसून येते.

तक्रारदार यांच्या म्हणण्याप्रमाणे उत्तरवादी यांचे उत्तर, वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे किंवा दिशाभूल करणारे असल्याचे आहे, असे आयोगास वाटत नाही.

तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या तक्रार अर्जामध्ये दुसरी अशीही तक्रार केली आहे की, उत्तरवादी यांच्याकडे अपिलीय अधिकारी यांचे नाव/पत्ता याबाबतची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही. सदर माहिती तक्रारदाराने उत्तरवादी यांच्याकडे मागितली असता, या संदर्भात विहित कालावधी ओलांडून गेल्यानंतरही व उत्तरवादी यांना वारंवार स्मरण पत्र देऊनही ती माहिती तक्रारदारास प्राप्त झाली नाही. यावर उत्तरवादी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची नावे, हुद्दा व पदनाम दर्शविणारा

बोर्ड कार्यालयाच्या दर्शनी भागात लावला असल्याने तत्कालीन माहिती अधिकारी यांनी लेखी पत्र दिलेले नसावे. उत्तरवादी यांचा हा युक्तीवाद आयोगास मान्य आहे.

उपरोक्त परिच्छेदात निर्देशित केल्याप्रमाणे, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द केलेल्या दोन्ही अर्जासंदर्भातील तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य आढळून येत नाही. सबब तक्रारदाराची तक्रार फेटाळून लावण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार फेटाळून लावण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १७-०१-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जे. बी. वाघ, सेवानिवृत्त यांत्रिकी, राऊळवाडी, चित्तोड रोड, धुळे

२ उत्तरवादी तथा कार्यकारी अभियंता, सा.बां.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८३६

निर्णय दिनांक १८-०१-२००८

श्री. नरेश निळकंठ धाबर्डे, : अपिलार्थी
नारळी बाग,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक आयुक्त (पशूसंवर्धन),
मध्यवर्ती अंडी उबवणूक केंद्र, पडेगाव,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा पशूसंवर्धन उप आयुक्त,
खडकेश्वर, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नरेश निळकंठ धाबर्डे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (पशूसंवर्धन), मध्यवर्ती अंडी उबवणूक केंद्र श्री. आरीफोद्दीन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशूसंवर्धन उप

आयुक्त श्री. जगन्नाथ मल्हारराव डोईफोडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. कुक्कुट खाद्य विकले प्रकरण दोषी डॉ. तोताडे व सी. आर. कुलकर्णी यांनी २८००० /- रु. रोख चेकव्दारे भरले यांच्या छायांकित प्रती किंवा चलनव्दारे त्यांच्या झेराक्स प्रती.

२. कुक्कुट खाद्य (Recovary) का निघाली.

३. चौकशीत खाद्य कमी का आढळले.

४. कोबंड्यांना खाद्य कमी खाऊ घातले काय ?

५. खाद्य कोठे विकले.

६. उत्पादन, मास, अंडी कमी मिळाले काय ?

७. पैसे का भरुन घेतले याबाबत माहिती छायांकित प्रतीत द्यावी."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या या पत्रात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे केलेल्या या अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक १६-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या अर्जास उत्तर देऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात खुलासा केलेला आहे व त्याचबरोबर या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती योग्य असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला आहे. अपिलार्थीचे अपील ठरवितांना जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून ते नोंदवून घेऊन त्यावर आपले अंतीम आदेश पारीत करणे हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीसंदर्भात येथून पुढे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे जे अपील अर्ज प्राप्त होतील त्यावर याप्रमाणे सूचित केल्याप्रमाणे त्यांनी कारवाई करावी अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला. त्यांच्या लेखी युक्तिवादावरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी न घेतल्याबाबत आक्षेप घेतला असून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस, कर्मचा-याकडील वसुलीची रक्कम कधीही वसूल करता येते असे त्यांच्या

कडील दिनांक १६-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले. अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांनी जर ही माहिती मागविलेली नसती तर भांडारात असलेल्या तुटीची रक्कम संबंधितांनी बेकायदेशीररित्या गिळकृत केली असती. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले उत्तर भ्रष्टाचारास प्रोत्साहन देणारे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. माहिती अधिकाराचा मूळ उद्देश भ्रष्टाचार संपविणे असा असल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या उत्तराने माहिती अधिकाराच्या उद्देशाला तडा दिला आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी चूक झाल्याची कबुली दिली, मात्र संबंधितांवर कोणतीही कायदेशीर कारवाई केली नाही. त्यांच्या कार्यालयाकडे असलेल्या नोंदवहीतील माहितीनुसार जास्त अंडी असतांना सुध्दा ती कमी असल्याचे संबंधित कर्मचा-याने दर्शविले आहे हा देखील एक भ्रष्टाचार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या कारणास्तव जन अपिलीय अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) नुसार कायदेशीर कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी हे वीना परवानगी गैरहजर असल्याने त्यांच्यातर्फे कोणताही युक्तिवाद आज आयोगासमोर करण्यात आला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या अखत्यारित औरंगाबाद मध्यवर्ती अंडे उबवणूक केंद्र असून या केंद्रामध्ये दोन सहाय्यक पशूधन विकास अधिकारी, या केंद्राचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. या केंद्रामध्ये कोंबड्यांना पुरविण्यात आलेले खाद्य प्रमाणापेक्षा जास्त पुरविले गेल्याचे भांडार तपासणीमध्ये आढळून आले. कोंबड्यांना जादा पुरविण्यात आलेल्या खाद्यांची किंमत एकूण रुपये २३,२४२ /- इतकी होती. सदर कोंबड्यांना जादा खाद्य पुरविण्यासाठी जबाबदार असलेले दोन कर्मचारी अनुक्रमे श्री. तोताडे पी. बी. व श्री. सी. आर. कुलकर्णी या दोघांचा कडून ही अनुक्रमे रुपये १२३४२ /- व रुपये ८००० /- इतकी रक्कम शासनातर्फे अनुक्रमे दिनांक

१२-०७-२००६ व १३-०६-२००६ रोजी वसूल करण्यात येऊन ती शासकीय कोषागारात भरण्यात आलेली आहे. सदर रक्कम शासकीय कोषागारात भरल्याबाबत कोषागाराच्या चलनाच्या प्रती जोडल्या आहेत.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने मुळात मागितलेल्या एकूण ७ मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ वगळता उर्वरीत सर्व माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. सदर माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या व्याख्येमध्ये बसत नाही. तथापि यातील मुद्दा क्रमांक १ ची माहिती या व्याख्येत मध्ये बसत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधितांनी भरलेल्या रक्कमेच्या चलनाच्या झेरॉक्स प्रती पुरविल्या आहेत. अर्थात ही माहिती त्यांनी अपिलार्थीस १० दिवस इतक्या विलंबाने पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी संबंधिताकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागविल्यानंतर संबंधितांनी सदर तुटीची रक्कम शासकीय कोषागारात जमा केली आहे. या प्रकरणी संबंधितांनी दिनांक १३-०६-२००६ व दिनांक १२-०७-२००६ रोजी शासकीय कोषागारात या रक्कमा जमा केल्याचे दिसून येते. याचा अर्थ अपिलार्थीने अर्ज करण्यापुर्वी एकाच अधिका-याने (श्री. कुलकर्णी यांनी) तुटीची रक्कम शासकीय कोषागारात भरली. तथापि श्री. तोताडे यांनी दिनांक १२-०७-२००६ रोजी म्हणजेच अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर भरल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, तुटीची रक्कम एकूण रुपये २३२४२ /- इतकी असतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या माहितीवरुन या तुटीच्या भरपाईप्रीत्यर्थ रुपये २०३४२ /- इतकीच रक्कम भरली गेली आहे.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीतपेक्षा १० दिवस इतक्या विलंबाने माहिती दिली आहे. अपिलार्थीने आपल्या युक्तिवादामध्ये जर त्यांनी अर्ज केला नसता तर जन माहिती अधिकारी व त्यांच्या सहका-यांनी सदर रक्कमेचा अपहार केला असता असा युक्तिवाद आयोगासमोर मांडला आहे. तथापि हा युक्तिवाद तार्किक मुद्दयावर केला असल्याने व त्याला वस्तुनिष्ठ पुरावा उपलब्ध नसल्याने हा पुरावा आयोग विचारात घेत नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची माहिती आयोगाला अधिकारिता नसल्यामुळे अपिलार्थीचा हा मुद्दा विचारात घेता येत नाही.

सुनावणी चालू असतांना जन माहिती अधिकारी सुनावणीसाठी उशीराने उपस्थित झाले. त्यांनी त्यांच्यातर्फे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती प्रापत करुन घेऊन घेण्यापोटीचे शुल्क रुपये ६ इतके भरण्याचे सूचित केले होते. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक ३१-०७-२००६ रोजी रुपये ८ इतक्या रक्कमेचा भरणा केला व त्याच दिवशी त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणासंबंधाने विचारणा केली असता, त्यांनी उर्वरीत रुपये २९०० /- इतकी रक्कम संबंधितांनी दिनांक १३-०९-२००६ रोजी शासकीय कोषागारात भरल्याचे आयोगास सांगितले. त्याप्रीत्यर्थ त्यांनी श्री. कुलकर्णी यांनी दिनांक १३-०९-२००६ रोजी शासकीय कोषागारात भरलेल्या रुपये २१५७२ /- इतक्या रक्कमेच्या

चलनाची प्रत आयोगासमोर सादर केली. त्यांच्या मताप्रमाणे श्री. कुलकर्णी यांच्याकडून व्हावयाच्या वसुलीबाबत रुपये २९०० /- इतक्या रक्कमेचा यामध्ये समावेश आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागितलेली माहिती अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यानंतर विहीत कालावधीत पुरविली आहे. अपिलार्थीने मागितलेली मुद्दा क्रमांक १ वगळता उर्वरीत माहिती "माहिती" या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही. जी माहिती या व्याख्येत बसते ती अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक शुल्काचा भरणा केल्यानंतर विहित मुदतीत पुरविली आहे हे पाहता, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| औरंगाबाद | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक १८-०१-२००८ | राज्य माहिती आयुक्त, |
| | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. नरेश निळकंठ धाबर्डे, नारळी बाग, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (पशूसंवर्धन), मध्यवर्ती अंडी उबवणूक केंद्र, पडेगाव, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशूसंवर्धन उप आयुक्त, खडकेश्वर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८३२

निर्णय दिनांक  १८-०१-२००८

श्री. रंगनाथ शंकर धोंगडे, : अपिलार्थी
बी-४, सुगंध हौसिंग सोसायटी, ज्योती स्टोअर
समोर, मुरकुटे कॉलनी, गंगापूर रोड,
नाशिक - ०२

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी
संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, सेंट्रल बिल्डींग,
पुणे - ०१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर आयुक्त, सहकारी संस्था, म. रा.
पुणे, व्दारा- सहकार आयुक्त व निबंधक सह.
संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे – ०१

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप निबंधक (आस्थापना), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे

जन अपिलीय अधिकारी : अपर निबंधक (आस्थापना), सहकार आयुक्त सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे

# <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रंगनाथ शंकर धोंगडे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक (आस्थापना) श्री. चंद्रशेखर मधुकर साळवी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक (आस्थापना) श्री. श्रीकांत गणेश जठार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक (आस्थापना) श्री. यशवंत परशूराम गिरी हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे आस्थापनाविषयक संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. शासन निर्णय कृषि व सहकार विभाग क्रमांक सीएसजी- १५७३/५९८०९/सी-३, दि. ४ सप्टेंबर १९७५ त्याखाली असलेल्या कार्यालयाच्या नोटींग सह. (लिखानासह)

२. मला आपल्या कार्यालयाने दिलेले पत्र जा. क्र. नेमणूक/वै(आरआरए)/ए-४/१९८७ दि. ३ जुलै १९८७ नुसार असे दिसते की, आपल्या कार्यालयाने जी. डी. सी. ॲण्ड ए. परिक्षेबाबत म. सुप्रिम कोर्टात दावा दाखल केला. त्या दाव्याचा नंबर व निकालाची तारीख (आपले पत्र दिनांक ३ जुलै १९८७ ची प्रत सोबत जोडली असे)

३.	म. मॅट, मुंबई यांचे आदेशावरुन मी आपणाकडे दि. १२-१-२००४ रोजी केलेल्या अर्जावर आपण शासनास पाठविलेल्या रिमार्कची प्रत.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी विचारलेल्या ३ मुद्यापैकी मुद्दा क्रमांक २ संदर्भातील माहिती वगळता उर्वरीत माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००६ रोजी घेऊन आपले आदेश त्याच दिवशी पारीत केले आहे. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थी यांच्या न्यायालयीन प्रकरणाबाबतची धारिका आस्थापना शाखेकडे उपलब्ध झाली नसल्याने अपिलार्थी यांचे अपील खारीज केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे. आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हणणे मांडले आहे की, त्यांनी मागणी केलेली सर्व कागदपत्रे सहकार

आयुक्त यांच्या कार्यालयातील "अ" या प्रवर्गातील असल्यामुळे व "अ" वर्गातील अभिलेखे कायमस्वरुपी जतन करुन ठेवावयाची असल्यामुळे त्यांनी मागितलेली माहिती सहकार आयुक्त यांचे कार्यालयात उपलब्ध असलीच पाहिजे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहिती मागितल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये एकूण २ मुद्दयावर माहिती दिली. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ संदर्भात त्यांच्याकडे व त्याचबरोबर त्यांच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे देखील अथक प्रयत्न करुन देखील त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती मिळू शकली नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती शोधण्याकरिता कोणतेही प्रयत्न त्यांनी बाकी ठेवले नाहीत. अंतीमतः त्यांनी ही माहिती विभागीय सह निबंधक सहकारी संस्था कोकण विभाग यांच्याकडून प्राप्त करुन अपिलार्थीस दिनांक ११-०१-२००८ रोजी या मुद्यावरील माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यांच्या युक्तिवादाप्रीत्यर्थ त्यांनी अपिलार्थीस स्पीड पोस्टने पाठविलेल्या त्यांच्याकडील दिनांक ११-०१-२००८ च्या पत्राची झेरॉक्स प्रत आयोगास दाखविली. यावरुन त्यांनी अपिलार्थीस दिनांक ११-०१-२००८ रोजी उर्वरीत माहिती दिल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर अपील त्यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००६ रोजी प्राप्त झाले. सदर अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक १७-०४-२००६ रोजी सुनावणी ठेवली होती तथापि सदर सुनावणीस अपिलार्थीस हे गैरहजर राहिले. सदर सुनावणीस जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते. सदर सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती हरत-हेने प्रयत्न करुन देखील त्यांना प्राप्त झाली नाही हा त्यांचा मुद्दा ग्राह्य धरुन त्यांनी सदरील अपिलावर दिनांक १७-०४-२००६ रोजी आपला निर्णय पारीत केला आहे.

वरील घटनाक्रम, सहकार खात्याच्या अधिका-यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, मुळात अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-१२-२००५ च्या अर्जाने मागितलेली माहिती ही १८ वर्षे इतकी जुन्या कालावधीशी संबंधीत होती. अपिलार्थीस, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहितीवरुन, आवश्यक असलेल्या ३ पैकी २ मुद्यावरील माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी क्रमांक २ च्या मुद्दयावरील माहिती त्यांना अपिलार्थीस त्वरीत पुरविता आली नाही याची कारणमिमांसा करतांना जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे विशद केले की, संबंधीत अपिलार्थी हे वर्ग-३ श्रेणीचे कर्मचारी होते व वर्ग-३, वर्ग-४ श्रेणीच्या आस्थापना विषयक बाबींसाठी विभागीय सह निबंधक हे निमंत्रक म्हणून नेमले गेले आहेत. वर्ग-३, वर्ग-४ च्या आस्थापना विषयक बाबीसंदर्भात निर्णय घेण्यासाठी संबंधीत सह निबंधक हे सक्षम प्राधिकारी म्हणून नेमले गेले आहेत. अपिलार्थीस त्यांच्या मुद्दा क्रमांक २ संदर्भातील माहिती देण्याकरिता सहकार विभागातील अधिका-यांनी हरत-हेने प्रयत्न केल्याचे आयोगासमोर सांगितले. व त्यापृष्ठ्यर्थ त्यांनी काही कागदपत्रे आयोगासमोर सादर केली. यावरुन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी व त्यांच्या सहका-यांनी जाणीवपूर्वक अथवा कोणत्याही असद्‌हेतुने टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे दिसून येत नाही. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. तथापि सदर माहिती अपिलार्थीस निश्चित पोहोचल्याची धारणा त्यांनी पक्की करावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती मिळाल्याची धारणा पक्की करावी.

औरंगाबाद
दिनांक १८-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रंगनाथ शंकर धोंगडे, बी-४, सुगंध हौसिंग सोसायटी, ज्योती स्टोअर समोर, मुरकुटे कॉलनी, गंगापूर रोड, नाशिक – ०२

२ जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक (आस्थापना), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर निबंधक (आस्थापना), सहकार आयुक्त सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८३४

निर्णय दिनांक १८-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी,<br>रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड,<br>बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा संसदीय कार्य विभाग, एम-४ विस्तार<br>इमारत, मंत्रालय, मुंबई – ३२ | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,<br>मंत्रालय, मुंबई – ३२ | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | अवर सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ |
| | जन अपिलीय अधिकारी | : | विशेष कार्य अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी व जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सहकार विभाग, मंत्रालय हे गैरहजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय श्री.

बसवराज संग्रामअप्पा यम्पल्ले (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे राज्य शासनाच्या संसदीय कार्य विभागाकडे १९६० ते २००५ या कालावधीतील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम (१०१) ची प्रस्तावना व उद्देश मिळणेबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये कलम १०१ चा समावेश करण्यासाठी व पुढे या कलमात वेळोवेळी सुधारणा करण्यासाठी विधि मंडळात राज्य सरकारने विधेयक मांडतांना जो प्रस्ताव सादर केला. ज्यात या कलमाचे व कलमातील वाढीव शब्द घातले किंवा वगळले याचा उद्देश स्पष्ट केला आहे. ती प्रस्तावना व त्यानंतरची सदरील अधिनियम मंजूर झाल्यावर ज्या क्रमांकाने अधिनियम या कलमात समाविष्ट केले ती अधिसूचना मिळावी.”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज संसदीय कार्य विभागास उद्देशून केला होता तथापि सदर प्रकरण सहकार व वस्त्रोद्योग विभागाशी संबंधीत असल्याने त्या विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा अर्ज सहकार विभागाकडे पाठविल्याचे त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

अपिलार्थीचा सदर अर्ज संसदीय कार्य विभागाकडून सहकार खात्यास दिनांक ०३-०२-२००६ रोजी प्रथमतः प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास सहकार खात्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी अपिलार्थीस असे कळविले की, “ त्यांनी मागितलेल्या माहितीचा कालावधी

१९६० ते २००५ असा असल्याने सदर माहिती कार्यालयीन अभिलेखातून त्वरीत उपलब्ध होऊ शकत नाही. सदर कागदपत्राचा शोध घेण्यात येत असून उपलब्ध झाल्यावर आपणास पाठविण्यात येईल. "

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक २८-०७-२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी हे हजर राहिले नाहीत. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती शोध घेऊनही त्यांचे विभागात उपलब्ध झाली नाही व सदर माहिती महाराष्ट्र विधी मंडळ सचिवालयाकडून त्यांना उपलब्ध होऊ शकेल. याकरिता त्यांनी सदर सचिवालयाशी संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले. अपिलाची सुनावणी कशा प्रकारची असू नये याचे हा सुनावणी निर्णय म्हणजे उत्तम नमुना आहे असे म्हटल्यास फारसे वावगे ठरु नये. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून ते नोंदवून त्यावर आपले अंतीम निर्णय पारीत करणे हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. याची जन अपिलीय अधिकारी यांनी नोंद घ्यावी व भविष्यात अशा प्रकारच्या चूका टाळाव्यात असे त्यांना आयोगातर्फे सुचविण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती

आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्याचे कारण त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज करुनही त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळाली नाही असे दर्शविले असून, त्यांनी या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगा-कडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्याकडील अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्या विभागातील सर्व कागदपत्रांची पाहणी करुन देखील त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध होऊ शकली नाही आणि अपिलार्थीचे अपील ठरवितांना ते जन अपिलीय अधिकारी म्हणून कार्यरत नव्हते.

वरील घटनाक्रम, सहकार विभागाच्या अधिका-यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जामध्ये जरी ४५ वर्षाच्या कालावधीतील माहिती मागितली असली तरी महाराष्ट्र सहकार कायदा १९६० यामध्ये १९६० ते २००५ या सालापर्यंत एकूण ५ वेळा दुरुस्त्या झाल्या आहेत. (१९६९, १९७१, १९७१, १९८६ व १९९०) अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या विभागातील कोणत्या प्रवर्गात मोडते याची उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना कल्पना नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. आता या प्रकरणी त्यांच्या विभागाने अपिलार्थीस संसदीय कार्य विभागाकडे अपिलार्थीस माहिती मागण्याची सूचना केली आहे. अपिलार्थीने संसदीय कार्य विभागाकडे सुरुवातीसच माहिती मागितली होती तथापि सदर माहिती संसदीय कार्य विभागाकडे नसल्याचे त्यांच्याकडील

दिनांक २५-०१-२००६ रोजीच्या पत्रावरुन ध्वनित होत आहे. माहिती सहकार विभागाशी संबंधीत असल्यामुळे, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्याकरिता सकारात्मक प्रतिसाद देण्याचे कर्तव्य सहकार विभागाचे होते. तथापि त्यांनी या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन सामान्यांस आवश्यक असणारी माहिती देण्यासंदर्भात शासनाचे विभाग एकमेकांकडे कशी टोलवाटोलवी करतात हे पाहावयाचे झाल्यास त्याचा हे प्रकरण उत्तम नमुना ठरते. विधेयकातील सुधारणा करण्या-संदर्भातील प्रस्तावाची वर्गवारी देखील सहकार विभागाच्या अधिका-यांना माहित नसावी ही दुर्दैवाची बाब आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सुनावणीचे पत्र प्राप्त होऊनही ते आज सुनावणीस वीनापरवानगी गैरहजर राहिले आहेत या बाबीसंदर्भात देखील आयोग तीव्र नापसंती व्यक्त करत आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन या प्रकरणी सहकार विभागाच्या जन माहिती अधिका-यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव दर्शविला आहे. (आयोगासमोरील सुनावणीस गैरहजर राहून).

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, सचिव, (सहकार) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावा-बद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत पाठवावा. अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी संसदीय कार्य विभागाकडे स्वतः वैयक्तीक संपर्क साधून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, संसदीय कार्य विभागाकडे स्वतः वैयक्तीक संपर्क साधून त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल सचिव, (सहकार) यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक १८-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामचंद्र दिनकर रत्नपारखी, रत्नकुंज निवास, जवाहर कॉलनी, नगर रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई –

३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सहकार विभाग) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८६३
निर्णय दिनांक-१८ जानेवारी, २००८.

१ श्री.अरुण रंगनाथ म्हेत्रे, : अपिलार्थी
मु.पो.सारोला, तालूका-तुळजापूर
जिल्हा-उस्मानाबाद.

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय,
सारोला, तालूका- तुळजापूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा :
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, तुळजापूर.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- १८-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.अरुण रंगनाथ म्हेत्रे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सारोला, श्री.बोंदर दत्तात्रय विश्वनाथ (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,

पंचायत समिती, तुळजापूर, बाबुराव अंबाजीराव साळुंके (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- २५-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३ ते २००६ या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागविली होती.

"१. सन २००३ ते २००६ मध्ये ग्रामपंचायत फंडातून (क्र.ङ.इ.) केलेल्या कामाच्या लेखी हिशोबासह तपशील मिळावा.
२. मागासवर्गातील वस्तीत पाईपलाईन व पाण्याची टाकीचे काम कोणत्या प्रकारे केले, याचा लेखी हिशोबासह खुलासा द्यावा.
३. पाणी पुरवठा विहिरी जवळील सिंमेट बधा-याचे काम कोणत्या प्रकारे केले.
४. मागासवर्गातील स्मशान भुमीचे काम (बांधकाम) कोणत्या प्रकारे केले ."

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकाराचा प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०७-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-२१-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामूळे आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून अपीलाची सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक- २५-०१-२००७ रोजी माहितीची मागणी केली होती. तथापि ती माहिती पुरविण्यापूर्वीच त्यांचा दिनांक- ०४-०२-२००७ रोजी अपघात झाल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही. तद्नंतर त्यांनी त्यांचा कार्यभार श्रीमती. ए.डी. जोल्हे, ग्रामसेविका यांच्याकडे सुर्पूद केला होता व तत्कालीन ग्रामसेविका यांनी अपिलार्थी यांच्याकडून दिनांक- २०-०२-२००७ रोजी अपिलार्थी यांच्याकडे ३ महिन्याची मुदतवाढ मागितली होती व तसेच अपिलार्थीस त्यांनी दिनांक- ०४-०६-२००७ रोजी व्यक्तीशः त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दिली असून ही माहिती मिळाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने त्यांचेकडील पत्रावर स्वाक्षरी केली आहे. सदर पत्र त्यांनी आयोगास दाखविले.

जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारचे सुनावणी घेतली नाही. याचे कारण त्यांना आता सांगता येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्या बाबत जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक- १५-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले होते. याची प्रत अपिलार्थीस ग्रामसेवकामार्फत दिली होती.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पहाता, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अमंलबजावणीच्या संदर्भात ग्रामीण भागामध्ये जिल्हापरिषद प्रशासनामध्ये खालच्या पातळीवर कशा प्रकारचे गैरसमज आहेत, यावर प्रकाश पडेल. माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी सुरु होऊन दोन वर्षाहून जास्त कालावधी लोटूनही अद्यापही शासकीय यंत्रणेमध्ये या खात्याच्या अंमलबजावणी संदर्भात आवश्यक ती जागरुकता आली नसल्याचे दिसते. कदाचित माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीची अंमलबजावणी संबंधाने त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण मिळाले नसल्याने असे प्रकार घडू शकतात. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक- २५-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) प्रमाणे ३० दिवसात म्हणजेच दिनांक- २४-०२-२००७ पूर्वी कार्यवाही करणे भाग होते. जरी उपस्थित जन माहिती अधिकारी त्यावेळी कार्यरत नव्हते तर त्यावेळी त्यांचा कार्यभार श्रीमती. ए. डी. जोल्हे, ग्रामसेविका यांच्याकडे त्यांनी दिला होता. त्यामूळे त्यांनी प्रामुख्याने अशी कार्यवाही करणे माहिती

अधिकार अधिनियमातील तरतुदी प्रमाणे अभिप्रेत होते. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा निर्णय जन माहिती अधिकारी यांनी न कळवून माहिती अधिकार अधिनियमामधील कलम ७ (१) चा भंग केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर अपिलार्थीस या प्रकरणी विहित कालावधीमध्ये कोणताही निर्णय दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या वर्तनाने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील १९ (६) चा भंग केल्याचे दिसून येते. अधिनियमातील तरतुदीचा भंग त्यांच्यातील अज्ञानाने झाला असावा, गट विकास अधिकारी अशा महत्वाच्या पदावर कार्यरत असणा-या अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीचे आवश्यक ते ज्ञान नसावे, हेही गट विकास अधिकारी संवर्गाचे व पर्यायाने जिल्हा परिषद उस्मानाबादचे दुर्दैव आहे, असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जावर अधिनियमा व्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही निर्णय न देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई सिध्द केली असल्याने ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतूदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पहाता, अपिलार्थीने एकूण ४ मुद्दांवर माहिती विचारल्याचे दिसून येते. यापैकी मुद्या क्रमांक १ मध्ये ‘‘केलेल्या कामाचा लेखी हिशोबासह तपशील’’ ही अपिलार्थीने मागितलेल्या माहिती मध्ये मोघम व संदीग्ध स्वरुपाची माहिती आहे असे दिसून येते. उर्वरित ३ मुद्यांव्दारे त्यांनी विचारलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे/स्पष्टीकरण अपेक्षित करणा-या स्वरुपाची होती.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

> ‘‘(च) ‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने,ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रानिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.’’

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुलतः वर स्पष्ट केल्याप्रमाणे ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येत बसत नसल्यामूळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्याजोगे आहे, अशा

निर्णयाप्रत आयोगा आला आहे. अपिलार्थीचे अपील जरी फेटाळण्यायोग्य असल्याचा निर्णय आयोगाने घेतला असला तरी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाई बद्दल त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. सबब असे आदेशीत करण्यात येते की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अहवाल आयोगास सादर करावा व जन अपिलीय अधिकारी यांच्याही अशाच कार्यशैलीची नोंद त्यांनी यथायोग्यरित्या घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी, दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाई बद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्नंतर १ महिन्याच्या आत आपला अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक-१८-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्री.अरुण रंगनाथ म्हेत्रे, रा.सारोला, तालूका-तुळजापूर, जिल्हा-उस्मानाबाद.
२. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, सारोला, ता.तुळजापूर, जिल्हा-उस्मानाबाद,

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, तुळजापूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, उस्मानाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००८/रामाआ/तक्रार/सिआर/१४७

निर्णय दिनांक १८-०१-२००८

१ श्री. लक्ष्मण गणपतराव दासरे, : तक्रारदार
हेंगणे निवास, शिवनगर, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा शिक्षणाधिकारी (मा), जि.प.लातूर

# निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. लक्ष्मण गणपतराव दासरे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, लातूर ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) यांचे प्रतिनिधी उपशिक्षणाधिकारी श्री. शिवाजी वामन चंदनशिवे हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदाराने शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद, लातूर यांनी राज्य माहिती आयोगाने त्यांना दि. ३१.८.२००७ च्या निकालपत्रकान्वये आदेश देऊनही त्यानुसार काहीही कार्यवाही केली नसल्यासंदर्भात राज्य माहिती आयोगाकडे दि. १.१२.२००७ रोजी तक्रार केली आहे.

या प्रकरणी तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.११.२००७ च्या अर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, राज्य माहिती आयुक्तांनी आदेश देऊनही शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. लातूर यांनी

आयोगाचे आदेशाप्रमाणे कोणतीही कार्यवाही केली नाही, सदर तक्रारीची नोंद राज्य माहिती आयोगाचे मुंबई कार्यालयामध्ये दि. १.१२.२००७ रोजी झालेली आहे. राज्य माहिती आयोगाने दि. ३१.८.२००७ रोजी आदेशित केल्याप्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी आयोगाचे आदेश पारीत झाल्यानंतर आदेशात नमुद केल्याप्रमाणे पुढील १ महिन्यात काय कार्यवाही केली, याबाबत उत्तरवादी यांचे प्रतिनिधीस विचारले असता, सदरील आदेशानंतर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याबाबत, त्यांनी आयोगासमोर कबूल केले.

राज्य माहिती आयुक्तांनी आदेश देऊनही, त्याचप्रमाणे शिक्षण उपसंचालक, लातूर यांनी दि. २६.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तरवादी यांना कळवूनही उत्तरवादी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. आयोगाने दिलेल्या आदेशातील सूचनांचे पालन उत्तरवादी यांनी केले नसल्यामुळे, माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचे पालन न करुन आपले कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. उत्तरवादी यांना अशाप्रकारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल, शिक्षण संचालक, म.रा.पुणे यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे त्यांच्यावर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२ शिक्षण संचालक, म.रा. पुणे यांनी उत्तरवादी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर हे आदेश निर्गमित होताच प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही दोन महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा,

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०१-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मण गणपतराव दासरे, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८०८

निर्णय दिनांक २१-०१-२००८

१ श्री. दत्ता संपत निकम, : अपिलार्थी
२५, मेघदूत शॉपींग सेंटर, सी. बी. एस. समोर,
नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नाशिक महानगरपालिका, नासिक

२ जन माहिती अधिकारी
तथा नाशिक महानगरपालिका, नासिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप आयुक्त (अतिक्रमण), नाशिक महानगरपालिका, नाशिक
जन अपिलीय अधिकारी : आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दत्ता संपत निकम व जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (अतिक्रमण), नाशिक महानगरपालिका श्री. मुकूंद केरोपंत झिटे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील, भुयारी

मार्गाजवळील हातगाड्याविषयी त्यांनी दिनांक २७-१०-२००५ रोजी केलेल्या अर्जासंदर्भात मनपातर्फे करण्यात आलेल्या कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती.

अपिलार्थी यांनी केलेला सदर माहितीसाठीचा अर्ज त्यांच्या कार्यालयास दिनांक ०३-०१-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे, मनपाच्या लिपिकाने अपिलार्थी यांच्या अर्जावर दिलेल्या सही शिक्यावरुन दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना विहित मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०४-२००६ रोजी घेऊन अपिलार्थीने केलेल्या अर्जासंदर्भात उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी आवश्यक ती कारवाई करुन अपिलार्थीस यथायोग्य उत्तर देण्यात यावे असे आदेश पारीत करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

अपिलार्थीने या व्दितीय अपिलामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी ३० दिवसात उत्तर न देऊनही त्यांच्यावर शास्ती लावली नसल्याचे कारण हे व्दितीय अपिल करण्यासंदर्भात नमूद केले आहे.

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी ३० दिवसात माहिती न कळविल्याबद्दल कोणत्याही प्रकारची शिक्षा अथवा दंड त्यांना लावलेला नाही, अर्जदार यांना उत्तर देण्यात यावे असा चुकिचा व अर्जदाराने मागणी न केलेल्या मागणीचा हुकूम केला व चुकिच्या पध्दतीने त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले असल्याने, जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या झालेल्या चुकिपासून वाचविण्याचा प्रयत्न करीत असल्याने, जन अपिलीय अधिकारी यांचा प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय बेकायदेशीर ठरवून संबंधीत जन माहिती अधिकारी यांना दिनांक १९-०४-२००६ पावेतो प्रत्येक दिवशी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्याची कारवाई करण्यासाठी आयोगास विनंती केलेली आहे. याचबरोबर त्यांनी, त्यांना झालेल्या त्रासाबद्दल व आजपावेतो झालेल्या प्रवासखर्च व कागदपत्र खर्च म्हणून भरपाई देण्याबाबत हुकूम देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०३-०१-२००६ रोजीच्या अर्जावर आयुक्त, महानगरपालिका नाशिक यांनी दिनांक ०४-०१-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात सूचित केले. आयुक्त यांचे सुचनेनुसार अपिलार्थीस त्यांनी दिनांक १९-०४-२००६ रोजी उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व वरील घटनाक्रम पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मुलतः त्यांनी दिनांक २७-१०-२००५ रोजी केलेल्या तक्रारी संदर्भातील कारवाईची माहिती दिनांक ०३-०१-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितली होती. सर्वसाधारण परिस्थितीमध्ये ही माहिती त्यांना दिनांक ०२-०२-२००६ रोजी मिळणे अपेक्षित होते. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०४-२००६ रोजी माहिती देऊन अपिलार्थीस माहिती देण्याप्रीत्यर्थ एकूण ७५ दिवसांचा विलंब लावलेला आहे. अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज प्रथमतः आयुक्त, महानगरपालिका नाशिक यांच्याकडे प्राप्त झाला. आयुक्त महानगरपालिका यांनी सदर अर्ज म्हणजे त्यांच्याकडे केलेले अपील समजून त्यांनी अपिलाची सुनावणी दिनांक १०-०४-२००६ रोजी घेऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेश त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०४-२००६ रोजीच्या पत्राव्दारे दिले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०४-२००६ रोजी त्यांना अपेक्षित असलेली माहिती दिली. या प्रकरणी आयुक्त महानगरपालिका यांनी अपिलार्थीच्या अर्जाचे काळजीपूर्वक वाचन केले असते तर अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यास लागलेला विलंब त्यांना टाळता आला असता. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती मिळण्याप्रीत्यर्थ अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज म्हणजे अपील अर्ज समजण्याची आयुक्त महानगरपालिका नाशिक यांची कृती चुकिची असून त्यांच्या कार्यालयाने केलेल्या चुकिमुळे अपिलार्थी हे माहिती मिळण्यापासून ७५ दिवस वंचित राहिले.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांचा विहित मुदतीत माहिती मिळण्याचा हक्क असूनही त्यांना या हक्कापासून ७५ दिवस वंचित ठेवण्यास नाशिक महानगरपालिकेतील जे जबाबदार कर्मचारी अधिकारी या सर्वांना या प्रकरणी, त्यांनी कोणत्याही वैध कारणा शिवाय अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे (७५ दिवसाकरिता) एकूण रुपये १८७५० /- (अक्षरी- रुपये आठरा हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एका ३० दिवसाच्या आत एक हप्त्यात भरावी.

संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांनी यथायोग्यरित्या करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठवावा. सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरल्याची आयुक्त महानगरपालिका, नाशिक यांनी खात्री करुन घ्यावी व हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

अपिलार्थीस झालेल्या कथित त्रासाबद्दल व या प्रकरणी त्यांना आलेल्या खर्चाबाबत कोणताही पुरावा आयोगासमोर उपलब्ध नसल्याने, कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी व ही माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे इतर सहकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे (७५ दिवसाकरिता) एकूण रुपये १८७५० /- (अक्षरी- रुपये आठरा हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात उल्लेख केल्याप्रमाणे करावा.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्यामध्ये या शास्तीच्या रकमेची विभागणी आयुक्त, महानगरपालिका, नाशिक यांनी यथायोग्यरित्या करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत पाठवावा.

४. सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरल्याची आयुक्त महानगरपालिका, नाशिक यांनी खात्री करुन घ्यावी व हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक २१-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्ता संपत निकम, २५, मेघदूत शॉपींग सेंटर, सी. बी. एस. समोर, नाशिक
२ जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (अतिक्रमण), नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ वरिष्ठ कोषागार अधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८२६

निर्णय दिनांक २२-०१-२००८

१ श्री. विष्णूदास भगवानदास भुतडा, : अपिलार्थी
"तेजेश निवास" रविंद्रनाथ टागोरनगर,
राजस्थान शाळेच्या पाठीमागे, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर

२ अध्यक्ष, पशूपक्षी क्रुरता निवारण संस्था, उदगीर,
यशोदिप अशोकनगर, उदगीर, जिल्हा लातूर

३ जन अपिलीय अधिकारी
तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विष्णूदास भगवानदास भुतडा व अध्यक्ष, पशूपक्षी क्रुरता निवारण संस्था हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद श्री. अनिल हरिहर मुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी

असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय श्री. सोमनाथ गुंजाळ हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नगरपरिषद जनावरांच्या कोंडवाड्यातील जनावरे त्यांच्या मालकास देण्याच्या पध्दतीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. नगरपरिषद जनावरांचा कोंडवाडा.

२. कोंडवाड्यातील जनावराची माहिती त्यांच्या मालकास देण्याची तरतूद व पध्दती.

३. एस. पी. सी. ए. उदगीर सोबतचा संपूर्ण करार व या संस्थेस दिलेला अधिकार इतर सर्व बाकीची माहिती. त्यांच्यावर नियंत्रणाबाबत माहिती.

४. कोंडवाड्यात जनावरची उपासमार बाबत.

५. भेदभावपूर्ण दंड वसुली.

६. माझी घरी प्लॉटवर बांधलेली गाय २ वासरे कोण सोडून कोंडवाड्यात आणले त्याची माहिती दिली का ? त्याचा दंड कोणत्या प्रकारे वसुली केली / करत आहे.

७. दंड वसुली रजिस्टर व पावत्याची नोंद. एस. पी. सी. ए उदगीर सोबतचा करारापासून विशेष सन २००६ दंड वसुली रजिस्टर."

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीस नगर परिषदेकडून, नगरपरिषदेने एस. पी. सी. ए. या सस्थेशी कोंडवाड्यातील जनावरासंबंधात केलेल्या करारनाम्याची प्रत हवी असल्याचे, तद्वतच जनावराच्या मालकांना केलेल्या दंडाची तपशील उदा. पावती क्रमांक, रक्कम हवी असावी असे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने याच माहितीसाठीचा अर्ज अध्यक्ष पशूपक्षी क्रुरता निवारण संस्था उदगीर यांच्याकडे देखिल दिनांक २४-०४-२००६ रोजी केलेला दिसून येतो.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०६-२००६, ०६-०७-२००६ व १५-०७-२००६ या ३ सुनावण्या घेऊन आपले आदेश दिनांक २८-०७-२००६ रोजी पारीत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे सदर अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे आदेशीत केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली. सदर माहिती अपिलार्थीस त्यांच्या शिपायामार्फत व्यक्तिशः दिनांक १२-०८-२००६ रोजी देण्यात आली असे नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत त्यांनी एक वेगळे पत्र देऊन त्यामध्ये नगरपरिषद लातूर यांच्याकडे तोंडी व लेखी तक्रार करुनही कोंडवाड्यातील जनावरांची खरी माहिती

त्यांना प्राप्त झाली नाही. गोरगरिबांकडून त्यांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांच्याकडून दंडापोटी हजारो रुपये वसूल केले तसेच कोंडवाड्यातील गायी चोरीस गेल्या असे नगरपरिषदेतर्फे दाखविण्यात आले असे नमूद करुन या प्रकरणाची दखल घेण्याची आयोगास विनंती केली आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीचे समाधान झाले नसल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०८-२००६ रोजी त्यांच्याकडील पत्र दिनांक ०४-०८-२००६ अन्वये त्यांनी मागितलेली पूर्ण माहिती पुरविली आहे. अपिलार्थी यांनी सदर माहिती खोटी असल्याचा जो दावा केला आहे तो वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यानी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये निर्णय दिलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व वरील घटनाक्रम पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०४-२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे दिनांक २३-०५-२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अभिप्रेत होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०४-०८-२००६ रोजी म्हणजेच अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा एकूण ७३ दिवसाच्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिका-यांना फारसे अवघड नव्हते. एवढे असूनही अपिलार्थीस त्यांना अपेक्षित

असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करण्यास भाग पाडले. अपिलार्थीस विहित मुदतीत कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्याचे या ठिकाणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस त्यांनी जी माहिती देऊ केली आहे ती पाहता त्यामध्ये जनावर मालकाकडून नगरपरिषदेकडे भरलेल्या दंडाच्या पावतीचे क्रमांक दिसून येत नाही. अपिलार्थीने नेमके नगरपरिषदेच्या या वैगुण्यावर त्यांच्या राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये बोट ठेवले आहे. जनावरे मालकाकडून प्राप्त झालेला दंड नगरपरिषदेने त्यांच्या तिजोरीत भरला किंवा कसे हे कळण्यास आजमितीस काही मार्ग नाही. सदर तपशील अपिलार्थीस न कळवून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याचे देखील येथे सिध्द होत आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ७३ दिवस इतक्या विलंबाने अर्धवट माहिती पुरविल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ७३ दिवसाच्या विलंबाने पुरविलेल्या अर्धवट माहितीबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण (७३ दिवसाकरिता) रुपये १८२५० /- (अक्षरी- रुपये आठरा हजार दोनशे पन्नास इतकी) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. अपिलार्थीस विलंबाने व अर्धवट माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य

परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (नगरविकास) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळवून देण्याच्या दृष्टीने असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील दंड वसुलीच्या पावत्यांचा तपशीलासंदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी उर्वरीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने दिलेल्या अर्धवट माहितीबद्दल रुपये १८२५० /- (अक्षरी- रुपये आठरा हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४. सचिव (नगरविकास) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत

होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २२-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विष्णूदास भगवानदास भुतडा, "तेजेश निवास" रविंद्रनाथ टागोरनगर, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. त्रिंबक कासार, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, लातूर - सध्या सहाय्यक संचालक, नगरपरिषद संचालनालय, वरळी, मुंबई) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, पशूपक्षी क्रुरता निवारण संस्था, उदगीर, यशोदिप अशोकनगर, उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, (नगरविकास), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८४०

निर्णय दिनांक    २२-०१-२००८

१ श्री. दे. म. अकोलकर, : अपिलार्थी
३३ (अ) "रेणूका" छत्रपतीनगर, गारखेडा
परिसर, औरंगाबाद – ४३१ ००५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय,
म. रा. नवी मुंबई

२ जन अपिलीय अधिकारी
तथा रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय,
म. रा. नवी मुंबई

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहाय्यक संचालक, रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय, ३ रा माळा, कोकण भवन, नवी मुंबई

जन अपिलीय अधिकारी : प्रभारी उप सहाय्यक संचालक, रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय, ३ रा माळा, कोकण भवन, नवी मुंबई

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. दे. म. अकोलकर व जन अपिलीय अधिकारी तथा प्रभारी उप सहाय्यक संचालक, रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय हे

गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय श्री. गंगाराम अनाजी सांगडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील आस्थापनाविषयक बाबी संदर्भात खालील प्रमाणे ७ मुद्दयावर माहिती मागितली होती.

१. क. से. अ. पदापर्यत विभागीय पातळीचा स्तर गृहीत धरला जातो मात्र या पदांच्या पदोन्नतीचे आदेश राज्यपातळीवरुन एकाच ठिकाणाहून - संचालनालयातून निघतात अशा वेळी प्रसंगोपात राज्यातील सर्व विभागात एकाच वेळी क. से. अ. ची पदे रिक्त झाल्यास ही पदे संचालनालयाने एकाच वेळी भरणे नियमानुसार योग्य आहे वा कसे.

२. पद भरतीचा संचालनालयाचा प्रशासनिक अधिकार १९८४ मध्ये संचालनालयाने राज्यतील क. से. अ. ची पदे भरतांना दि. ०६-०४-८४ रोजी मुंबई विभागातील तर २ महिण्याने ०६/८४ रोजी राज्यातील विभागातील क. से. अ. पदी भरतीचे आदेश काढलेत त्यामुळे एकाच आदेशान्वये सेवाजेष्ठता, जन्मतारीख आधीच्या लाभानुसार क. से. अ. पदी राज्यस्तरीय जेष्ठता सूचित मुंबई सोडून अन्य विभागाचे कर्मचा-यांवर अन्याय झाला तो तसे करण्याचा संचालनालयास प्रशासकिय अधिकार आहे काय ?

३. राज्यत मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती व औरंगाबाद हे ६ महसुली विभाग आहेत - शासनाच्या या पध्दतीप्रमाणेच राज्यातील सर्व खाते कामे करतात मात्र रो व स्वरो खात्यात बृन्हमुंबई हा स्वतंत्र विभाग धरुन अन्यायकारी कार्य केल्या जातात

त्यास शासनाची मान्यता आहे का ? शासनाने कोणाच्या जी. आर. नुसार हा विभाग स्वतंत्र घोषित केला आहे -

४. संचालनालयाने दि. ३१-०५-९४ रोजी परिपत्रक काढून एका विभागाचा कर्मचारी दुस-या विभागात स्वविनंतीवरुन बदलून गेल्यास ते बदलीच्या ठिकाणी रुजू होईल त्या दिनांकापासून त्यांची त्या विभागात जेष्ठता गृहीत धरली जाईल असे निर्देश दिलेले आहेत काय ?

५. संचालनालयाचा आदेश क्र. सेसं-आस्था/औ/२३६३७ दिनांक २१-०९-८४ व्दारे श्री. एस. जी. जोशी क. से. अ. वर्धा (नागपूर विभाग) यांची परभणी (औरंगाबाद विभाग) येथे त्यांच्या स्वविनंतीवरुन बदली केली असता ते या विभागात रुजू झाल्यापासूनची त्यांची संचालनालयाने जेष्ठता धरली नाही. संचालनालयाच्या परिपत्रकाचा संचालनालय कोणताही अर्थ लावू शकते असा प्रशासनिक अधिकार असल्यास नियम कोणते ?

६. सा प्र वि चा शा. नि. क्र. BCC-1072-J, दिनांक २३-०५-७४ नुसार रोष्टर पदोन्नती पध्दती सुरु झाली त्यानुसार या विभागातील श्री. टि. एल. साळवे या अ. जा च्या कर्मचा-यास क. से. अ. पदी जेष्ठता डावलून रोष्टर नुसार दिनांक १६-८-७४ ला पदोन्नती देण्यात आली - संचालनालयानेही पत्र क्र. DE III /20/Roster/ 6124-69, दि. २७-०२-७६ नुसार रोष्टरची राज्य-स्तरीय माहिती प्रकाशित केली – तेव्हा संचालनालयात क. से. अ. पदाची रोष्टर स्थिती दर्शविणारे रजिस्टर राज्यस्तरीय पातळीवर ठेवले आहे वा विभागीय स्तरावर -

७. विभाग स्तरावर ठेवले असल्यास १९७४ पासून १९९६ पर्यतची पदोन्नती साठी देय होणारी ५० बिंदु नामावलीची माहिती -

| अ. क्र. | बिंदु क्र. | प्रवर्ग | प्रत्यक्षात पदोन्नती दिलेल्या कर्मचा-याचे नांव | प्रवर्ग | दिनांक | अभिप्राय असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | अ. जा. | श्री. टि. एल. साळवे | अ. जा. | १६-०८-७४ | रोष्टर नुसार पदोन्नती दिली |

अपिलार्थीने सदर माहिती टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती मुद्दा क्रमांक २, ३, ४ व ५ सोडून इतर मुद्दयावर काही माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. ज्या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही ती सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेख्यात उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी या पत्रात म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये आदेश पारीत केले. सुनावणीचा निश्चित दिनांक उपस्थित जन माहिती अधिकारी हे आयोगास सांगू शकले नाहीत. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या पत्रामध्ये दिलेली माहिती योग्य असल्याचा निर्णय दिला आहे. थोडक्यात अपिलार्थीचे अपील जन अपिलीय अधिकारी यांनी नामंजूर केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी बरेच प्रयत्न करुनही मुद्दा क्रमांक २, ३, ४ व ५ ची माहिती त्यांना त्यांच्या कार्यालयामध्ये सापडू शकली नाही. तथापि आता ते अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ७ ची माहिती १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास त्यांनी विहित मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला आहे. त्यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार अशाच प्रकारची माहिती त्यांच्याकडून मागवित असतात. अपिलार्थीच्या वारंवार अशाच प्रकारची माहिती वेगवेगळ्या अर्जाव्दारे मागण्याच्या सवयीबाबत आयुक्त, रोजगार, स्वंय रोजगार यांनी देखील मुख्य माहिती आयुक्त यांना त्यांच्याकडील दिनांक १२-०४-२००७ च्या पत्राने कळविले आहे. अपिलार्थीचे हस्ताक्षर त्यांना समजत नाही त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी बोलावले असता अपिलार्थी त्यावेळी चर्चेस उपस्थित रहात नाहीत. अपिलार्थी यांना देण्यासाठी ज्या ज्या वेळी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या कमी असते अशा वेळेस अपिलार्थीस त्यांनी विनामूल्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती न देणे किंवा त्यासाठी मुद्दामहून टाळाटाळ करणे असा त्यांचा उद्देश कधीही नव्हता.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी केलेल्या अर्जात एकूण ७ मुद्दयावर माहिती मागविली आहे. या ७ मुद्यापैकी मुद्दा क्रमांक ७ वगळता उर्वरीत ६ मुद्दयावर अपिलार्थीने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची अथवा जन माहिती अधिकारी यांच्याकडून अभिप्राय अपेक्षित करणारी आहे. उदा. सर्व पदे संचालनालयाने एकाच वेळी भरणे हे नियमानुसार योग्य आहे किंवा कसे, मुंबई सोडून अन्य विभागाच्या कर्मचा-यांवर अन्याय झाला तो तसा करण्याचा संचालनालयास प्रशासकीय अधिकार आहे काय, अन्यायकारी कार्ये केले म्हणून त्यास देण्याची मान्यता आहे काय, शासनाने कोणत्या जी. आर. नुसार हा विभाग स्वतंत्र घोषित केले आहे व एका विभागाचा कर्मचारी दुस-या विभागात स्वविनंतीवरुन बदलून गेल्यास तो बदलीच्या ठिकाणी रुजू होईल त्या दिनांकापासून त्यांची त्या विभागात जेष्ठता गृहीत धरली जाईल असे निर्देश दिलेले आहेत काय. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये अशा प्रकारे मुख्यत्वेकरुन जन माहिती अधिकारी यांचा खुलासा व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे, जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केलेल्या, ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही.

**कलम २ (च)**

‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही

कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा बराच भाग " माहिती " या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून रोष्टरसंदर्भात काही माहिती मागविली आहे ती मात्र वर वर्णिलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येत बसते. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आजतागायत दिल्याचे दिसून येत नाही. याचाच अर्थ अपिलार्थीस त्यांनी दिनांक २६-०७-२००६ रोजी दिलेल्या उत्तराव्दारे अर्धवट माहिती पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीने केलेल्या अपील अर्जामध्ये विचारपूर्वक लक्ष घालून निर्णय न देता जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राह्य धरले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर काळजीपूर्वक विचार केला असता तर कदाचित अपिलार्थीस अपेक्षित माहिती मिळू शकली असती. तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जाकडे लक्ष देण्याचे कारण नाही असे कदाचित जन अपिलीय अधिकारी यांना त्यावेळी वाटले असावे व या भूमिकेतून त्यांनी अपिलार्थीच्या या अपिलावर निर्णय घेतला असावा असा आयोगाचा अंदाज आहे.

अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ ची माहिती उपस्थित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस आता १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार असल्याचे त्यांनी आयोगासमोर शपथपत्र सादर केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ ची संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या उर्वरीत मुद्दयावर वर स्पष्ट केल्या-प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याची आवश्यकता नाही. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन आपल्या

कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. तेव्हा सचिव (रोजगार, स्वंयरोजगार) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ ची माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (रोजगार, स्वंयरोजगार) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २२-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दे. म. अकोलकर, ३३ (अ) “रेणूका” छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद – ४३१ ००५

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय, ३ रा माळा, कोकण भवन, नवी मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रभारी उप सहाय्यक संचालक, रोजगार व स्वंयरोजगार संचालनालय, ३ रा माळा, कोकण भवन, नवी मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (रोजगार, स्वंयरोजगार) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८४२

निर्णय दिनांक २२-०१-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मोहमद अन्वरउल्ला खॉन पि. मो. बरकतउल्ला खॉन, घर नं. ९-४-४५५, खयूम प्लॉट्स, मॅफको रोड, नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड | : | प्रतिवादी |

निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहमद अन्वरउल्ला खॉन पि. मो. बरकतउल्ला खॉन हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ श्री. मं. अब्दुल मुजीब (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ श्री. सुनिल अण्णासाहेब वांढेकर (यापुढे त्यांना जन अपिलीय

अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ श्री. मो. अ. हादी अन्सारी हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील संगणकीकरणासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. आपल्या मंडळा अंतर्गत (सर्व विभागीय कार्यालयासह) संगणकीकरण केव्हापासून लागू करण्यात आले ?

२. संगणीकरण करीता शासनाचा किती खर्च झाला ?

३. संगणकीकरण झाल्यामुळे शासनास किती व कोणत्या स्वरुपात फायदा झाला.

४. संगणकीकरणामुळे प्रशासकिय व क्षेत्रीय कामात किती व कसा फायदा शासनास मिळाला.

५. संगणीकरणामुळे कार्यालयीन / क्षेत्रीय कामाचा व्याप कमी किंवा जास्त झाला व संगणीकरणामुळे कार्यालयीन / क्षेत्रीय कामावरील आवश्यक मनुष्यबळावर कोणता परिणाम झाला म्हणजे आवश्यक मनुष्यबळ कमी करुन ही कामे करणे सोईस्कर झाले ?

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या अर्जासंदर्भात उत्तर दिले आहे. यामध्ये त्यांनी अपिलार्थीने विशिष्ट माहितीची मागणी करणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित असल्याचे कळविले होते व त्याचबरोबर माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीत पारदर्शकता असण्याच्या दृष्टीने अपिलार्थीस काही माहिती पुरविल्याचे म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण, दिशाभूल करणारी व खोटी माहिती दिली असल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या अपील अर्जावर निर्णय दिला. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी केलेली कारवाई योग्य असल्याचे म्हटले आहे. थोडक्यात अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निश्चित निर्णय न देता अपिलार्थीचे अपील निकाली काढल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. त्यामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सुनावणीसाठी न बोलाविता एकतर्फी निर्णय दिल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. तद्वतच जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. मो. अ. हादी अन्सारी) यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असून ती

माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी देणे अपेक्षित नाही. एवढे असूनही त्यांनी अपिलार्थीने मागितलेली व त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थीस विहीत मुदतीत पुरविली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या खचा-संदर्भातील माहिती विषयी त्यांनी नांदेड मंडळाच्या अधिपत्याखालील सर्व विभागास पत्र लिहिले असून त्याची प्रत अपिलार्थीस दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या अधिपत्याखालील विभागाकडून अपिलार्थीस संगणकीकरणाच्या कामासाठी करण्यात आलेल्या खर्चाची माहिती पुरविण्यात आलेली आहे. सदर माहिती अपिलार्थीस नांदेड विभागातर्फे दिनांक १४-०१-२००८ रोजी, भोकर सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे दिनांक १४-०१-२००८ रोजी, परभणी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे दिनांक ११-०१-२००८ रोजी, हिंगोली सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे दिनांक १८-०१-२००८ रोजी व मार्गप्रकल्प विभाग नांदेड विभागातर्फे दिनांक १७-०१-२००८ रोजी माहिती पुरविली आहे. तद्वतच संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर विहित मुदतीत निर्णय दिल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता मुलतः अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे स्पष्ट केलेल्या कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या व्याख्येमध्ये बसत आहे किंवा कसे याचा विचार करणे आयोगास जरुरीचे वाटते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये ‘‘माहिती’’ या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे केली आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

"माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने माहिती प्रामुख्याने प्रश्नार्थक स्वरुपात मागितलेली असून मुद्दा क्रमांक २ वगळता अपिलार्थीने मागितलेली माहिती वरील व्याख्येत बसत नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने विचारलेली मुद्दा क्रमांक २ संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या वेगवेगळ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती. तथापि संबंधीत कार्यालयांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थीस ते मुद्दा क्रमांक २ संदर्भातील माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्याकरिता जन माहिती अधिकारी यांचे क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी मुख्यत्वेकरुन जबाबदार असल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्यास त्यांचे जे कर्मचारी व अधिकारी जबाबदार आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून संबोधावे अशी तरतूद आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ संदर्भातील माहिती विलंबाने पुरविण्यास जन माहिती अधिका-याचे क्षेत्रिय स्तरावरील सर्व संबंधीत अधिकारी / कर्मचारी जबाबदार आहेत असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन व त्याव्दारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग करुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० च्या तरतुदीस स्वतःस पात्र ठरविले आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत होताच ३ (तीन) महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १ (एक) महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ ची माहिती सर्व संबंधितांनी पुरविली असल्यामुळे यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत होताच ३ (तीन) महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १ (एक) महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २२-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहमद अन्वरउल्ला खॉन पि. मो. बरकतउल्ला खॉन, घर नं. ९-४-४५५,

खयूम प्लॉट्स, मॅफको रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड श्री. मो. अ. हादी अन्सारी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड).

४ सचिव, (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७६९
निर्णय दिनांक-२२ जानेवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.अरुण भिकाजी बाबरे<br>अध्यक्ष, ऑल इंडिया हयुमन<br>राईटस् असोसिएशन, अहमदनगर<br>जिल्हा रा.मु.पो.पुणतांबा,<br>ता.राहता, जिल्हा- अहमदनगर. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | मॅनेजर, जीवन आशा चॅरिटेबल<br>ट्रस्ट (आशाकेंद्र) पुणतांबा,<br>जिल्हा-अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. | अध्यक्ष, जीवन आशा चॅरीटेबल<br>ट्रस्ट, आशाकेंद्र, पुणतांबा, जिल्हा-<br>अहमदनगर. | : | |

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २२-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.अरुण भिकाजी बाबरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व अध्यक्ष, जीवन आशा चॅरीटेबल ट्रस्ट, आशाकेंद्र, पुणतांबा हे गैरहजर आहेत. तर समन्वयक जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट (आशाकेंद्र) पुणतांबा,श्री. दिपक बालाजी चराटकर हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १५-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये मॅनेजर, जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट (आशाकेंद्र) पुणतांबा, तालूका-राहाता, जिल्हा- अहमदनगर, यांच्याकडून त्यांची संस्था स्थापन झाल्यापासून ते दिनांक- २००६ अखेरपावेतो- कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“अ) संस्था स्थापनेपासून आजपर्यंत कामावरील कर्मचा-यांची संख्या ?

ब) पैकी नियमित कर्मचारी किती ? व अनियमित कर्मचारी किती ? त्यांची संख्या द्यावी.

क) नियमित व अनियमित कर्मचा-यांना देण्यांत येणारे वेतन किती ? त्याचा थोडक्यात तपशिल देणेत यावा.

ड) अनियमित कर्मचा-यांना कामगार कायद्यानूसार किमान वेतन देणेत येते काय? याबाबत माहिती?

इ) सदर ट्रस्टमार्फत चालविण्यांत येणारे इतर युनिट मार्फत राबविण्यांत येणारे प्रकल्प व त्यांची माहिती.

ई) उपरोलिखित आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल अनुक्रमे (अ) पासून (इ) पर्यंत विचारण्यांत आलेली सर्व माहिती तपशिलवार मराठीत मिळावी.

सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधीत ट्रस्टच्या अध्यक्षांनी त्यांच्याकडील दिनांक- १९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे उत्तर दिले आहे की,- “माहितीचा अधिकार २००५ अधिनियमान्वये सार्वजनिक विश्वस्त संस्था या अधिनियमाच्या कक्षेत येत नाही, यास्तव आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे.”

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये अध्यक्ष, जीवन आशा चॅरीटेबल ट्रस्ट, आशाकेंद्र, पुणतांबा यांच्याकडे दिनांक- ०५-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली

आहे. सदर अपील अर्जावर त्यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- ०७-०६-२००६ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीच्या अपीलअर्जावर त्यांना एक पत्र लिहून अपिलार्थीस कोणतीही माहिती अथवा त्यांच्या अपिलावर निर्णय न देता ईतर मुद्दांचा ऊहापोह त्यांनी या पत्रामध्ये केला आहे व त्याचबरोबर अपिलार्थीच्या अर्जावरुन "ब्लॅक मेलींग करण्याचा उद्देश ध्वनीत होत असल्याने पोलीस स्टेशनमध्ये न्यायाच्या कक्षेत योग्य ती कारवाई केली जाईल", असे अपिलार्थीस बजावले. अध्यक्षांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथीत होऊन, अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक- २४-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी संबंधीत संस्थेकडून कोणत्याही प्रकारची त्यांना माहिती प्राप्त झाली नाही, उलट संस्थेच्या अध्यक्षाकडून त्यांना धमकी प्राप्त झाली असल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर मूळ माहितीची मागणी त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामूळे त्यांनी संबंधीत संस्थेकडे केलेली मूळ माहितीची मागणी हीच कायम धरुन, अपीलाची सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

संस्थेतर्फे उपस्थित असलेले त्यांचे प्रतिनिधी श्री. दीपक बालाजी चराटकर, समन्वयक, जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट (आशाकेंद्र) पुणतांबा यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, संस्थेच्या अध्यक्षांचे दिनांक- १७-१०-२००७ रोजी निधन झाले असून दिनांक- १८-०१-२००८ रोजी सदर संस्थेचे व्यवस्थापन बदलून कम्युनिटी डेव्हलपमेंट ट्रस्ट या संस्थेने जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट ही संस्था ताब्यात घेतली आहे. आता सदर माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. तव्दतच नविन व्यवस्थापन त्यांना ही माहिती कितपत देईल ही शंका आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट (आशाकेंद्र) पुणतांबा  या संस्थेबद्दल, संबंधीताकडून केलेला युक्तीवाद, पाहता असे दिसून येत आहे की, जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट (आशाकेंद्र) पुणतांबा ही संस्था धर्मादाय आयुक्तांच्याकडे नोंदणीकृत झालेली संस्था आहे. सदर संस्थेचे अभिलेखे व हिशोब पाहणीकरिता धर्मादाय आयुक्त यांना उपलब्ध होऊ शकतात.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

> ‘‘(च) ‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने,ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रानिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.’’

वरील व्याख्येचे अवलोकन करता, त्यामध्ये ‘‘त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्या अन्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल, असे कोणतेही खाजगी निकशाशी संबंधीत माहिती’’ याचा  माहिती या व्याख्येत  समावेश होत असल्याचे दिसून येते.

जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्टच्या संबंधात अपिलार्थीने विचारलेली माहिती प्राप्त करुन घेण्यास धर्मादाय आयुक्त सक्षम असल्याने, संबंधीत संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते व त्यांना अपिलार्थीने विचारलेली संपूर्ण माहिती देणे भाग आहे. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या सरळ माहितीस संबंधीत संस्थेने कोणताही सकारात्मक प्रतिसाद न देता  उलट त्यांनी उध्दट उत्तरे पाठविली आहेत. त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या पत्रावरुन

त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याची इच्छा नसावी, असे दिसून येत आहे. संबंधीत संस्थेच्या अशा प्रकारच्या बेमुर्वतखोरपणास आळा घालण्याच्या दृष्टीने व अपिलार्थीने सदर संस्थेमध्ये भ्रष्टाचार चालू असल्याची संस्थेच्या अध्यक्षांकडे केलेल्या अपीलामध्ये व्यक्त केलेल्या शंकेवरुन सदर संस्थेची योग्य ती चौकशी होणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब त्या संस्थेची, सहधर्मादाय आयुक्त, नाशिक यांनी चौकशी करुन त्यावर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करण्याचे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

शासनाच्या प्राधिकरणास, संस्थेकडे असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याची अधिकारीता असल्याने सदर संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत आहे. सबब त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत असून त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अध्यक्ष, जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

२. सहधर्मादाय आयुक्त, नाशिक यांनी हे आदेश निर्गमीत होताच त्या संस्थेची चौकशी १५ दिवसाच्या आत सुरु करुन त्यामध्ये आढळलेल्या दोषी व्यक्तींवर/ संस्थेवर, प्रचलीत नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व तद्नंतर

१ महिन्याच्या आत आपला अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि.बा.बोरगे )**

**दिनांक-२२-०१-२००८** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक**

प्रत

१. श्री.अरुण भिकाजी बाबरे, अध्यक्ष, ऑल इंडिया हयुमन राईटस असोसिएशन, अहमदनगर जिल्हा रा.मु. पो.पुणतांबा, ता. राहता, जिल्हा- अहमदनगर.

२. अध्यक्ष,जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट (आशाकेंद्र) पुणतांबा,जिल्हा-अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. मॅनेजर, जीवन आशा चॅरिटेबल ट्रस्ट (आशाकेंद्र) पुणतांबा,जिल्हा- अहमदनगर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सहधर्मादाय आयुक्त, नाशिक, व्दारका हॉटेल समोर नाशिकरोड, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१४२

निर्णय दिनांक २१-०१-२००८

१ श्री. फजल हक मो. रमजान अन्सारी, : तक्रारदार
ग.नं.१ खटकीबाडा, अकबर चौक, सिटी सर्वे नं.
३१६४, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा वकील अहमद अब्दुल मजीद,
मुख्याध्यापक, अँग्लो ऊर्दू हायस्कूल,
इक्बाल रोड, धुळे.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. फजल हक मो. रमजान अन्सारी (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अँग्लो ऊर्दू हायस्कूल,धुळे श्री. वकील अहमद अब्दुल मजीद ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांच्याविरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमान्वये दि. १७.८.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती देण्याचे उत्तरवादी यांनी त्यांच्याकडील दि. २८.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये नाकारलेली आहे.

तक्रारदारास उत्तरवादी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प. धुळे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले होते. तथापि त्या अपीलावर निर्णय न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १८ अन्वये आयोगाकडे

तक्रार केली आहे. सदर तक्रारीची आयोगाकडून दखल घेण्यात येऊन सुनावणी आज दि. २२.१.२००८ रोजी घेण्यात येत आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेल्या तक्रारीमध्ये दि. ८.३.२००६ रोजीच्या मूळ अर्जाचा उल्लेख केला आहे, तथापि आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये त्यांनी दि. १७.८.२००६ रोजीचा अर्ज जोडला आहे. तक्रारदार यांनी विचाराधीन तक्रार दि. ३०.९.२००६ रोजी केली असून त्याची नोंद राज्य माहिती आयोगाचे मुंबई येथील कार्यालयात दि . ३१.१०.२००६ रोजी झालेली आहे. तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द केलेल्या या अर्जामध्ये मुख्याध्यापक, अँग्लो ऊर्दू हायस्कूल,धुळे हे स्वतःच्या स्वार्थासाठी सर्व कायदे धाब्यावर ठेवून बेकायदेशीर काम करीत असल्याचे नमुद केले आहे.

तक्रारदार व उत्तरवादी या दोघांकडून आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडे त्यांच्याकडील दि. ८.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये शाळेची जागा लग्न समारंभासाठी भाडयाने दिल्यानंतर प्राप्त होणारे भाडे कोण घेते व ते कोठे जमा केले जाते, याची माहिती विचारली आहे.

तक्रारदाराच्या दि. ८.३.२००६ रोजीच्या या अर्जासंदर्भात उत्तरवादी यांनी त्यांचेकडे २४.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास माहिती पुरविली आहे. तक्रारदारास सदर माहिती दि. २५.३.२००६ रोजी प्राप्त झालेली आहे. सदर कार्यवाही उत्तरवादी यांचेकडून विहित कालावधीमध्ये झालेली आहे.

तक्रारदार यांचे याबाबत असे म्हणणे आहे की, संबंधित शाळेची संपूर्ण जागा विवाह समारंभाकरता भाडयाने दिली जाते व ही संस्था संबंधितांकडून जागेचे भाडे वसूल करीत असून, त्यांच्या म्हणण्याच्या पृष्ठयर्थ त्यांनी एक लग्नपत्रिका आयोगासमोर सादर केली, त्यामध्ये विवाहस्थळ म्हणून सदर शाळेचा उल्लेख होता.

तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडे दि. १७.८.२००६ रोजी एक दुसरा अर्ज करुन त्यामध्ये उत्तरवादी यांचेकडे इयत्ता १० वी तील तुकडी 'अ', 'ब' व 'क' मधील विद्यार्थ्यांचे माहे जुन, जूलै व ऑगस्ट २००६ या कालावधीच्या हजेरीपटाची नक्कल मागितली होती, तथापि ही माहिती तक्रारदारास प्राप्त झालेली नाही, असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. याउलट, उत्तरवादी यांनी तक्रारदारास सदर माहिती देण्याचे त्यांच्याकडील दि. १७.८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे स्पष्टपणे नाकारले असून शाळेच्या हिताच्या दृष्टीकोनातून, विद्यार्थी व शिक्षकांच्या हितासाठी शाळेचे गोपनीय माहिती यापुढे पुरविता येणार नाही, याची नोंद घ्यावी, असे अपीलार्थीस या पत्रामध्ये पुढे बजावले आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या दि. १७.८.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जान्वये विचारलेली माहिती साधी,सरळ व सार्वजनिक स्वरुपाची असून सदर माहिती दिल्यामुळे, माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ८ व ९ मधील कोणत्याही तरतुदींचा भंग होत नाही. त्यामुळे उत्तरवादी यांचे विद्यार्थी व शिक्षक हित व शाळेची गोपनीय माहिती हे दोन्हीही मुद्दे आयोग स्वीकारीत नाही. त्यामुळे सदर माहिती उत्तरवादी यांनी तक्रारदारास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देणे अनिवार्य आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांनी दि. १७.८.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत द्यावी. उत्तरवादी मुख्याध्यापक, अँग्लो ऊर्दू हायस्कूल, धुळे यांना आयोगातर्फे अशी ताकीद देण्यात येते की, कोणत्याही नागरिकाने त्यांचेकडे शाळेसंबंधी मागितलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहित केलेल्या मुदतीमध्ये संबंधितास पुरविणेबाबत योग्य तो निर्णय घेण्याचे न टाळता अशा अर्जास सकारात्मक प्रतिसाद कसा देता येईल, याची दक्षता त्यांनी घ्यावी. तसेच शाळेसंबंधित तक्रारीबाबत तक्रारदार यांना असे कळविण्यात येते की, त्यांनी शाळेसंबंधी तक्रार शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.धुळे यांचेकडे परस्पर करावी. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.धुळे यांना अशी सूचना करण्यात येते की, या शाळेविरुध्द प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा त्वरेने निपटारा करावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांच्या दि. १७.८.२००६ रोजी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २२-०१-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. फजल हक मो. रमजान अन्सारी, ग.नं.१ खटकीबाडा, अकबर चौक, सिटी सर्वे नं. ३१६४, धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अँग्लो ऊर्दू हायस्कूल,इक्बाल रोड, धुळे. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८०६

निर्णय दिनांक २३-०१-२००८

१ श्री. भद्रे सुधीर राजाराम, : अपिलार्थी
मु. पो. चिंचोडी पाटील,
तालुका जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा विभागीय कृषि सहसंचालक,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भद्रे सुधीर राजाराम हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. ज्ञानदेव गंगाराम काळाणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सहसंचालक श्री. जयंत वासुदेव देशमुख (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०१-०१-२००३ ते ३१-१२-२००४ या कालावधीतील त्यांच्या जिल्ह्यामध्ये झालेल्या मृद व जलसंधारण कामाची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ आपल्या जिल्ह्यामध्ये मृद व जलसंधारणाच्या झालेल्या उपरोक्त कालावधीतील कामांची पुढील तक्त्यात माहिती मिळावी. ”

| अ. क्र. | तालुक्याचे नांव | गावाचे नांव | कामाचे व योजनेचे नांव | मंजूर रक्कम | खर्च रक्कम | अडलेले पाणी (टी. सी. एम. मध्ये) | काम पुर्तता अहवाल दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये — तालुक्याचे नांव, गावाचे नांव, कामाचे व योजनेचे नांव, मंजूर रक्कम, खर्च रक्कम, अडलेले पाणी (टी. सी. एम. मध्ये) व काम पुर्तता अहवाल दिनांक — या माहितीचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना असे कळविले की, “ त्यांनी मागणी केलेल्या तक्त्यात त्यांच्या कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नसल्याने त्यांचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे. सदर माहिती तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद, पैठण, गंगापूर, वैजापूर, खुलताबाद, फुलंब्री, कन्नड, सिल्लोड व सोयगाव यांच्याकडे उपलब्ध होऊ शकेल.” थोडक्यात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे या पत्राव्दारे नाकारले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिला-मध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे या अर्जामध्ये नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस ताबडतोब पुरविण्याचे सूचित केले असून माहिती वेळेवर न दिल्यास त्यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा देखील त्यांना या पत्रात दिला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलाची कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांना सूचना देणे चुकिचे आहे. त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून ते नोंदवून घेऊन त्यावर आपला अंतीम निर्णय पारीत करणे हे “अपील ठरविणे” या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नसल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या पत्राने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०८-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही विहित मुदतीत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस ही माहिती औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व तालुका कृषि अधिका-यांकडून घेण्याचे त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले आहे. तदनंतर कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या परिपत्रकात सूचित केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्यावर स्तरावर गोळा करुन ती अपिलार्थीस दिनांक १८-०१-२००८ रोजी खास दुतामार्फत पोहाचविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने दिलेली पोच त्यांनी आयोगास सादर केली. यावरुन त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०१-२००८ रोजी त्यांना मूळ अर्जाव्दारे अभिप्रेत असलेली माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर ऑक्टोंबर २००७ रोजी रुजू झाले असून त्यापुर्वीच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले असल्याने त्यांनी सदर अपिलाची सुनावणी घेतली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती सरळ व सोपी होती. ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत पुरेशी आहे असे आयोगाचे मत आहे. सर्वसामान्य

परिस्थितीत अपिलार्थीस ही माहिती दिनांक २४-०५-२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपेक्षित आहे. तथापि अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०१-२००८ रोजी पुरवून ही माहिती देण्यास सुमारे १ वर्ष ८ महिने व ४ दिवस इतका विलंब लावल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थीने ज्या तक्त्यामध्ये माहिती मागविली होती त्या तक्त्यामध्ये त्यांच्याकडे ती उपलब्ध नव्हती आणि अपिलार्थीने मागितलेल्या माहिती सदृश माहिती त्यांचे तालुका कृषि अधिकारी यांचे स्तरावर ठेवली जाते. तथापि जन माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे आयोगास मान्य नाही. कारण अपिलार्थीने मागितलेली माहिती ही कोणत्याही कामाचे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे, किंबहुना कृषि खात्यातील क्षेत्रिय कामाचे व्यवस्थापन याच माहितीच्या आधारावर केले जाणे अभिप्रेत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) मध्ये, अपिलार्थीने मागितलेली माहिती सर्वसाधारणपणे त्यांनी मागितलेल्या स्वरुपात द्यावी अशी तरतूद आहे. अपवाद फक्त ही माहिती देण्याच्या प्रक्रियेमध्ये सार्वजनिक प्राधिकरणास त्यांचेकडील साधनसामुग्री केवळ या कामासाठी प्रमाणाबाहेर वापरावी लागत असेल तरच आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता या माहितीस हा अपवाद कोणत्याही परिस्थितीमध्ये लागू होणार नाही असे आयोगाचे मत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नव्हती, जर सदर माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नव्हती तर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीचा अर्ज त्यांनी संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे ५ दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे या प्रकरणी आयोगास आढळून आले नाही. अपिलार्थीस, तालुका कृषि अधिका-याकडे माहिती

उपलब्ध होईल असे कळवून ते पुढे स्वस्थ राहिले. अपिलार्थीस संबंधीत तालुका कृषि अधिका-यांनी माहिती दिली किंवा कसे याबाबतचा त्यांनी कोणत्याही प्रकारचा पाठपुरावा केल्याचे व त्यायोगे अपिलार्थीच्या विनंतीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस आता जरी संपूर्ण माहिती प्राप्त झाली असली तरी ती त्यांनी कृषि आयुक्त यांच्याकडून प्राप्त झालेल्या डिसेंबर २००७ च्या परिपत्रकातील सुचनेमुळे दिल्याचे दिसून येते. आयुक्तांचे परिपत्रक त्यांना प्राप्त झाल्यानंतर मात्र त्यांनी अपिलार्थीस ही माहिती एका महिन्याच्या आत अपिलार्थीने मागितलेल्या तक्त्यामध्ये अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली. हे पाहता जर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे सुरुवातीसच मनावर घेऊन यादृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले असते तर अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती मिळू शकली असती. अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये कोणतीही अडचण नव्हती केवळ जन माहिती अधिकारी यांच्यातील इच्छाशक्तीच्या अभावामुळे अपिलार्थी, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मिळण्यापासून, वंचित राहिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीव्दारे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली

भरावी.  जन माहिती अधिकारी यांनी सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्याबाबतची / करीत असल्याबाबतची विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद यांनी खात्री करुन त्याबाबतचा आपला अहवाल हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत आयोगास पाठवावा. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.  सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात उल्लेख केल्याप्रमाणे करावा.

औरंगाबाद
दिनांक २३-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भद्रे सुधीर राजाराम, मु. पो. चिंचोडी पाटील, तालुका जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ वरिष्ठ कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८११
निर्णय दिनांक-२३ जानेवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.एल.एस.कोल्हे,<br>इंदिरापथ कोपरगांव, जिल्हा-<br>अहमदनगर. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>विशेष कार्य अधिकारी व पदसिध्द<br>उपविकास आयुक्त (रो.ह.यो.)<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>नाशिक. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष कार्य अधिकारी व पदसिध्द<br>उपविकास आयुक्त (रो.ह.यो.)<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>नाशिक. | : | |
| | प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार (रो.ह.यो)<br>विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक. |
| | प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी | : | विशेष कार्य अधिकारी व पदसिध्द<br>उपविकास आयुक्त (रो.ह.यो.) विभागीय<br>आयुक्त कार्यालय, नाशिक. |

# निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २३-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.एल.एस.कोल्हे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, (रो.ह.यो) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक, श्री. महेश गंगाधर चौधरी (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी व पदसिध्द उपविकास आयुक्त (रो.ह.यो.) श्री. हरीभाऊ कांचन गोसावी (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १९-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे श्री.सुरेश मदने, तत्कालीन उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग पाथर्डी यांच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती विचारली होती.

"सुरेश मदने हे उपअभियंता, सा.बां. उपविभाग पाथर्डी ता.पाथर्डी जि.अहमदनगर येथे उपअभियंता म्हणून कार्यरत असतांना सन १९७८ ते १९८१ हया कालावधीत रो.ह.यो. च्या कामासंबंधी पाथर्डी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला होता. त्याची रो.ह.यो. कामासंबंधी चौकशी सुरु केव्हा झाली व चौकशी केव्हा संपली."

अपिलार्थीने सदर माहिती टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २८-०४-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २५-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले आहे की, सदरच्या माहितीमध्ये कामांचे नांव गावाचे नांव, गुन्हा दाखल केल्याची तारीख, गुन्हा

कोणी दाखल केला आहे इ. माहितीचा तपशील नमूद केलेला नसल्याने, सदरची चौकशी केव्हा सुरु झाली व केंव्हा संपली, याबाबत अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना पुरविता येत नाही. अपिलार्थीस हव्या असलेल्या माहिती बाबत त्यांनी तहसीलदार, पाथर्डी, पोलीस स्टेशन पाथर्डी आणि जिल्हास्तरावर उपजिल्हाधिकारी ( रो.ह.यो.) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याशी संपर्क साधण्याचे, याच पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १८-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या अपीलअर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- २५-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस वरीलप्रमाणे उत्तर दिले आहे. थोडक्यात अपिलार्थीच्या माहितीसाठीचा अर्ज व अपीलअर्ज यावर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी एकाच पत्राव्दारे उत्तर दिल्याचे दिसून येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही कृती चुकीची आहे. अपिलार्थीचा अपीलअर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी, अपिलार्थी व संबंधीत जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे नोंदवून, या प्रकरणी आपला निर्णय पारीत करणे, हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती येथे केल्याचे दिसून येत नाही. भविष्यात माहिती अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त झालेल्या अपीलअर्जावर त्यांनी येथे नमूद केलेल्या पध्दती प्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-१०-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामूळे आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून अपीलाची सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती, त्यामूळे त्यांनी अपिलार्थीस तहसीलदार, पाथर्डी पोलीस स्टेशन पाथर्डी व उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याशी संपर्क साधून देखील त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त होवू शकली नाही. अंतिमतः त्यांनी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी यांच्याशी दिनांक- १७-०१-२००८ रोजी दुरध्वनिव्दारे संपर्क साधला असता, संबंधीत उपअभियंता यांनी दिनांक- १७-०१-२००८ रोजी त्यांना असे कळविले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जात उल्लेख केलेल्या कालावधीमध्ये श्री. एस.बी. मदने, उपविभागीय अभियंता, हे तेथे कार्यरत नव्हते व त्यांच्या विरुध्द पाथर्डी पोलीस स्टेशनला गुन्हा झाल्याची नोंद त्यांचेकडील उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येईल की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही त्रयस्त पक्षाशी संबंधीत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामूळे, त्यांनी या प्रकरणामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (त) प्रमाणे कार्यवाही करावयास हवी होती. या कलमातील तरतुदी प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जाच्या प्रती तहसीलदार पाथर्डी, पोलीसस्टेशन पाथर्डी व उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याकडे पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही, अशा प्रकारची कृती न करुन त्यांनी माहिती अधिकार अधिनियमा मधील कलम ६ (३) (त) चा भंग केला व त्याव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपराणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. आता अपिलार्थीस माहिती मिळविण्याच्या दृष्टीने त्यांना आता असे आदेशीत करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस मागितलेली माहिती तहसीलदार, पाथर्डी, पोलीस- स्टेशन पाथर्डी व उपजिल्हाधिकारी (रो.ह.यो.) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याशी वैयक्तीक संपर्क साधून अपिलार्थीने मागितलेली माहिती वा तिची सद्यःस्थिती त्यांचेकडून प्राप्त करुन घेण्यात यावी व ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीचा नीट अभ्यास करुन त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जावर यापूढे सकारात्मक निर्णय घ्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे  अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी, यांनी अपिलार्थीने विचारलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक-२३-०१-२००८**

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक**

प्रत

१. श्री.एस.एस.कोल्हे, इंदिरापथ, मु.पो.ता.कोपरगाव, पिनकोड नं. ४२३६०१, जिल्हा-अहमदनगर.

२. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, (रो.ह.यो.) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी व पदसिध्द उप विकास आयुक्त (रो.ह.यो.) नाशिक, नाशिक रोड, नाशिक, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१४३

निर्णय दिनांक : २३-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| १ डॉ. करा़ड विनायक माणिकराव,<br>हेगडेवार जिमच्या पाठीमागे, धारुररोड,<br>केज, ता. केज जि. बीड. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा अवर सचिव (सेवा-३),<br>सार्वजनिक आरोग्य विभाग,<br>मंत्रालय, मुंबई | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार डॉ. कराड विनायक माणिकराव (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (सेवा-३), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई श्री. सूर्यकांत कि. निकम ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचे विरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी उत्तरवादी यांचेकडे दि. २८.९.२००६ रोजीच्या केलेल्या अर्जासंदर्भात उत्तरवादी यांच्याकडून कोणतीही माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. तद्वतच त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाचे संबंधित उपसचिव यांचेकडे अपील अर्ज केल्यानंतरही त्यावर काहीही निर्णय झालेला नाही. तरी उपरोक्त अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना त्वरित पुरविण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज सुनावणीस उत्तरवादी हजर आहेत. त्यांनी आयोगासमोर असे सांगितले की, उत्तरवादी यांनी दि. २८.९.२००६ रोजीचा अर्ज सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य, मंत्रालय,मुंबई यांचेकडे केला होता. सदर अर्ज संबंधित विभागाकडून त्यांच्या विभागास माहे ऑक्टोबर, २००६ मध्ये प्राप्त झाले. (या पत्रावर दिनांक लिहिलेला नाही) तक्रारदाराने उत्तरवादी यांच्याकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केलेली होती.

" मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार मुद्दा क्र. ५ मध्ये असे नमुद केलेले आहे की, होमीयोपॅथीक पदवीधारकांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर करण्यात आला आहे, त्याचे पुढे काय झाले ?"

तक्रारदाराच्या मूळ अर्जाच्या संदर्भात उत्तरवादी यांनी त्यांचेकडील दि. २.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये असे उत्तर दिले आहे की, "सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत सेवेमध्ये २५% जागा आयुर्वेद पदवीधारकांसाठी आहेत. यात होमीओपॅथी पदवीधारकांचा समावेश करण्याचा प्रस्ताव तूर्त विचाराधीन नाही. तथापि राज्य ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी "आयुर्वेद युनानी सिध्द व होमीओपॅथी" या विषयातील पदवीधारकांकडून आवश्यकतेनुसार कंत्राटी पध्दतीने शासनाचे धोरणानुसार नियुक्त्या देता येतील. या संदर्भात "आयुष" प्रणाली राज्यात राबविण्याची कार्यवाही चालू आहे."

वरील पत्रावरुन असे दिसून येते की, तक्रारदारास उत्तरवादी यांनी अंदाजे सहा महिने इतक्या उशीरा त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे. तक्रारदाराने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता तक्रारदारास ती देण्यामध्ये उत्तरवादीस विलंब लागण्याचे कोणतेही कारण सकृतदर्शनी आयोगास दिसून येत नाही. आयोगासमोर सदर विलंबाचे समर्थन आज सुनावणीमध्ये उत्तरवादीदेखील करु शकले नाहीत. उत्तरवादी यांनी तक्रारदारास दिलेल्या माहितीकरता लावलेला असा असमर्थनीय विलंब पाहता उत्तरवादी यांनी आपले कार्यशैलीमधील कर्तव्य परायणतेचा अभाव दर्शविल्याचे सिध्द होते. सबब सचिव (सार्वजनिक आरोग्य) मंत्रालय, मुंबई याना असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभावाबाबत त्यांचेवर प्रचलीत सेवा नियमानुसार यथायोग्य कार्यवाही करावी. उत्तरवादी यांनी तक्रारदारास पाठविलेल्या दि. २.४.२००७ रोजीच्या पत्राची प्रत तक्रारदारास प्राप्त झालेली आहे किंवा कसे, हे कळण्यास मार्ग नाही, कारण उत्तरवादी यांनी आयोगाने सूचना देऊन देखील त्यांचेकडील आवक-जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत

आयोगासमोर सादर केलेली नाही. सबब असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी त्यांचे पातळीवर त्यांचे पत्र तक्रारदारास मिळाल्याची खात्री करुन घ्यावी. जर ते पत्र उत्तरवादीस मिळाले नसल्यास पुनःश्च तक्रारदारास पाठवावे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात तक्रारदारास माहिती देण्याप्रीत्यर्थ लावलेल्या विलंबाबाबत त्यांचेवर सचिव, सार्वजनिक आरोग्य यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच ३ महिन्याचे आत प्रशासकीय कार्यवाही करुन, तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २३-०१-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ डॉ. कराड विनायक माणिकराव, हेगडेवार जिमच्या पाठीमागे, धारुर रोड, केज, ता. केज, जि. बीड यांना (रजिस्टर्ड पोस्टाने)

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (सेवा-३), सार्वजनिक आरोग्य केंद्र, मंत्रालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव (सार्वजनिक आरोग्य), दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८४५

निर्णय दिनांक २४-०१-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गुळवणे धनंजय रामदास,<br>व्दारा- ए. एम. साळूंके,<br>"यशोदा" जायकवाडी रोड, वडिगोद्री,<br>तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, जालना | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, जालना | : | प्रतिवादी |

<u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गुळवणे धनंजय रामदास हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद श्री. सुधाकर मनोहरराव बानाटे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. हेमंत शरच्चंद्र वसेकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १६-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जून २००३ ते ऑक्टोंबर २००६ या कालावधीतील शिक्षणसेवकांची नियुक्ती व सेवासातत्य याबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. जून २००३ मध्ये नियुक्त शिक्षण सेवकांच्या नियुक्ती आदेशानुसार त्यांचा शिक्षणसेवक कालावधी कोणत्या दिनांकास संपतो ?

२. तीन शैक्षणिक वर्ष म्हणजे किती महिने ?

३. शासन निर्णय क्र. पीआरई २००२/३३९५/प्रा.शि.१ दिनांक २७-०२-२००३ च्या अनुच्छेद १० नुसार तीन शैक्षणिक वर्षाची नियुक्ती असतांना आपण तीन कॅलेंडर वर्षानंतर सातत्य कोणत्या नियमात दिले त्याची झेरॉक्स प्रत द्यावी.

४. नियुक्ती आदेशातील अट क्र. १ नुसार संबंधितांच्या नियुक्त्या दिनांक ३०-४-२००६ पर्यत शिक्षणसेवक म्हणून आहेत आणि आपण त्यांना नियमीत शिक्षक म्हणून दिनांक २३, २४ जून २००६ (रुजू दिनांकानुसार) दिलेल्या आहेत. मग त्यांच्या दिनांक १ मे २००६ ते २२ जून २००६ पर्यतचा "सेवेचा खंड" समजायचा काय ?

५. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे जात वैधता प्रमाणपत्र नसल्याने त्यांचे मानधन बंद करण्याचे आदेश आपल्या कार्यालयाने दिले आहेत काय ? असल्यास आदेशाची झेरॉक्स प्रत द्यावी.

६. वरील ५ चे आपले उत्तर ‘‘नाही’’ असे असेल तर अंबड तालुक्यात अनुसूचीत जमातीच्या शिक्षण सेवकांचे मानधन बंद का करण्यात आले ? याची जबाबदारी कुणावर निश्चीत केली ? ते सुरु कधी होईल ?

७. नियमीत शिक्षक म्हणून दिलेल्या दिनांक ३०-०९-२००६ रोजीच्या आदेशात अट क्रमांक १ कोणत्या नियमाच्या आधारे दिली ? ते भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत बसते काय ?

८. ‘‘अंशदान’’ योजना नोव्हेंबर २००५ नंतर नोकरीस लागलेल्यांसाठी असतांना जून २००३ मध्ये नोकरीस लागलेल्यांकडून बंधपत्र का घेण्यात येत आहेत ?’’

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील पत्र क्रमांक ५६१८, दिनांक १५-११-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिला-मध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मागितलेली माहिती दिली नसल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-१२-२००६ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी सदर माहिती दिनांक १४-११-२००६ पर्यत देणे अपेक्षित असतांना ती दिनांक १६-११-२००६ रोजी निर्गमीत केल्यामुळे २

दिवस विलंबाबाबत प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे रुपये ५०० /- इतकी शास्ती लावण्याचे आदेश निर्गमीत केले आहे. या शास्तीची वसुली करण्याचे त्यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना याच निर्णयामध्ये आदेशीत केलेले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. त्यामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे व उशिरा माहिती दिल्याचा कालावधी जन माहिती अधिकारी चुकीचा गृहीत धरला असल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर सुनावणीच्या दिवशी आदेश देणे अपेक्षित असतांना दिनांक ०५-०१-२००७ पर्यत जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश काढले नसल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. तद्वतच सदर आदेशाची प्रत अपिलार्थीस मिळाली नसल्याचे या अपिल अर्जामध्ये पुढे म्हटले आहे. एवढ्या सर्व बाबी नमूद करुन अंतीमतः त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात असून देखील त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ही माहिती पुरविली. सदर माहिती त्यांच्याकडे दिनांक ३०-१०-२००६ रोजी तयार होती, तथापि सदर पत्र त्यांचे कार्यालयातील संबंधित लिपिका-कडून त्यांच्या सहीसाठी त्यांना वेळेत सादर केले गेले नाही. त्यांनी अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात सदर लिपिकाकडे चौकशी केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस माहिती देणारे पत्र दिनांक १५-११-

२००६ रोजी पाठविले. सदर पत्र जिल्हा परिषद कार्यालयातून दिनांक १६-११-२००६ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने अपिलार्थीस पाठविले गेले. तदनंतर अपिलार्थीस दिनांक ०२-१२-२००६ रोजी म्हणजेच अपिलार्थीचा प्रथम अपिल अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक १५-१२-२००६ रोजी अपिलार्थीस हीच माहिती परत रजिस्टर पोस्टाने पाठविली. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना मिळाल्याची निश्चिती करावी या उद्देशाने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस परत दुस-यांदा पाठविली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर अपील सुनावणीच्या वेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यपध्दतीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने व अपिलार्थीस माहिती देण्याकरिता ३० दिवसांचा कालावधी संपण्याची वाट न पाहता तत्पूर्वीच त्यांना माहिती प्राप्त व्हावी अशा उद्देशाने दिनांक १४-११-२००६ ही तारीख गृहीत धरली, जिल्हा परिषद कार्यालयाने पत्र निर्गमीत केल्याचा दिनांक १६-११-२००६ असा आहे त्यामुळे या दोन दिवसांच्या विलंबाकरिता जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांना प्रतिदिन रुपये २५० /- याप्रमाणे २ दिवसाच्या विलंबासाठी रुपये ५०० /- शास्ती लावली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, मुलतः अपिलार्थीने ज्या ८ मुद्दयावर माहिती मागविली आहे त्यातील मुद्दा क्रमांक ३ वगळता उर्वरीत सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण व खुलासे अपेक्षित करणारी आहे. जी माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या ''माहिती'' या शब्दाच्या व्याख्येमध्ये बसत नाही. माहिती या शब्दाची व्याख्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

"माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने विचारलेल्या एकूण ८ मुद्दयापैकी ७ मुद्दयावरील माहिती वरील व्याख्येमध्ये बसत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविली आहे. या ठिकाणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात व खुलासेवजा प्रश्न विचारुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कडील दिनांक १५-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये ही माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिनांक ३०-१०-२००६ रोजी म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत तयार ठेवली होती, तथापि सदर माहितीच्या स्थळप्रतीवर सही करण्यासाठी कागदपत्र सादर करण्याचे त्यांच्या लिपिकाकडून राहून गेल्याने ही माहिती त्यांच्या कार्यालयातून अपिलार्थीस पुरविली गेली नाही. याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याचा मुलतः उद्देश होताच. अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ करणे वा कोणताही असद्‌हेतुने माहिती दडविण्याचा त्यांचा उद्देश नव्हता. अपिलार्थीस प्रथमतः दिनांक १६-११-२००६ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ पोस्टाची पावती त्यांनी आयोगासमोर सादर केली. तद्वतच अपिलार्थीस परत

दिनांक १६-१२-२००६ रोजी हीच माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविल्याप्रित्यर्थ त्यांनी जालना पोस्ट ऑफिसची पावती आयोगासमोर सादर केली आहे. सदर पावतीचा क्रमांक ४९७९ असा असून दिनांक १६-१२-२००६ रोजी सदर रजिस्टर पत्र पोस्टात दाखल केल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे सिध्द होते.

या ठिकाणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी विलंबाचा कालावधी निश्चित करतांना चुकिचे गृहीत धरले आहे असे नमूद केले आहे. अपिलार्थीचे सदर म्हणणे बरोबर नाही. कारण त्यांना माहिती देण्यासाठी ३० दिवसांचा अनुज्ञेय कालावधी अधिनियमाव्दारे विहित केला आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकिची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे ग्राह्य धरले नाही. मुळात जन अपिलीय अधिकारी यांनी अर्धन्यायिक पध्दतीने अपील ठरवित असतांना अशा प्रकारची गृहीतके मनामध्ये ठेऊन आपला अपील निर्णय पारीत करणे हे कोणतेही अपील ठरविण्याच्या प्रक्रियेत कशाही प्रकारे अभिप्रेत नाही. मुळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती चुकिची व दिशाभूल करणारी असल्याचे आयोगास आढळले नाही. त्यामुळे सदर माहिती चुकिची व दिशाभूल करणारी आहे असे गृहीत धरुन जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेण्याची अपिलार्थीनी केलेली अपेक्षा चुकिची आहे असे आयोगाचे मत आहे. उलट अपिलार्थीच्या या अपेक्षेवरुन त्यांना, त्यांनी मागितलेली माहिती मिळविण्यामध्ये रस नसून केवळ जन माहिती अधिकारी यांना शिक्षा व्हावी असाच उद्देश त्यांच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलातील मजकुरावरुन जाणवतो. यापुढे अपिलार्थीने सुनावणीच्या दिवशीच जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देणे अपेक्षित असतांना दिनांक ०५-०१-२००७ पर्यत आदेश न काढणे व सदर आदेशाची प्रत अपिलार्थीस न देणे या बाबी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये मांडल्या आहेत. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-१२-२००६ रोजी सुनावणी घेतली असतांना अपिलार्थी हे हजर

होते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या सुनावणीचा निर्णय दिनांक २६-१२-२००६ रोजी पारीत केला होता. तथापि सदर निर्णय त्यांनी त्यांचेकडील दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या पत्राने पाठविला. सदर पत्र जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातून अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने जालना येथे पोस्टामध्ये दिनांक ०५-०१-२००७ रोजी सादर करण्यात आले व तदनंतर हा निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला. एकदा निर्णय घेतल्यानंतर पुढील प्रशासकीय सोपस्कार पार पाडण्याकरिता जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २६-१२-२००६ ते ०५-०१-२००७ इतका कालावधी लागल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी अपील आदेशाची प्रत देखील पाठविली होती. या प्रक्रियामध्ये अपिलार्थीस आक्षेप घेण्याचे कोणतेही कारण आयोगास दिसून येत नाही आणि जरी त्यांचे काही आक्षेप असतील तर ते विचारात घेण्याचे कोणतेही कारण आयोगास येथे दिसून येत नाही.

उपरोक्त निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी यांना २ दिवसाच्या विलंबासाठी प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे रुपये ५०० /- इतकी शास्ती लावली आहे. अपिलार्थीने दिनांक १६-१०-२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये म्हणजे उशिरात उशिरा दिनांक १५-११-२००६ पर्यत अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविणे अपेक्षित आहे. येथे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-११-२००६ रोजी आपला निर्णय पारीत केला आहे. केवळ संबंधीत लिपिकाने सदर पत्र पोस्टाने पाठविण्यासाठी लावलेला १ दिवसाचा कालावधी हा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेला विलंब धरता येणार नाही, तद्वतच मुळात जन अपिलीय अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याचे कोणतेही अधिकार नाहीत अशा प्रकारचे आदेश देऊन संबंधित जन

अपिलीय अधिकारी यांनी आपल्या मर्यादांचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट होत आहे हे पाहता जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-१२-२००६ रोजी पारीत केलेले प्रथम अपिला-संदर्भातील आदेश, या आदेशाव्दारे रद्द करण्यात येत आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील दिनांक २६-१२-२००६ रोजी आदेश पारीत केल्यानंतर अपिलार्थीस हे आदेश पाठविण्याकरिता एकूण १० दिवसांचा कालावधी लावला आहे, हे पाहता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयीन व प्रशासकीय सोपस्कारासाठी लागलेल्या एक दिवसाच्या विलंबाबाबत त्यांनी आक्षेप घेण्याचे कोणतेही कारण उरत नाही. अपिलार्थीस आता माहिती प्राप्त झाली असल्याने, त्यांना माहिती मिळण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

प्रसंगवशात, जन माहिती अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना असे सूचित करण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेले अर्जास प्रतिसाद देतांना अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत संपण्याची वाट न पाहता अर्जदारास / अपिलार्थीस विहित मुदतीच्या आधी कसा सकारात्मक प्रतिसाद देता येईल हे पहावे व विशेषतः आवक जावक लिपिकांना प्रत्येक दिवशी त्यांना पडणारे काम त्यांनी त्याच दिवशी संपविण्याचा दंडक त्यांना घालण्याबाबत त्यांनी विचार करावा असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक २६-१२-

२००६ रोजी पारीत केलेले आदेश रद्द करण्यात येत आहेत.

औरंगाबाद
दिनांक २४-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गुळवणे धनंजय रामदास, व्दारा- ए. एम. साळूंके, ‘‘यशोदा’’ जायकवाडी रोड, वडिगोद्री, तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८४६

निर्णय दिनांक २४-०१-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शरच्चंद्र माधव पंडित,<br>एन- ३, प्लॉट क्रमांक ७४, सिडको,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शरच्चंद्र माधव पंडित हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. प्रमोद खंडेराव पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ श्री. ए. आर. बनसोडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, एप्रिल २००६ ते नोव्हेंबर २००६ या कालावधीतील औरंगाबाद-जालना रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " औरंगाबाद-जालना मार्गाचा भाग- महावीर चौक, क्रांतीचौक-- वसंतराव नाईक चौक या भागात (१) पॉट होल फिलींग (२) प्रिमिक्स डांबरीकरण (३) दुभाजकाची उंची वाढविणे ही कामे झालेली आहे त्यासंबंधी (१) मोजमाप पुस्तकातील / एम. बी. मधील पूर्ण नोंदी (२) देयकांचे पूर्ण सेट्स (३) संबंधीत कामाचे एम. एस. ए. यांच्या प्रमाणीत प्रती देण्यात याव्यात."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात माहितीचा अधिकार अधिनियमातील विहित मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०२-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २१-०२-२००७ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ५ दिवसात माहिती देण्याचे आदेशीत केले आहे व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०२-२००७ रोजी आवश्यक ती माहिती अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती

आयोगाकडे दिनांक २१-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी ५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासन देऊन देखील त्यांना माहिती पूर्णतः मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी आता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती दिलेली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक कामांचा समावेश होता त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती संकलीत करण्याकरिता त्यांना किचकट व वेळखाऊ कार्यपध्दतीचा अवलंब करावा लागला. अपिलार्थीस सदर माहिती देतांना तांत्रिक शाखा, निविदा शाखा, प्रस्तावित कालावधीचे संपूर्ण कॅशबूक तपासणी करुन त्यावरुन देयकाचा तपशील तयार करणे, अदा केलेल्या देयकाचा तपशील यावरुन संबंधीत मोजमाप पुस्तिकाचे क्रमांक घेणे मासिक लेखे तपासणे, विभागीय उपविभागीय कार्यालयातील विविध नोंदीवरुन सदर मोजमाप पुस्तिका कोठे आहे हे पाहून मोजमाप पुस्तिका मिळविणे तसेच विभागीय उपविभागीय कार्यालयातील विविध नोंदीवरुन पुर्वी मंजूर झालेली काही कामे करण्यात आली आहे काय ते तपासून ही माहिती अपिलार्थीस द्यावयाची होती. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागविली असल्यामुळे त्यांनी माहिती वेळोवेळी तयार करुन ठेवली होती. परंतु अपिलार्थी सदर माहिती हस्तगत करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाही उलट त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी देखील माहिती तयार असूनही अपिलार्थीने ती त्यावेळी प्रत्यक्षतः न स्विकारता कार्यालयात येऊन प्रत्यक्ष घेऊन जाईल असे सांगितले आणि अंतीमतः ते दिनांक २०-०२-२००७ रोजी

कार्यालयात हजर झाले व त्या दिवशी त्यांनी माहिती स्विकारली. या प्रकरणी त्यांचा अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा उद्देश नव्हता. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी महावीर चौक ते क्रांती चौक हे औरंगाबाद-जालना रस्त्याचे काम त्यांच्या अखत्यारित नसतांना व त्याची पूर्ण कल्पना अपिलार्थीस असून देखील त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागविली आहे. अपिलार्थी हे सार्वजनिक बांधकाम खात्याचे शाखा अभियंता असून सदर माहिती देण्यासाठी किती प्रयत्न करावे लागतात याची कल्पना आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार एकाच प्रकारच्या माहितीसाठी अपील करत असतात. त्यांना एकदा माहिती दिल्यानंतर त्यांचे समाधान न होता ते प्रत्येक वेळी अपिलामध्ये अतिरिक्त मुद्दे उपस्थित करतात.

वरील घटनाक्रम, सार्वजनिक बांधकाम खात्यांच्या अधिका-यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येते की, अपिलार्थीने या ठिकाणी मुळात मागितलेल्या माहितीची व्याप्ती काहीशी मोठी असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्याचे काम जिकीरीचे होते. अपिलार्थीस त्यांनी विचारलेली माहिती देण्यासाठी त्यांना त्यांच्या अधिपत्याखालील वेगवेगळ्या कर्मचा-यांचे व अधिका-यांचे सहाय्य घेणे जरुरीचे होते. अपिलार्थीने माहिती मुळात व्यक्तिशः मागितली होती. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी ती वेळेत तयार करुन ठेवली होती. तथापि अपिलार्थी ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीच्या दिवशी देखील ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्यासोबत होती परंतु अपिलार्थीने ती न स्विकारता कार्यालयात येऊन प्रत्यक्ष घेऊन जातो असे जन माहिती

अधिकारी यांना सांगितले व अंतीमतः ती दिनांक २०-०२-२००७ रोजी स्विकारली. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना मिळालेली माहिती अपूर्ण असल्याचे नमूद केले आहे. परंतु त्यांना पूर्ण माहिती मिळाली नाही, की त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण वाटते याचे समर्थन करण्यास अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी वर केलेल्या युक्तिवादाचे समर्थन आयोगाकडे दाखल केलेल्या एका शपथपत्राव्दारे केले असल्याने त्यांच्या युक्तिवादाचे खंडण करण्यासाठी आज अपिलार्थी सुनावणीस उपस्थित नाहीत हे पाहता अपिलार्थीस आता संपूर्ण माहिती मिळाली असावी असे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २४-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शरच्चंद्र माधव पंडित, एन- ३, प्लॉट क्रमांक ७४, सिडको, औरंगाबाद.
२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८४७
निर्णय दिनांक-२४ जानेवारी, २००८.

१ श्रीमती. सुनिता विजय जनगावे : अपिलार्थी
व्दारा- सग्मेश किराणा,
इंदिरा नगर, अहमदपूर,
जि.लातूर.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विक्रीकर उपआयुक्त कार्यालय,
गांधी चौक, लातूर, जि.लातूर.

२. जनअपिलीय अधिकारी तथा :
अप्पर विक्रीकर आयुक्त, मुंबई
शहर क्षेत्र मुंबई, ९ वा मजला
विक्रीकर भवन माझगाव, मुंबई.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्रीमती सुनिता विजय जनगावे, यांचे प्रतिनिधी विजय जनगावे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी

तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त व्हॅट-१, लातूर, श्री. संजय बबन शिंदे (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अपर विक्रीकर आयुक्त मुंबई, श्री. अरुण गोपाळराव देशमुख (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये दिनांक- १३-०३-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले असून यामध्ये त्यांनी त्यांचा मुळ तक्रारअर्ज दिनांक- ०४-०२-२००६ चा संदर्भ, अपीलाचे कारण म्हणून दिले आहे. अपीलाच्या कथीत दिनांक- ०४-०२-२००६ च्या अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने सदर अर्ज ग्राहक संरक्षण मंच, लातूर यांच्याकडे केलेला आहे. ग्राहक संरक्षण मंच हे प्राधिकरण विक्रीकर विभागाच्या अखत्यारीत येत नाही, शिवाय ते जन माहिती अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीव्दारे घोषीत केलेले कोणतेही प्राधिकरण नसल्याने व अपिलार्थीने मुलतः माहिती मागतांना विक्रीकर विभागाच्या अधिपत्याखालील संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली नसल्यामूळे, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक-२४-०१-२००८

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक

प्रत

१. श्रीमती. सुनिता विजय जनगावे, व्दारा/- सग्मेश किराणा, इंदिरा नगर, अहमदपूर, जिल्हा- लातूर.
२. जन माहिती अधिकारी तथा विक्रीक्रर उपआयुक्त कार्यालय, गांधीचौक, लातूर,

जिल्हा-लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा अप्पर विक्रीकर आयुक्त, मुंबई शहरक्षेत्र मुंबई, ९ वा मजला विक्रीकर भवन माझगाव, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८४८
निर्णय दिनांक-२४ जानेवारी, २००८.

१ श्री.कदम नवनाथ मारोतराव, : अपिलार्थी
रा.वडवणा, पो.मरळक, ता.नांदेड,
जि.नांदेड.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक वडवणा खडकी
ग्रामपंचायत, ता.जि.नांदेड.

२. जनअपिलीय अधिकारी तथा :
गटविकास अधिकारी, पंचायत
समिती, नांदेड, जि.नांदेड.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.कदम नवनाथ मारोतराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हजर आहेत. तर जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक वडवणा खडकी ग्रामपंचायत (यापुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड (या पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- २२-०२-२००५ पासून ग्रामपंचायत वडवना खडकी यांना विकास कामासाठी प्राप्त झालेल्या निधी संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" दिनांक- २२-०२-२००५ पासून ग्रा.पं. वडवणा- खडकीला शासनाकडून विकासासाठी प्राप्त विकासनिधी किती ? त्यात सर्व मार्गाने मिळणारा निधी ? व तो कोणत्या कामावर खर्च केला आहे. त्या सर्व कामाच्या आढावा झालेले कामे व खर्च झालेला निधी. याचा दि. १४-१२-२००६ पर्यतचे सविस्तर माहिती द्यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियमा मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले असून त्यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थी यांच्या सदर अपीलअर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडे दिनांक- २०-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना ग्रामपंचायत स्तरावरुन प्राप्त होऊ शकते, त्यांनी ग्रामपंचायतीकडे अर्ज करुन त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी. या पत्राची प्रत त्यांनी संबंधीत ग्रामसेवकाला दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-१३-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- १४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वडवणाखडकी ग्रामपंचायतीस विकास कामासाठी प्राप्त झालेल्या निधी संदर्भात माहिती विचारली होती. यामध्ये त्यांना ग्रामपचपायतीस विकास कामासाठी प्राप्त झालेला एकूण निधी व त्यातील करण्यात आलेली कामे याची माहिती अपेक्षिली होती. तथापि जन माहिती

अधिकारी यांनी विहित मुदतीत त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १७-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपीलाची सुनावणी ठेवण्यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक- २०-०२-२००७ रोजी लेखी विनंती केली होती. परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक- २०-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये, जे त्यांना दिनांक- २८-०२-२००७ रोजी प्राप्त झाले, त्यांना जन माहिती अधिकारी वडवणा खडकी यांच्याकडून माहिती मिळविण्याचा सल्ला दिला.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामूळे, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे व याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यापोटी केलेल्या हजगर्जीपणाबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५०/- इतकी शास्ती लावून त्यांची चौकशी करण्यात यावी, असाही त्यांनी पुढे युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे युक्तीवाद करण्यास आयोगासमोर आज कोणीही उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक- १४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती एक वर्षाहून जास्तीचा कालावधी व्यपगत होवूनही त्यांना अपेक्षित माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस माहिती पुरविण्याप्रित्यर्थ त्यांच्या अपीलअर्जास कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही व अपीलाची सुनावणी घेतली नाही. अपिलार्थीच्या अपीलाची सुनावणी न घेवून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या कृतीव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा भंग करुन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वा वृती स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची व बेपर्वा वृतीची, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे त्यांना येथे सुचविण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. सुमारे वर्ष होवूनही जास्तीचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आजपावेतो कोणतीही सकारात्मक कार्यवाही केल्याचे देखिल आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देवून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वा वृती सिध्द करुन स्वतःला माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतूदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी (संबंधीत ग्रामसेवक, वडवणाखडकी ग्रामपंचायत) यांनी अपिलार्थीस त्यांनी दिनांक- १४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती न दिल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी २५०/- रुपये या प्रमाणे एकूण २५,०००/- रुपये ( एकुण रुपये पंचवीस हजार ) इतकी शास्ती का लावण्यात येवू नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त न झाल्यास या प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन सदर आदेश अंतिम करण्यात येतील. त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक- १४-१२-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास कोणत्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद न देवून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वा वृती स्पष्ट केल्याने त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड यांनी प्रचलित सेवानियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्‌नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-१२-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१ अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना दिनांक- १४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक- १४-१२-२००६ रोजीच्या अर्जासंदर्भात आजपावेतो माहिती न दिल्याबद्दल प्रतिदिनी २५०/- रुपये असे एकूण रुपये २५,०००/- ( एकुण पंचवीस हजार रुपये) इतकी शास्ती का लावू नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वा वृती स्पष्ट केल्याने त्यांच्यावर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड यांनी प्रचलित सेवानियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तद्‌नंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

**औरंगाबाद**
**दिनांक-२४-०१-२००८**

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ - औरंगाबाद/नाशिक**

प्रत

१. श्री.कदम नवनाथ मारोतराव, मु.वडवणा पो.मरळक, ता.जि.नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, वडवणाखडकी ग्रामपंचायत, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड, जि.नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर-१४४

निर्णय दिनांक : २४-०१-२००८

१ श्री. शंकर मारोती इंगळे, : तक्रारदार
रा.आनंदनगर चौक, नांदेड.

**विरुध्द**

१ जन अपिलीय अधिकारी : उत्तरवादी
तथा, तालुका कृषी अधिकारी,
नांदेड, जि. नांदेड.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. शंकर मारोती इंगळे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, नांदेड श्री. सोनटक्के महादु किशन ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांचे दि. ८.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाचे असे निदर्शनास आणले आहे की, तालुका कृषी अधिकारी, नांदेड यांच्या कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने त्यांचेविरुध्द दि. २४.१.२००७ रोजीच्या आदेशान्वये लावण्यात आलेली रु.२५,०००/- इतक्या शास्तीची रक्कम अद्याप शासकीय कोषागारात भरलेली नाही. तक्रारदाराने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये कृषी उपसंचालक, जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय, नांदेड

यांचेकडे संबंधित जन माहिती अधिकारी यांना लावलेल्या शास्तीबाबत विचारणा केली असता त्यांना ही माहिती कृषी उप संचालकांच्या कार्यालयाकडून प्राप्त झाली आहे.

उत्तरवादी यांना, आयोगाने दि. २४.१.२००७ रोजी पारीत केलेल्या आदेशामधील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी रु. २५,०००/- इतकी शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात जमा केली आहे किंवा कसे, हे विचारले असता, त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. आयोगाने आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून शास्तीची रक्कम वसूल का केली नाही, असे विचारले असता त्यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांची या प्रकरणातील भूमिका जन अपिलीय अधिकारी असूनही त्यांचे वरिष्ठ त्यांना वैयक्तिक शास्तीची रक्कम भरण्याची सूचना करीत आहेत. त्यांच्या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे त्यांना उद्देशून दिलेल्या दि. ३१.५.२००७ व दि. ३.१२.२००७ रोजीचे पत्र दाखविले. याच नस्तीमध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी त्यांच्याकडील दि. २२.११.२००७ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे उत्तरवादी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व इतर जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेकडून दंडाची रक्कम वसूल करुन शासकीय कोषागारात भरण्याची सूचना देखील दिली असल्याचे दिसून येत आहे. तथापि, उत्तरवादी यांच्याकडून शासकीय कोषागारात शास्तीची रक्कम भरण्याबाबत आजतागायत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येत आहे.

राज्य माहिती आयोगाने त्यांचे दि. २४.१.२००७ रोजीच्या आदेशामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी यांचेवर रु. २५,०००/- इतकी शास्ती लावली होती. संबंधित जन माहिती अधिकारी हे उत्तरवादी यांच्या कार्यालयात कार्यरत असून त्यांचे वेतन उत्तरवादी यांच्या कार्यालयाकडून काढले जाते.वास्तविकतः राज्य माहिती आयोगाचे आदेशाप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी हयांचेकडून शास्तीची रक्कम वसूल करण्यासंदर्भात उत्तरवादी यांचेकडून कार्यवाही होणे अपेक्षित होते. तथापि, उत्तरवादी यांनी या प्रकरणात शास्तीची रक्कम वसूलीबाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. उत्तरवादी यांनी राज्य माहिती आयोगाच्या आदेशाचे पालन न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाइ स्पष्ट केली आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, सचिव, (कृषी) यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी, नांदेड यांचेवर, त्यांनी वरीलप्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही, हे आदेशित निर्गमित होताच तीन महिन्याचे आत करावी व तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगाकडे सादर करावा. तसेच उत्तरवादी

यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांनी शास्तीची रक्कम रु. २५,०००/- त्यांना माहे मार्च,२००८ मध्ये देय होणाऱ्या वेतनातून, आवश्यक वाटल्यास त्यापुढील महिन्याच्या वेतनातून वसूल करुन ती शासकीय कोषागारात भरण्यात यावी, असे करतांना वसूलीच्या हप्त्यांची संख्या पाच पेक्षा जास्त होणार नाही, याची त्यांनी दक्षता घ्यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. सचिव, (कृषी) यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी, नांदेड यांचेवर त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही, हे आदेशित निर्गमित होताच तीन महिन्याचे आत करावी व तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगाकडे सादर करावा.

३. उत्तरवादी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून शास्तीची रक्कम रु. २५,०००/- त्यांना माहे मार्च,२००८ मध्ये देय होणाऱ्या वेतनातून, आवश्यक वाटल्यास त्यापुढील महिन्याच्या वेतनातून जास्तीत जास्त एकूण ५ हप्त्यात वसूल करुन ती शासकीय कोषागारात भरावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २४-०१-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१ श्री. शंकर मारोती इंगळे, रा.आनंदनगर चौक, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव,(कृषी) विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८४९

निर्णय दिनांक २५-०१-२००८

१ श्री. कदम नवनाथ मारोतराव, : अपिलार्थी
मु. वडवणा, पोस्ट मरळक,
तालुका जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा ग्रामसेवक, वडवणा / खडकी ग्रामपंचायत,
तालुका जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कदम नवनाथ मारोतराव हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, वडवणा / खडकी ग्रामपंचायत श्री. उत्तम भिमराव नाईक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे प्रतिनिधी विस्तार

अधिकारी श्री. माधव नामदेवराव केंद्रे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या अनुपस्थितीची सखेद नोंद आयोगाने घेतली असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधीत गट विकास अधिकारी यांच्या आयोगाकडील सुनावणीकरिता गैरहजर राहून त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या बेजबाबदारपणाची नोंद यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मार्च २००५ ते ०४ जानेवारी २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ ग्रामसभा व मासिक सभा किती झाल्या आहेत, झाल्या असतील तर त्या सभांच्या तारखा कोणत्या आहेत. जर आजपर्यंत ग्रामसभा झाली नसेल तर जबाबदार व्यक्तीवर शिस्तभंगाची कारवाई झाली का ? तसेच ग्रामसभेचे लेखा परिक्षण केले असतील तर त्याबद्दलच्या माहिती झेरॉक्स प्रतिमध्ये द्याव्यात जो खर्च लागेल तो मी भरण्यास तयार राहीन. ”

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००७ रोजीच्या पत्राने अपिलार्थीने मागितलेली माहिती ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे व त्या स्तरावर ग्रामसेवक हे माहिती अधिकारी असल्याने अपिलार्थीने मागितलेली माहिती ग्रामसेवकाशी संपर्क साधून प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले आहे. त्याची प्रत त्यांनी संबंधीत ग्रामसेवकाला देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही कृती बरोबर नसून त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून, ते नोंदवून घेऊन त्यावर आपला अंतीम निर्णय पारीत करणे हे ''अपील ठरविणे'' या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीव्दारे त्यांच्याकडे जे अपील अर्ज प्राप्त होतील त्यावर त्यांनी अशा प्रकारे निर्णय घ्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद प्राप्त झाला नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी न घेताच त्यांना दिनांक २०-०२-२००७ च्या पत्राव्दारे ग्रामसेवकाकडे जाण्याचा सल्ला दिला व त्यांनी प्रयत्न करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. त्याचबरोबर त्यांना

माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती आयोगाने आदेशीत करावी असेही त्यांनी या अपील अर्जात पुढे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर सप्टेंबर २००७ पासून कार्यरत असून अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या अर्जाची त्यांना कोणतीही कल्पना नव्हती. मात्र आयोगाचे सुनावणीसाठीचे पत्र त्यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने काही माहिती मागविली आहे व त्यांना अपिलार्थीस माहिती द्यावयाची आहे हे प्रथमतः कळले. अपिलार्थीने मागितलेली माहिती ते आता ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे अपील अर्ज केल्यानंतर अपिलाची सुनावणी कशी घ्यावयाची याबद्दल त्यांना जाण नसल्याने अपिलाची सुनावणी घेतली नाही. परंतु संबंधीत ग्रामसेवकाला बोलावून अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये सुचविले. त्यांनी आयोगास पुढे अशीही माहिती दिली की, अपिलार्थीने ज्या कालावधीतील माहिती संबंधीत ग्रामसेवकाकडे मागितली आहे त्या कालावधीमध्ये ग्रामपंचायतीच्या कोणत्याही ग्रामसभा व मासिकसभा झालेल्या नाहीत. तद्वतच या ग्रामपंचायतच्या कार्यालयाचे लेखा परिक्षणही उपरोक्त कालावधीमध्ये झालेले नाही. संबंधीत ग्रामसेवकाकडून त्यांच्या कर्तव्यात कुचराई केल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी त्यांना सध्या निलंबीत ठेवले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्या अकार्यक्षेतेमुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. येथे संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणताही प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीने ज्या कालावधीतील माहिती मागविली आहे त्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारच्या मासिकसभा व ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये झालेल्या नाहीत. संबंधीत ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण या कालावधीत झालेले नाही असे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले आहे. याचबरोबर सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ७ दिवसाच्या आत देण्याचे तयारी दर्शविली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेला विलंब हा असमर्थनीय व अक्षम्य असा आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीस ही माहिती देण्यामध्ये त्यांना कोणतीही अडचण नव्हती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३०

दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ दर्शविलेल्या त्यांच्या नकारात्मक मानसिकतेबाबत व याव्दारे त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेवर, प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे, यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल तदनंतर १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती मिळण्यासंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपिल अर्जामध्ये मागणी केलेल्या नुकसानभरपाई संदर्भात, त्यानी आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केला नसल्याने, कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये

त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी त्यांचेवर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व तदनंतर आपला अनुपालन अहवाल १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक २५-०१-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कदम नवनाथ मारोतराव, मु. वडवणा, पोस्ट मरळक, तालुका जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, वडवणा / खडकी ग्रामपंचायत, तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. आर. के. कांबळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, वडवणा / खडकी ग्रामपंचायत, तालुका जिल्हा नांदेड सध्या ग्रामसेवक, पंचायत, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड)

४ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८५०

निर्णय दिनांक २५-०१-२००८

१ श्री. रणजीत नामदेव चव्हाण, : अपिलार्थी
मु. पो. पिंपरखेड (हिवरा), तालुका आष्टी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, आष्टी,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, आष्टी,
जिल्हा बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी, जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रणजीत नामदेव चव्हाण हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी

श्री. संजय दशरथराव साळवी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, आष्टी श्री. ज्ञानेश्वर बाबुराव व्यवहारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ०१-०१-२००६ ते ०६-१२-२००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. तालुका कृषि अधिकारी कार्यालयास वरिष्ठ कार्यालयाकडून सन ०१ जानेवारी २००६ ते आजपर्यंत कृषि विस्ताराच्या अनेकविध योजनांसाठी आलेला एकूण निधी, प्रत्यक्षात आलेला योजनांनिहाय खर्च याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

२. तालुका कृषि अधिकारी कार्यालयास वरिष्ठ कार्यालयाकडून सन ०१ जानेवारी २००६ ते आजपर्यंत मृदु संधारण कामासाठी कृषि विभागाकडून खास आलेला निधी किती, कोणत्या कामावर कोणत्या गावात खर्च करण्यात आला त्याचा तपशील देणे.

३. तालुका कृषि अधिकारी कार्यालयामार्फत रोजगार हमी योजने अंतर्गत किंवा खात्याअंतर्गत केलेल्या कामातून ५० टक्के रक्कम कोणत्या अधिका-यास कशा पध्दतीने अलिखित वाटप करण्यात येते याची माहिती देणे.

४. तालुका कृषि अधिकारी यांचा ०१ जानेवारी २००६ ते आजपर्यंत दौरा कार्यक्रम, शेतक-यांच्या भेटी, गावांच्या भेटी, कार्यक्रमावर झालेला खर्च, जीपच्या लॉगबुकच्या प्रती देणे.

५. वरिल माहिती स्वच्छ अक्षरात लेखी स्वरुपात देण्यात यावी, तसेच वरिल माहिती प्रत्यक्ष कार्यालयात येऊन पाहण्यासाठी तारीख व वेळ देणे."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जाच्या संदर्भाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती त्यांच्याकडून दिनांक ०२-०१-२००७ रोजी कार्यालयीन वेळेत येऊन माहिती पाहण्यास हरकत नसल्याचे कळविले. अपिलार्थीने मागितलेली माहिती अंदाजे १२५ पृष्ठांची असल्याने अपिलार्थीस ही माहिती पाहून तदनंतर त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यातून घेणे सुलभ होण्याच्या दृष्टीने अपिलार्थीस असे कळविले होते असे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात उपस्थित न राहता अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीने प्रथम अपील उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे केले होते. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचा सदर अपील अर्ज तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे पाठविला. सदर अपील अर्जावर तालुका कृषि अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सुनावणी न घेण्याची कारणे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांना आयोगासमोर सांगता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०३-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची विनामूल्य मागणी करुन जन

माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी, आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांनी त्यांचे कार्यालयात पाहण्यासाठी तयार ठेवली होती व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-१२-२००६ रोजी सदर माहिती दिनांक ०२-०१-२००७ रोजी पाहून जाण्याचे कळविले होते. सदर माहिती जास्त पृष्ठाची असल्याने अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे हे त्यांना माहिती नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पाहण्यासाठी तयार करुन ठेवली होती. अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जामध्ये त्यांनी मागितलेली माहिती प्रत्यक्ष कार्यालयात येऊन पाहण्यासाठी तारीख व वेळ देण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती. अपिलार्थीने केलेल्या विनंतीनुसार त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात हजर राहण्याकरिता उपस्थित राहण्याकरिता पत्र पाठविले असून या संदर्भातील त्यांनी त्यांचे कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स व तिकिटांच्या हिशोबांची झेराक्स प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-१२-२००६ रोजी यथायोग्यरित्या प्रतिसाद दिल्याचे सिध्द होते.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे माहितीसाठी त्यांच्या कार्यालयाकडे वारंवार अर्ज करीत असतात. एका प्रकरणी आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे त्यांना व्यक्तिशः माहिती देण्यासाठी तयार ठेवली होती. त्याप्रमाणे त्यांनी

अपिलार्थीस कळविले देखील होते. तथापि अपिलार्थी ही माहिती घेऊन जाण्यासाठी कार्यालयामध्ये कधीही उपस्थित राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सर्वसाधारण व मोघम स्वरुपाची असून मागितलेल्या माहितीमध्ये -- सविस्तर माहिती देण्यात यावी, तपशील द्यावा -- अशा स्वरुपाची मागणी केली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ चे अवलोकन करता अपिलार्थीस खरोखरच माहिती हवी आहे किंवा कसे याचा संभ्रम अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक ३ वरुन होतो. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ मध्ये, रोहयो अंतर्गत किंवा खात्यांतर्गत केलेल्या कामाची ५० टक्के रक्कम कोणत्या अधिका-यांना अलिखीत वाटप करता येते याची माहिती विचारली आहे. जर अलिखित पध्दतीतील माहिती विचारली असेल तर तशी माहिती मिळणारच नाही हे उघड आहे. असे असतांना देखील अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागण्याचा उद्देश व्यापक जनहित साधण्याचा निश्चित नसावा हे सिध्द होते. जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही त्यांचे कार्यालयात अपिलार्थीने हजर न राहता प्रथम अपील करण्याच्या त्यांच्या कृतीवरुन अपिलार्थीस, त्यांनी विचारलेली माहिती, त्यांना खरोखरच हवी होती किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संभ्रम निर्माण करते. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये म्हटल्याप्रमाणे आयोगाने आदेशीत करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दुस-या एका प्रकरणात माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता हजर राहिले नाहीत.आज देखील त्यांची आयोगासमोर अनुपस्थिती पाहता, त्यांना माहिती मिळविण्यामध्ये फारसे स्वारस्य नसावे असे अनुमान काढण्यास भरपूर वाव दिसतो. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे त्यांना माहिती

उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिका-यांने वेळ देऊनही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यायात अनुपस्थित राहणे, आयोगाच्या सुनावणीस अनुपस्थित राहणे अशा प्रकारच्या त्यांच्या कार्यपध्दतीवरुन अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. त्याचबरोबर या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी मुद्दाम असद्हेतुपुर्वक टाळाटाळ करणे असा प्रकार कोणत्याही प्रकारे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

सबब, अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

प्रसंगावशात या प्रकरणात आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक ०८-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झाला असतांना देखील त्यांनी अपिलार्थीच्या अपिलावर कोणतीही सुनावणी न घेऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) च्या तरतुदींचा भंग करुन त्याव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. आयुक्त (कृषि) यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कार्यपध्दतीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक २५-०१-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रणजीत नामदेव चव्हाण, मु. पो. पिंपरखेड (हिवरा), तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८५२

निर्णय दिनांक २५-०१-२००८

१ श्री. फय्याज अहमद, : अपिलार्थी
१७२, एसआरटी, रंगीन दरवाज्याजवळ, लेबर
कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्राचार्य, सर सय्यद महाविद्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा सह संचालक,
उच्च शिक्षण, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप प्राचार्य, सर सय्यद महाविद्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. फय्याज अहमद (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, सर सय्यद महाविद्यालय श्री. सय्यद अझरुद्दीन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन

अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण श्री. आर. व्ही. किर्दक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, २००६-०७ या कालावधीतील श्री. कबीर अहमद यांच्या प्राचार्यपदी नियुक्ती केल्याबाबतची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"1. Whether the executive committee of the society being an adhoc one, is authorizd to take such policy matter decisions ?

2. Whether the meeting in which the decision of the appointment of Mr. Kabir as the principal of the College was legal ? Bea Copy of resolution alongwith the number and the names of the signatoris of the meeting supplied.

3. The date, time, place and names alongwith their designation who were present during the interview of the said principal.

4. Whether each of them was Compitent to participate in such activity ? "

सदर माहिती अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, त्यामध्ये अपिलार्थीस त्यांनी माहिती देण्याचे नाकारल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहित नाकारतांना असे कारण दर्शविले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या संस्थेविरुध्द न्यायालयाकडे दावा दाखल केला असल्यामुळे त्यांना ही माहिती संस्थेकडून मिळणार नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या शिक्षण संस्थेतील व्यवस्थापन समितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशी माहिती पुरविली आहे की, अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधीत त्यांच्याकडे माहिती विचारली आहे त्या प्रकरणी धर्मादाय आयुक्त

यांच्याकडे अपिलार्थीने दाखल केलेल्या दाव्यासंदर्भात सह धर्मादाय आयुक्त यांनी जरी "जैसे थे" असे आदेश दिले असले तरी, सदर व्यवस्थापन समिती आस्तित्वात आहे. श्री. कबीर यांच्या नेमणुकीसंदर्भात अपिलार्थीने मागितलेली माहिती नाकारतांना जन माहिती अधिकारी यांनी असे कारण दिले आहे की, सह धर्मादाय आयुक्त यांच्यासमोर श्री. कबीर यांची सुनावणी चालू असल्याने ती माहिती त्यांना देता येत नाही, जर सह धर्मादाय आयुक्त यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी मागितली तर ते सह धर्मादाय आयुक्तांकडे सदर माहिती सादर करु शकतील.

अपिलार्थीस सदर पत्र रहेबर शिक्षण आणि कल्याण संस्थेच्या अध्यक्षांनी दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्रावर संस्थेच्या अध्यक्षांची सही केली असून माहितीचा अधिकार कायद्यातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी म्हणून या संस्थेने नेमणूक केलेली नसतांना देखील त्यांनी अपिलार्थीस हे पत्र दिल्याचे दिसते.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे संस्थेकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १८-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

या प्रकरणी विभागीय सह संचालक (उच्च शिक्षण) हे जन अपिलीय अधिकारी नसल्याने त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे सदर अपील संस्थेच्या प्राचार्याकडे पाठविल्याचे अपिलार्थीस कळविले. या पत्रामध्ये त्यांनी संस्थेच्या प्राचार्याना अपिलार्थीच्या तक्रारीचे निवारण होईल यादृष्टीने कारवाई करण्याची सूचना दिल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून

येते.  सुनावणी न घेण्याचे कारण उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीविषयी न्यायालयात सुनावणी चालू असल्याने त्यांनी या प्रकरणाची सुनावणी घेतली नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे.  या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविलेली माहिती चुकिची व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी या अपिलामध्ये कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या प्रकरणाची सुनावणी आता जिल्हा न्यायालयामध्ये चालू असून दिनांक ३०-०१-२००८ रोजी पुढील सुनावणीची तारीख ठेवण्यात आलेली आहे.  जिल्हा न्यायालयात अपिलार्थी यांनी त्यांचा दावा दाखल केला आहे.  जिल्हा न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणामध्ये अपिलार्थी हे एक पक्षकार असल्याने व अपिलार्थीने मागितलेली माहिती, न्यायालयाकडे प्रलंबीत असलेल्या विषयासंदर्भात असल्याने अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती दिल्यास कोर्टाचा अवमान होईल त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती श्री. कबीर यांच्या प्राचार्यपदी नेमणूक केल्यासंबधातील आहे.  अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये संस्थेची समिती ही तात्पुरती आहे किंवा कसे व ती निर्णय घेण्यासाठी प्राधिकृत / सक्षम आहे

किंवा कसे, श्री. कबीर यांची नेमणूक कायदेशीर आहे किंवा कसे, या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या ठरावाची प्रत, बैठकीतील उपस्थितांची नांवे, तारीख, वेळ व जागा, व कार्यकारी समितीतील प्रत्येक जण सदर निर्णय घेण्यास सक्षम होते किंवा कसे याची माहिती हवी असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली सदर माहिती केवळ अपिलार्थीने संस्थेविरुध्द जिल्हा न्यायालय, धर्मादाय सह आयुक्त यांच्याकडे दावा दाखल केला आहे म्हणून द्यावयाची नाही ही जन माहिती अधिकारी यांची भूमिका आयोगास स्विकारहार्य नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ च्या तरतुदीनुसार अपिलार्थी हे माहिती मागण्यास सक्षम आहेत. माहिती मागण्याचा त्यांचा हक्क आहे तर जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कारवाई करुन अपिलार्थीस माहिती देणे हे त्यांचे प्रथम कर्तव्य आहे. अपिलार्थीस कोणत्या परिस्थितीमध्ये माहिती प्राप्त होऊ शकणार नाही याचे विस्तृत विवेचन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ व ९ मध्ये केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी म्हटल्याप्रमाणे श्री. कबीर यांच्या प्राचार्यपदी नेमणुकीचे प्रकरण जरी न्यायालयात प्रलंबीत असले तरी अपिलार्थीने मागितलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची आहे असे सकृतदर्शनी दिसून येते. श्री. कबीर यांच्या नेमणुकीसंदर्भात कोणतेही कागदपत्र कोणासही देऊ नये अशा प्रकारचे आदेश न्यायालयाने दिलेले नाहीत हे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनीही कबूल केले आहे. श्री. कबीर यांची प्राचार्यपदी नेमणूक होऊन एक वर्षाहून जास्त कालावधी लोटला आहे. श्री. कबीर यांची प्राचार्यपदी नेमणूक झाल्याचे सर्वश्रुत आहे त्यामुळे त्यांच्या नेमणुकीचा विषय हा सार्वजनिक माहितीचा विषय होऊ शकतो. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती जर सह धर्मादाय आयुक्त यांनी मागितली तर ते देऊ शकतात अशा अर्थाची कबुलीही त्यांनी दिली आहे. सह धर्मादाय आयुक्त हे शासनाचे सार्वजनिक प्राधिकरण आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५

मधील कलम २ (F) अन्वये " सार्वजनिक प्राधिकरणाला जी खाजगी निकायाकडून प्राप्त होऊ होऊ शकेल अशी माहिती " याचा समावेश होतो. हे पाहता अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस पुरविल्याने कोर्टाचा अवमान होण्याची शक्यता दिसत नाही.

जन माहिती अधिकारी यांना सुनावणीमध्ये अपिलार्थीस माहिती दिल्याने कोर्टाचा अवमान कसा होईल हे विचारले असता सदर वाद न्यायालयामध्ये प्रलंबीत असल्याने कोर्टाचा अवमान होईल असे त्यांनी सांगितले. केवळ न्यायालयात वाद प्रलंबीत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी सार्वजनिक स्वरुपाची माहिती अपिलार्थीस दिल्यास कोर्टाचा अवमान होईल असे आयोगास सकृतदर्शनी आयोगास वाटत नाही कारण अपिलार्थीने मागितलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची आहे व ती कोणासही देऊ नये असे न्यायालयाचे कोणत्याही प्रकारचे आदेश नाहीत.

श्री. कबीर यांची नेमणूक करतांना कार्यकारी समितीने घेतलेल्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत जरी अपिलार्थीस दिली तरी अपिलार्थीस हव्या असलेल्या सर्व माहितीचा त्यामध्ये समावेश होऊ शकेल असे दिसून येते. सर्वसाधारणतः कोणत्याही बैठकीच्या इतिवृत्तामध्ये बैठकीचे स्थळ, उपस्थितांची यादी, बैठकीचा दिनांक व बैठकीमध्ये काय चर्चा झाली, निर्णय झाला इत्यादी बाबींचा समावेश असतो. अपिलार्थीने नेमके हीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली आहे. आज सुनावणीच्या वेळी देखील अपिलार्थीने आयोगासमोर बैठकीचे इतिवृत्त मिळाले तरी त्यांचे काम भागू शकेल असे कबूल केले आहे व संस्थेच्या घटनेच्या विषयाशी संबंधीत बाबी संस्थे-कडे मागितल्या आहेत, याची प्रत जर अपिलार्थीस दिली तर अपिलार्थी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर त्यामध्ये शोधू शकतील.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच त्यांना ३ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २५-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. फय्याज अहमद, १७२, एसआरटी, रंगीन दरवाज्याजवळ, लेबर कॉलनी, औरंगाबाद.

२ उप प्राचार्य, सर सय्यद महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८६०
निर्णय दिनांक-२५ जानेवारी, २००८.

१ श्री.अनिल अदिनाथ मुके, : अपिलार्थी
व्दारा-डॉ. सरदार खान यांचे घर, समर्थनगर,
उस्मानाबाद-४१३५०१

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद.

२. जनअपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग उस्मानाबाद.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अनिल अदिनाथ मुके (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद, श्री.संतोष गजानन शेलार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद, श्री.चंद्रशेखर प्रभाकर जोशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-१२-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- ११-०८-२००४ ते ३१-०३-२००५ या कालावधीतील कामे वाटप व निविदा संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

‘‘१) शासकिय जी.आर.प्रमाणे ३४ टक्के सुशिक्षित अभियंता, ३४ टक्के मजूर सहकारी संस्था व ३४ टक्के ओपन टेंडर दिलेल्या प्रत्येक कामाची नांवे मंजुर रकमेसह लेखी देण्यात यावी.

२) महाराष्ट्र शासनाकडून बजेटनुसार मंजूर झालेल्या कामांची यादी देण्यात यावी.’’

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २७-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस, त्यांना माहिती पुरविण्याप्रित्यर्थ लागणारे शुल्क रुपये २९०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यात येणारी माहिती, माहितीच्या पृष्ठांची संख्या व माहिती देण्याचा प्रतिपृष्ठ दराचा उल्लेख नाही. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २६-१०-२००६ पूर्वी आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांना सूचित केले आहे. अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क भरण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी विशिष्ट अशी मुदत

घालण्याची आवश्यकता नाही. जन माहिती अधिकारी यांना सदर पत्र त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत पाठविले होते. शिपाई सदर पत्र अपिलार्थीस देण्याकरिता दिनांक- २७-०९-२००६ रोजी दुपारी १२.३० ते ४.०० या कालावधीमध्ये अपिलार्थी यांच्या घरी गेले होते. तथापि अपिलार्थीस, त्यांचे घर बंद असल्यामूळे हे पत्र अपिलार्थीच्या स्वाधीन करता आले नाही, असे संबंधीत शिपाई श्री. एस.टी. परसे यांनी जन माहिती अधिकारी यांना लिहून दिलेले पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केले. श्री.एस.टी.परसे या शिपायाने हा जबाब जन माहिती अधिकारी यांना दिनाक- २०-१०-२००६ रोजी लिहून दिल्याचे दिसून येते. जर शिपायास दिनांक- २७-०९-२००६ रोजी अपिलार्थी त्यांच्या घरी सापडले नाही तर त्यांनी हा जबाब २४ दिवस इतक्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांना का लिहून दिला, असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांनी असे सांगितले की, दिनाक- १८-१०-२००६ रोजी अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने अशाच मजकूराचे दुसरे पत्र पाठविले असता, सदर पत्र देखिल दिनांक- २०-१०-२००६ रोजी त्यांच्याकडे अपिलार्थीस न पोंहचताच परत आल्याने, त्यांनी शिपायाची जबानी त्या दिवशी लिहून घेतली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १६-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, त्यांच्याकडील दिनांक २०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये सदर अपीलावर निर्णय दिला आहे. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस मोफत, विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून जन अपिलीय अधिका-याने आदेश देऊनही त्यांना प्राप्त झाली नसून सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याचे दुष्ट हेतूने टाळले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिलेला निर्णय एकतर्फी स्वरुपाचा असून सदर कथीत सुनावणी करिता त्यांना बोलाविण्यात आले नव्हते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी एकत्र बसून सदर निर्णय दिला आहे. अधिक्षक अभियंता हे जन अपिलीय अधिकारी असल्याने, अपीलाचा निर्णय त्यांनी त्यांच्या सहीने पारीत करणे आवश्यक आहे. तथापि या प्रकरणी आदेशावर अधिक्षक अभियंता यांनी सही न करता त्यांचे सहायक अधिक्षक अभियंता, श्री.चांडक यांनी या आदेशावर सही केली आहे, हे नियमबाहय आहे. अधिक्षक अभियंता यांना अंधारात ठेवून तत्कालीन सहायक अधिक्षक अभियंता यांनी हा निर्णय दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या घरी दिनांक २७-०९-२००६ रोजीचे पत्र घेवून शिपाई पाठविला होता, हे खोटे आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्याबद्दल त्यांनी संबंधीत अधिक्षक अभियंता यांनी दिनांक- २२-१२-२००६ रोजी एक पत्र देखील दिले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देवूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली नाही. तद्‌नंतर त्यांना ती दिनांक- २०-०९-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे व्यक्तीशः उपलब्ध झाली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांनी प्रथम

दिनांक- २७-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला होता. तथापि अपिलार्थी हे घरी नसल्यामूळे शिपाई सदर पत्र कार्यालयात परत घेवून आले. तद्नंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक-२०-१२-२००६ रोजी पारीत केलेल्या सुनावणीच्या आदेशाप्रमाणे त्यांनी दिनांक- १२-०३-२००७ रोजी अपिलार्थीस परत माहिती हस्तगत करुन घेण्यासंबंधीचे पत्र लिहीले. जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती तयार होती तर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २०-१२-२००६ रोजी निर्णय दिल्यानंतर ती अपिलार्थीस तात्काळ का पुरविण्यात आली नाही व तयार माहिती घेवून जाण्यासाठी अपिलार्थीस दिनांक- १२-०३-२००७ रोजी म्हणजे सुमारे पावणेतीन महिने इतका विलंब का लागला, असे आयोगाने विचारले असता, यापूर्वीच अपिलार्थीस माहिती घेवून जाण्याकरिता कळविले असल्यामूळे, अपिलार्थीस परत स्मरणपत्र पाठविण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही, असे त्यांनी सांगितले. तद्नंतर अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात दिनांक- २०-०९-२००७ रोजी हजर झाल्यानंतर एका साक्षीदाराच्या उपस्थितीत अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्यात आली.

वरील घटनाक्रम, दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त होवू शकले नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत पत्र पाठविल्याप्रित्यर्थ सबंधीत शिपायाचे दिनांक २०-१०-२००६ रोजीचे पत्र आयोगासमोर पुरावा म्हणून उपलब्ध आहे. तथापि सदर पत्रातील मजकूर हा एकतर्फी लिहीलेला असून सदर शिपाई अपिलार्थीच्या घरी खरोखरीच गेले होते किंवा कसे, हे कळण्यास मार्ग नाही. कारण या पत्रावर कोणत्याही साक्षीदाराच्या सहया नाहीत. जर अपिलार्थी त्यांच्या घरी उपस्थित नव्हते तर संबंधीत पत्र त्यांच्या घरावर डकविण्यास काही हरकत नव्हती व तसे केल्याचा

पंचनामा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला असता, तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरता आले असते. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी शिपायामार्फत अपिलार्थी यांच्याकडे पाठविले, हा त्यांचा युक्तीवाद पुराव्याअभावी आयोग मान्य करीत नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस पाठविलेले रजिस्टर पोस्टामार्फत दिनांक १८-१०-२००६ चे पत्र अपिलार्थीस ते घरी उपलब्ध नसल्यामूळे प्राप्त होवू शकले नाही. या बाबतचा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेला पुरावा सदर पाकीटाच्या शिक्यावरुन ग्राहय धरण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपीलअर्जावर सुनावणी न घेता एकतर्फी आदेश जारी केला, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. ते ग्राहय धरण्यात येत आहे. कारण जन अपिलीय अधिकारी यांनी या अपीलाची सुनावणी घेतांना अपिलार्थीस उपस्थित राहण्या संदर्भात कोणतेही पत्र लिहीले नसल्याचे आढळून आले आहे. परिणामी अपिलार्थीस त्यांची बाजू जन अपिलीय अधिकारी यांच्या समोर मांडता आली नाही. त्यामूळे अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी निर्णय घेतला, हा उपस्थित केलेला मुद्दा येथे सिध्द होत आहे. तव्दतच जन अपिलीय अधिकारी यांच्या वतीने पारीत करण्यात आलेल्या अपील निर्णयावरील आदेश, ज्या आदेशावर जन अपिलीय अधिकारी यांची स्वतःची सही नसल्याने अवैध ठरविण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी स्वतः सुनावणी घेतली नाही, असा संशय अपिलार्थीने सुनावणीमध्ये बोलून दाखविला. अपिलार्थीस सदर संशय घेण्यास भरपूर वाव असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कृती व्दारे स्पष्ट केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील ठरवितांना, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून ते नोंदवून आपला अंतिम निर्णय पारीत करणे, हे “अपील ठरविणे”, या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. तथापि संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती या प्रकरणी

केली नसल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. त्यांनी सुनावणी तर घेतली नाहीच परंतू अपील निर्णय देखील स्वतःच्या सहायकाच्या सहीने पारीत केला. यावरुन त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा स्पष्ट होतो, असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या वृतीची नोंद सचिव, (सार्वजनिक बांधकाम) यांनी यथायोग्यरित्या घेवून जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलअर्जावर अपीलाची सुनावणी घेणे व त्या संदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आदेश प्रस्तूत करणे, या करिता त्यांच्या स्तरावर हे आदेश निर्गमीत होताच १ महिन्याच्या आत मार्गदर्शक सूचना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय अधिका-याकरिता निर्गमित कराव्यात, असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- १८-१०-२००६ रोजी माहिती देण्यासंदर्भात प्रतिसाद दिला, असे वरील पुराव्यावरुन गृहीत धरण्यात येत असून त्यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येत आहे की, येथून पुढे त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमा व्दारे प्राप्त होणा-या माहितीसाठीच्या अर्जावर त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये सकारात्मक प्रतिसाद कसा देता येईल याकडे लक्ष पुरवावे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीस माहिती विहित मुदतीमध्ये देण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यव्याय नव्हता. कारण त्यांनी मागितलेली माहिती सहज सुलभ व जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहजपणे उपलब्ध होती.

या प्रकरणी अपिलार्थीस, अपेक्षित असलेली माहिती मिळाली आहे. अपिलार्थीस त्याने मागितलेल्या माहिती संदर्भात काही किरकोळ पत्रव्यवहार वगळता जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही सकारात्मक कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. याबद्दल त्यांना ताकीद देण्यात येत असून भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळावी, अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१.अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि.बा.बोरगे )**
**दिनांक- २५-०१-२००८** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ - औरंगाबाद**

प्रत

१. श्री.अनिल अदिनाथ मुके, व्दारा- डॉ.सरदार खान यांचे घर, समर्थनगर, उस्मानाबाद-४१३५०१.

२. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,उस्मानाबाद,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सार्वजनिक बांधकाम) मंत्रालय, मुंबई, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८६४
निर्णय दिनांक-२५ जानेवारी, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.मकबुल अब्दुल करीम शेख<br>खाजानगर, शम्स चौक, उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २. | जनअपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद. | | |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनाक- २५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मकबुल अब्दुल करीम शेख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद, यांचे प्रतिनिधी, श्री.मनोज गोपाळराव पाटील, लिपीक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जनअपिलीय अधिकारी तथा उपविभागीय

अधिकारी, उस्मानाबाद यांचे प्रतिनिधी, श्री. लक्ष्मण दशरथराव वाघमारे (यापुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक-२०-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी, २००५ ते सप्टेंबर, २००६ या कालावधीतील रोजगार हमी योजना, रॉकेल पुरवठा व इतर योजनेसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ रोहयोसाठी विविध खात्यांना दिलेल्या निधीची व धान्य वाटपाची माहिती देण्यात यावी. रोहयोचे वरिष्ठ कार्यालयाला पाठविलेल्या साप्ताहिक व मासिक अहवालाची प्रत देण्यात यावी. संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांध निराधार योजना, राष्ट्रीय कुटूंब अर्थसहाय्य योजना, संगायो, इंगायो, श्रावणबाळ, अन्नपुर्णा योजनेअंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त होणा-या (लाभार्थ्याची यादी कॉम्प्युटरमध्ये असेल तर सीडी मध्ये माहिती द्यावी.) सुशिक्षित बेरोजगारांना वाटप केलेल्या बेकार भत्याची दोन वर्षाची माहिती देण्यात यावी. तसेच बेकार भत्यासाठी प्रलंबीत प्रकरणांची वर्षनिहाय माहिती द्यावी.
>
> ऑगष्ट व सप्टेंबर ०६ या महिन्यामध्ये तालुक्यात रॉकेल वाटपासाठी काढलेल्या वाटप पत्राची झेरॉक्स प्रत द्यावी. जानेवारी २००५ पासून सप्टेंबर २००६ पर्यंत जिल्हा पुरवठा विभागास पाठविलेल्या रॉकेलसंदभातील प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. रॉकेल विक्रेत्यांच्या तपासणीचे अहवाल व दिलेल्या नोटीसांच्या झेरॉक्सप्रती देण्यात याव्या. साखर वाटपाची व गहू, तांदूळ धान्य वाटपाची योजनानिहाय माहिती देण्यात यावी. तालुका व शहर दक्षता पथकाच्या नियुक्तीची प्रत, वाणिज्यसाठी अकृषीक बिन शेती परवानगी दिलेल्या प्रकरणांची माहिती देण्यात

यावी. गोण खनिज व रेती परवान्याच्या प्रती देण्यात याव्यात. तेव्हा सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती व आवश्यक असेल तर सीडीमध्ये देण्यात यावी."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी हे दारिद्रय रेषेखालील असल्याचे त्यांनी आपल्या मूळ माहितीच्या अर्जात म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २०-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये तात्काळ प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती विविध कार्यासनाकडून संकलीत करण्याचे काम चालू असल्याचे व सदर कामास अवधी लागणार असल्याने संकलनाचे काम पूर्ण होताच माहिती हस्तगत करण्यासंदर्भात आपणास लेखी कळविण्यात येईल, असे कळविले. या नंतर त्यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक- २०-१०-२००६ रोजी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती तयार असल्याचे कळविले व माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी ७०५/- रुपये इतके शुल्क भरण्याचे अपिलार्थीस कळविले. तद्नंतर दिनांक- २३-११-२००६ रोजी अपिलार्थीस उर्वरीत माहिती तयार असल्याचे त्यांनी कळविले. तथापि मध्यंतरीच्या काळात विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनूसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०८-११-२००६ रोजी प्रथम अपील केले असून या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी या अपीलावर सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीच्या या अपीलअर्जा संदर्भात त्यांनी आपले आदेश दिनांक-१५-१२-२००६ रोजी पारीत केले असून त्यामध्ये अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थीस उर्वरीत माहिती विनाविलंब व

विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती व्यापक प्रमाणात असल्याचे त्यांनी या निर्णयामध्ये म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होऊन अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक-१६-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती दिल्याचे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपीलावर ४५ दिवसा नंतरही निर्णय दिला नसल्याचे नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे उपस्थित असलेल्या प्रतिनिधीने असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी याच्या तर्फे टप्याटप्याने माहिती देण्यात आली असून प्रथमतः रॉकेल पुरवठा संदर्भात व त्यांच्या कार्यालयातील पुरवठा शाखे संदर्भात अपिलार्थीने विचारलेली माहिती त्यांना दिनांक- ०७-१२-२००७ रोजी प्रत्यक्षतः पुरविण्यात आली, ही माहिती ५६ पृष्ठांची होती. सुशिक्षीत बेरोजगार व रोजगार हमी योजने विषयी अपिलार्थीस दिनांक- २३-०२-२००७ रोजी २८७ पृष्ठांची माहिती विनामूल्य देण्यात आली. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे व्याप्ती मोठया प्रमाणावर असल्यामूळे व सदर माहिती वेगवेगळया कार्यासनाकडून प्राप्त करुन घ्यावयाची असल्यामूळे अपिलार्थीस माहिती देण्यास काहीसा विलंब लागला, परंतू या विलंबाची कल्पना त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दिली होती व याच मुदतीमध्ये त्यांनी बरीचशी माहिती तयारही करुन ठेवली होती.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तीवाद, वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील जवळ जवळ संपूर्ण

माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यातील बरीचशी माहिती ही मोघम स्वरुपाची असून त्यांनी  विशीष्ट अशा कोणत्याही कागदपत्राची मागणी केलेली नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुरुवातीपासून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने माहिती मागवितांना,  तीचे आकारमान किती असावे या बाबत  कोणतीही मर्यादा घालून दिलेली नाही. माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करणारा अर्जदार,  सुज्ञपणे व समंजस्यपणे व्यापक जनहिताची मागणी करेल, हे अधिनियम करतांना गृहीत  धरलेले आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने मोघम स्वरुपाची व वेगवेगळया विषयावरील त्यांच्या कार्यालयातील जवळ जवळ संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेली  आहे. अपिलार्थीने  मागितलेल्या माहितीची व्याप्ती व अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत पाहता व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दैनंदिन कार्यभार सांभाळून माहिती देण्याची क्षमता लक्षात घेता, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांना निश्चीतपणे काही मर्यादा (अनुदानाची अनुपलब्धता, अपुरा कर्मचारी वर्ग व पायाभत सोयींचा अभाव इ.) आहेत, हे येथे मान्य केले पाहिजे.  एवढे असूनही  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेगवेगळया टप्यामध्ये त्यांना अपेक्षित असलेली माहिती दिली आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे  व्दितीय अपील केल्यानंतर देखील अपिलार्थीस रोहयो विषयी २२७ पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता मुद्दामहून टाळाटाळ केली किंवा सदर उमाहिती असद्हेतूने दडवून ठेवल्याचे आयोगापुढे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कार्यवाहीचे कोणतेही  आदेश नाहीत. तथापि त्यांनी  येथून पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार दाखल झालेल्या प्रत्येक अर्जावर

अधिनियमाव्दारे  विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक दृष्टीकोन ठेवून कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत संपूर्ण माहिती  आता प्राप्त झाली असल्यामूळे त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

आज सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून पूर्णतः माहिती प्राप्त झाली असल्याचे अनुमान काढण्यास हरकत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व  जन माहिती अधिकारी यांची वर वर्णिलेल्या प्रमाणे क्षमता लक्षात घेता व त्यांनी अपिलार्थीस सुरवातीपासून दिलेला सकारात्मक प्रतिसाद पाहता, अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक- २५-०१-२००८**

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ - औरंगाबाद**

प्रत

१. श्री.मकबुल अब्दुल करीम शेख, राहणार- खाजानगर, शम्स चौक, उस्मानाबाद.
२. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार,उस्मानाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. जनअपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात  पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१४८

निर्णय दिनांक : २५-०१-२००८

१ श्री. संजय भाऊ कांबळे, : तक्रारदार
रा. अहमदपूर जि. लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा, कृषी अधिकारी, अहमदपूर,
जि. लातूर.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. संजय भाऊ कांबळे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, अहमदपूर श्री. खानापूरे चंद्रशेखर नागनाथप्पा ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्राररदार यांनी मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांना उद्देशून उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असतांना देखील उत्तरवादी यांनी त्यांना त्यांचे दि. ४.२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे विचारलेली माहिती पुरविली नाही व उत्तरवादी यांनी त्यांना माहिती मिळण्यापासून व त्यांचे या हक्कापासून वंचित ठेवले आहे.तक्रारदार यांनी माहिती अर्जासोबत पिवळी शिधापत्रिका जोडली आहे.

या संदर्भात तक्रारदार यांनी दि. १४.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले असतांनाही या अपील निर्णयासंदर्भात त्यांना संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचेकडून काहीही कळविले गेले नाही. थोडक्यात, उत्तरवादी यांचेकडून व त्यांचे जन अपिलीय अधिकारी यांचेकडून माहिती अधिकार अधिनियमाची पायमल्ली होत असल्याचे तक्रारदार यांनी आयोगाचे निदर्शनास आणले आहे. तक्रारदार यांनी सदर अर्ज मा. राज्यपाल यांना उद्देशून केलेला असून, त्याची एक प्रत राज्य माहिती आयोगास पाठविलेली आहे. तक्रारदाराने सदर अर्ज दि. २८.३.२००७ रोजी केलेला असून त्याची राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दि. ५.४.०७ रोजी नोंद झालेली आहे. उत्तरवादी यांनी आयोगासमोर असा मुद्दा उपस्थित केला आहे की, त्यांचेकडे माहिती मागणाऱ्या अर्जदार श्रीमती जयश्री तातेराव लामतुरे या असून त्यांचे वतीने तक्रारदार यांनी मा. राज्यपाल, म.रा. यांचेकडे तक्रार केलेली आहे. उत्तरवादी यांनी सुनावणीचे वेळी असा युक्तीवाद केला की, अर्जदार यांनी मागितलेली माहिती पुरविण्याप्रीत्यर्थ त्यांना एकूण रु. ४७०००/- इतका खर्च लागणार आहे व इतका निधी त्यांचेकडे उपलब्ध नाही. संबंधित अर्जदारांनी दोन वेगवेगळया अर्जाद्वारे उत्तरवादी यांचेकडून विस्तृत प्रमाणात माहिती मागितली आहे. जनसामान्यांना उत्तरवादी यांच्याकडून माहिती मिळवण्याचा हक्क आहे व मागितलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्याचे उत्तरवादी यांचे कर्तव्य असल्याचे आज सुनावणीमध्ये सांगण्यात आले. सबब उत्तरवादी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी अर्जदारास त्यांच्या कार्यालयात बोलावून त्यांनी विचारलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी, त्यापैकी आवश्यक तो भाग त्या काढून घेतील. जर त्यांना सर्वच माहिती आवश्यक असेल तर त्यांनी ती स्वतःचे कागद वापरुन उपलब्ध कागदपत्रांवरुन लिहून काढावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०१-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय भाऊ कांबळे, इंडिया एस.टी.डी. तहसील कार्यालयासमोर,अहमदपूर जि.

लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, अहमदपूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८६२

निर्णय दिनांक    ३०-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार,<br>मु. पो. निलेगाव, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा पशूधन विकास अधिकारी, पशू वैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, नळदुर्ग, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी,<br>जिल्हा परिषद,<br>उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा पशूधन विकास अधिकारी, पशू वैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, नळदुर्ग श्री. हेमंत पंडीतराव पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद श्री. सत्यवान सिद्राम भोसले (यापुढे त्यांना जन

अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्त पक्षकार श्री. राजेंद्र बिराजदार व इतर ५ हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०८-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, १९९५ ते २००५ या कालावधीतील नळदुर्ग तालुका तुळजापूर येथील पशू वैद्यकीय अधिका-यांनी दिलेल्या पोस्ट मार्टम रिपोर्टच्या नकले संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " खालील व्यक्तींच्या जनावरांचे मयत झालेले पी. एम. (P. M.) रिपोर्टचा अहवाल देण्यात यावा.
>
> (१) गजेंद्र काशीनाथ बिराजदार (२) बळीराम खंडेराव पाटील (३) सौ. सत्यशिला सिताराम जाधव (४) महाविर गुमत्यराव पाटील (५) शरद सिताराम जाधव (६) अशोक तुळशीराम. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही त्यामुळे अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्या कडे, दिनांक १५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश जारी केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक २४-०३-२००७ पर्यंत देण्याचे आदेश पारीत केले. या आदेशामध्ये विहित दिनांकास माहिती उपलब्ध करुन न दिल्यास त्याचे संपूर्ण दायित्व जन माहिती अधिकारी यांच्यावर राहील असा इशारा त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही माहिती न प्राप्त झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना अर्धवट व चुकिची माहिती दिली गेली असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यासाठी टाळाटाळ करतात असे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना, त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी ६ जनावरांपैकी ३ जनावरांच्या पोस्टमार्टम संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २२-०३-२००७ रोजी प्राप्त झाली असून सदर माहिती अर्धवट आहे. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती देण्याप्रीत्यर्थ लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी त्यांच्याकडे पोस्टमार्टम रजिस्टर उपलब्ध नव्हते. परंतु शोध घेतल्यानंतर पंचायत समिती तुळजापूर येथे ते आढळून आले व तदनंतर अपिलार्थीस दिनांक २२-०३-२००७ रोजी उपलब्ध माहिती दिली. त्यांनी दिलेली माहिती उपलब्ध अभिलेख्यावरुन दिली असून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील ६ जनावरांच्या शवविच्छेदन अहवालासंदर्भात ३ जनावरांचे शवविच्छेदन शासकीय दवाखान्यात केले असल्यामुळे ती माहिती त्यांना देण्यात आली आहे. जनावरांच्या बाबतीत खाजगी पशुवैद्यकांना देखिल शवविच्छेदनाचे अधिकार असल्याने उर्वरीत माहिती हे त्या खाजगी जनावरांचे शवविच्छेदन ज्या डॉक्टरांनी केले त्यांच्याकडे उपलब्ध असावी व त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध दस्तऐवजावरुन अपिलार्थीस त्यांच्याकडे असलेली माहिती दिलेली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, उर्वरीत ३ जनावरांचे शवविच्छेदन खाजगी डॉक्टरांनी केले असल्याची शक्यता लक्षात घेऊन व सदर अहवाल बॅकेकडे व विमा कंपनीकडे संबंधीत व्यक्तीने पाठविले असल्याची शक्यता असल्याने ते नळदुर्ग येथील संबंधीत बॅक व विमा कंपनी यांच्याशी पत्रव्यवहार करुन अपिलार्थीस उर्वरीत माहिती देण्याबाबत प्रयत्न करतील.

दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व वरील घटनाक्रम पाहता येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती साधी व सरळ असून सर्वसाधारण परिस्थितीमध्ये अपिलार्थीने दिनांक ०८-१२-२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर त्यांना दिनांक ०७-०१-२००७ पर्यत त्यांना सदर माहिती प्राप्त होणे अथवा त्यांच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांचा निर्णय प्राप्त होणे हे अधिनियमातील तरतुदीव्दारे अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, हे दिनांक २६-०९-२००४ पासून अर्धांगवायूमुळे आजारी होते व दिनांक २०-११-२००५ रोजी कामावर हजर झाले. ते ज्यावेळी कामावर हजर झाले त्यावेळी त्यांच्याकडून अनावधानाने पोस्ट मार्टम रजिस्टर संबंधितांकडून घ्यावयाचे राहून गेले. तदनंतर त्यांनी शोध घेतल्यानंतर सदर रजिस्टर पंचायत समिती तुळजापूर येथे आढळून आले व सदर रजिस्टर प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती दिनांक २२-०३-२००७ रोजी दिली. जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस उशीरा माहिती देण्यापोटीचा हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही कारण ते दिनांक २०-११-२००५ रोजी कामावर हजर झाले व अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक ०८-१२-२००६ रोजी माहिती मागविली. या एक वर्षाच्या कालावधीत त्यांना शवविच्छेदन रजिस्टरची आठवण देखील येऊ नये यावर आयोग विश्वास ठेवत नाही. कारण शवविच्छेदन करुन त्यांच्या नोंदी ठेवणे हा संबंधित डॉक्टरांच्या दैनंदिन कार्याचा एक महत्वाचा भाग आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती

देण्याकरिता ७४ दिवसांचा असमर्थनीय विलंब लावल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीस निश्चितपणे पात्र होत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या या ७४ दिवसाच्या विलंबाबाबत, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये १८५०० /- (अक्षरी- रुपये आठरा हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " या लेखाशीर्षाखाली भरावी. सदर शास्तीची रक्कम, (अपिलार्थीने आयोगास केलेल्या विनंतीप्रमाणे) त्यांनी एकूण सहा हप्त्यामध्ये भरावी. यापैकी पहिला हप्ता २९ फेब्रुवारी २००८ रोजी भरावा व अंतीम हप्ता जुलै २००८ अखेर भरावा.

जन माहिती अधिकारी यांच्या शास्तीची रक्कम जिल्हा पशू संवर्धन अधिकारी यांनी त्यांच्या पगारातून दरमहा वसूल करावी व आपला अहवाल आयोगास दरमहा रक्कम वसूल होईपर्यत पाठवावा.

अपिलार्थीस उर्वरीत माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये संदर्भित केलेल्या बॅकेशी (उस्मानाबाद जनता सहकारी बॅक, उस्मानाबाद) व विमा कंपनीशी (युनायटेड इंन्शुरंन्स कंपनी, शाखा उस्मानाबाद) वैयक्तीक संपर्क साधून अपिलार्थीस उर्वरीत माहिती ३० दिवसाच्या आत प्राप्त करुन देण्याची व्यवस्था करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये संदर्भित केलेल्या बॅकेशी व इंन्शुरंन्स कंपनीशी वैयक्तीक संपर्क साधून अपिलार्थीस उर्वरीत माहिती ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये १८५०० /- (अक्षरी- रुपये आठरा हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

४. वरील क्रमांक ३ च्या आदेशाचे अनुपालन होईल असे जिल्हा पशू संवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद पहावे व आपला मासिक अहवाल यापुढे आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ३०-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, मु. पो. निलेगाव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा पशूधन विकास अधिकारी, पशू वैद्यकीय दवाखाना

श्रेणी-१, नळदुर्ग, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१४६

निर्णय दिनांक : ३०-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| १ वैद्य श्री. अ. वि. वाघचौरे,<br>रा.उस्मानाबाद | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन अपिलीय अधिकारी<br>तथा, अधीष्ठाता, शासकीय आयुर्वेद<br>महाविद्यालय,उस्मानाबाद | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार वैद्य श्री. अ. वि. वाघचौरे, (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,उस्मानाबाद डॉ. गणेश जयराम मुक्कावार ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदारांनी त्यांचे दि. ७.३.२००७ रोजीच्या अर्जान्वये उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद यांचेकडे दिनांक १९.८.२००६ रोजी केलेल्या अर्जानुसार मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांना खोटी व शासनाची दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली आहे.

सदर विषयासंदर्भात त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.१.२००८ रोजी द्वितीय अपील देखील सादर केले आहे. त्यांनी आपल्या तक्रार अर्जामध्ये उत्तरवादी हे त्यांना मानसिक त्रास देत असल्याबाबतची तक्रार केली आहे.

उत्तरवादी यांच्यातर्फे आज असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, तक्रारदार यांच्या दि. १९.८.२००६ रोजीच्या अर्जानुसार उद्देशून दिलेल्या उत्तरवादी यांचेकडून दि. ३०.८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली आहे व शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद येथे प्रशासकीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत तर संबंधित महाविद्यालयाचे अधिष्ठाता हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले आहेत.

तक्रारदार यांचेकडे त्यांनी कायद्याच्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपील केले होते काय, या संदर्भात चौकशी केली असता, तक्रारदार यांनी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या दि. ३०.८.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता यांचेकडे प्रथम अपील केलेले नाही. अपील करुन न्याय मिळण्याची त्यांना खात्री नसल्याने (कारण अधीष्ठाता हे अपिलीय अधिकारी आहेत) त्यांनी अधिष्ठाता यांचेकडे प्रथम अपील सादर केले नसून सरळ राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.३.२००७ रोजी तक्रार तसेच दि. ७.१.२००८ रोजी द्वितीय अपील सादर केले आहे.

तक्रारदाराने केलेल्या तक्रारीतील सर्व मुद्यांचा परामर्ष द्वितीय अपीलाचे प्रस्तावित सुनावणीत होणार असल्याने तक्रारदार यांचा आयोगाकडे केलेल्या कलम १८ खालील विचाराधीन अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३०-०१-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ वैद्य श्री. अ. वि. वाघचौरे, अधिव्याख्याता, शरीररचना विभाग, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा, अधीष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

तक्रार क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१५०
निर्णय दिनांक- ३० जानेवारी, २००८

श्री.गुलाम मोहमंद, प्लॉट नंबर- २२, मगरिबी कॉलनी, आर.टी.ओ.ऑफीस समोर, स्टेशन रोड, औरंगाबाद. — तक्रारदार

विरुध्द

१ जनमाहिती अधिकारी तथा महानगर पालिका, औरंगाबाद. : उत्तरवादी

## <u>निर्णय</u>

वरील तक्रार प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ३०-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री.गुलाम मोहंमद (यापुढे त्यांना तक्रारदार असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी तथा महानगर पालिका औरंगाबाद (यापुढे त्यांना उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये त्यांच्याकडील दिनांक- २५-०५-२००६ रोजीच्या त्यांच्या अर्जान्वये, अशी तक्रार केली आहे की, ते ७२ वर्षाचे वरीष्ठ नागरीक असून माहिती

अधिकार अधिनियमातंर्गत काही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते औरंगाबाद महानगर पालिकेच्या कार्यालयामध्ये गेले असता, त्यांचा अर्ज कोणीही स्वीकृत न करता त्यांना एका खात्याकडून दुस-या खात्याकडे पाठविण्यात आले. शेवटी त्यांनी त्यांचा अर्ज नोंदणीकृत टपालाव्दारे दिनांक- ०४-०६-२००६ रोजी महानगर पालिकेकडे पाठविला. सदर अर्ज औरंगाबाद महानगर पालिकेस दिनांक- १०-०४-२००६ रोजी प्राप्त झाला. सदर अर्ज प्राप्त होवूनही त्या अर्जासंदर्भात औरंगाबाद महानगर पालिकेकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. महानगर पालिकेच्या कर्मचा-यांची अशा प्रकारच्या कार्यशैलीमूळे माहिती अधिकार निष्फळ होत असल्या बाबतचे त्यांचे मत या अर्जामध्ये त्यांनी व्यक्त केले आहे. तक्रारदाराच्या सदर तक्रारीची नोंद राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दिनांक- १२-०६-२००६ रोजी झालेली आहे.

आज रोजी सुनावणीस तक्रारदार व उत्तरवादी यापैकी कोणीही हजर नाहीत. तथापि तक्रारदाराने या तक्रारीतील उपस्थित केलेला मुद्दा गांर्भीयपूर्वक विचारात घेण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे. तक्रारदाराने दिनांक १०-०४-२००६ रोजी औरंगाबाद महानगर पालिकेकडून काही माहिती मागविली होती. ती दिनांक २५-०५-२००६ पर्यंत आजपावेतो तद्नंतर देखील तक्रारदारास प्राप्त न होणे, ही बाब माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ उद्दीष्टास छेद देते. माहिती अधिकार अधिनियमा व्दारे मागितलेली माहिती विहित कालावधीत न देणे, हे महानगर पालिकेस देखील भुषणावह नाही. सबब आयुक्त, महानगर पालिका औरंगाबाद यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी महानगर पालिकेच्या प्रत्येक कार्यालयामध्ये माहिती अधिकार अधिनियमा व्दारे अर्ज प्राप्त करुन घेण्यासाठी ताबडतोब वेगळी व्यवस्था करावी व त्याची जाहीर प्रसिध्दी करावी. विषयाधीन प्रकरणातील तक्रारदार यांनी त्यांच्याकडे केलेल्या दिनांक- १०-०४-२००६ रोजीच्या अर्जावर त्यांनी हे

आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत निर्णय घेवून तो तक्रारदारास कळवावा व त्याची एक प्रत आयोगास सादर करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराचा तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. तक्रारदाराचा तक्रारअर्ज निकाली काढण्यात येत आहे.

२. तक्रारदार यांनी त्यांच्याकडे केलेल्या दिनांक- १०-०४-२००६ रोजीच्या अर्जावर महानगर पालिका आयुक्त, औरंगाबाद यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १० दिवसाच्या आत, निर्णय घेवून तो तक्रारदारास कळवावा व त्याची एक प्रत आयोगास सादर करावी.

**औरंगाबाद.**
**दिनांक- ३०-०१-२००८**

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ- औरंगाबाद**

**प्रत**

१. श्री.गुलाम मोहमद, प्लॉट नंबर-२२, मंगरिबी कॉलनी, आर.टी.ओ.ऑफीस समोर, स्टेशन रोड, औरंगाबाद.
२. माहिती अधिकारी, महानगर पालिका, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३. आयुक्त, महानगर पालिका, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८६९

निर्णय दिनांक ३०-०१-२००८

१ श्री. काशीनाथ हणमतंराव बिराजदार, : अपिलार्थी
रा. नेकनाळ, पो. तळेगाव (भो.), तालुका देवणी,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन देवणी,
तालुका देवणी, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. काशीनाथ हणमतंराव बिराजदार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा यांचे प्रतिनिधी पोलीस निरीक्षक, देवणी श्री. होनाजी भुजंगराव वरणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक यांचे प्रतिनिधी पोलीस उप अधीक्षक श्री. एस. बी. चाटे (यापुढे त्यांना

जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्त पक्षकार श्री. राजेंद्र मोतीराम कांबळे हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०५-१०-२००६ ते १७-१०-२००६ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

> " १. राजेंद्र मोतीराम कांबळे रा. भोपनी यांनी दिलेला अर्ज दिनांक ०५-१०-०६ व निकाली निघाले ॲक्ट्रासीटीसाठी केलेला अर्ज प्रत अर्ज.
>
> मुळ अर्जदाराचा अर्ज व अर्ज निकाली निघालेबाबतचे कागदपत्र प्रती."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

आयोगासमोर सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने पोलीस ठाण्याकडे केलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत उपलब्ध आहे. पोलीस निरीक्षक तथा सहाय्यक जन माहिती अधिकारी पोलीस स्टेशन देवणी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नाही. अपिलार्थीने त्यांच्या पोलीस स्टेशनमधील उपस्थित कॉन्स्टेबल कडे सदर अर्ज देऊन सदर अर्ज प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांची सही घेतलेली आहे. तथापि मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही.

अपिलार्थी यांच्या अर्जाची झेरॉक्स प्रत त्यांना प्रथमतः उपविभागीय पोलीस अधिकारी निलंगा यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाली. उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक ०७-०३-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे दिसून येते. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याबद्दल अपिलार्थीने दिलेली पोच पावतीची झेरॉक्स प्रत पोलीस उप निरीक्षक पोलीस स्टेशन देवणी यांनी आयोगासमोर सादर केली आहे. या प्रतीवरील सही आपलीच असल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केले आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे

आहे की, त्यांना प्राप्त झालेली सदर माहिती अपुरी असून राजेंद्र कांबळे यांनी त्यांच्या विरुध्द केलेल्या दिनांक १७-१०-२००६ रोजीच्या अर्जाच्या एकाच बाजुची झेरॉक्स त्यांना मिळाली असून अर्जाच्या दुस-या बाजुची झेरॉक्स प्रत, ज्यावर श्री. कांबळे यांची सही आहे, ती त्यांना प्राप्त झाली नाही.

मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०९-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी यांच्याकडून प्राप्त झालेल्या कागदपत्रांची छाननी केली असता त्यांना अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे मूळ अर्ज केला असल्याचे आढळल्याने त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला. तदनंतर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याची योग्य ती व्यवस्था केली व अपिलार्थीस दिनांक ०७-०३-२००७ रोजी माहिती दिली.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून आले नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना असे कळविले आहे की, “ आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दिनांक १४-१२-२००६ रोजीचे अर्जाव्दारे पोलीस निरीक्षक देवणी यांचेकडे वरील विषयाबाबतची माहिती मिळणेबाबतचा अर्ज दिलेला होता. परंतु पोलीस निरीक्षक देवणी हे माहिती अधिकारी नसून आपले उपविभागाचे माहिती अधिकारी म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी निलंगा हे आहेत. तरी आपला वरील संदर्भान्वयेचा अर्ज यासोबत उपविभागीय पोलीस अधिकारी निलंगा यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. तरी आपण वरील विषयाबाबतची माहिती मिळवणे कामी उपविभागीय पोलीस अधिकारी निलंगा

यांचेकडे संपर्क करावा व आपला वरील अपील अर्ज या कार्यालयातून निकाली काढण्यात आला आहे. ”

जन अपिलीय अधिकारी यांची वरील कृती बरोबर नसून त्यांनी अपिलार्थींचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना एकत्र बोलावून घेऊन या प्रकरणी त्यांचे म्हणणे ऐकून ते नोंदवून घेऊन त्यांच्या म्हणण्यावर आपला अंतीम निर्णय जारी करणे हे “अपील ठरविणे” या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. याची त्यांनी इतःपर नोंद घ्यावी असे त्यांना सुचविण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. सदर अपिलावर त्यांनी, त्यांना पोलीस निरीक्षक पोलीस ठाण्यामार्फत दिनांक ०७-०३-२००७ रोजी मिळालेली माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, राजेंद्र मोतीराम कांबळे यांची दिनांक १६-१०-२००६ ची जबाब प्रत त्यांना प्राप्त झाली नाही व त्याचबरोबर त्यांच्या दिनांक १७-१०-२००६ च्या प्रतीची दुस-या बाजुची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत प्राप्त झालेली माहिती या दृष्टीने अपुरी आहे. त्यांनी पुढे श्री. राजेंद्र कांबळे यांनी माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत सदर पोलीस स्टेशनवर केलेल्या दुस-या अर्जांबाबतही आपले अभिप्राय आयोगाच्या समोर व्यक्त केले.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने काही माहितीसाठी अर्ज केला आहे हे त्यांना उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या दिनांक ०४-०३-२००७ रोजी प्राप्त झालेल्या पत्राव्दारे प्रथम समजले. तदनंतर या

अर्जाची त्वरीत दखल घेऊन त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०३-२००७ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली आहे. सदर माहिती दिनांक ०७-०३-२००७ रोजी अपिलार्थीस प्राप्त झाल्याची अपिलार्थीने पोच दिली असून सदर माहितीबाबत त्यांची काहीही तक्रार नसल्याचे त्यांनी ती पोच देतांना अभिप्राय व्यक्त केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता येथे असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने चुकिच्या प्राधिकरणाकडे माहितीसाठीचा अर्ज केला. अपिलार्थीचा मूळ अर्ज आजतागायत पोलीस विभागाच्या अभिलेख्यावर उपलब्ध नाही. त्यांच्या मूळ अर्जाच्या झेराक्स प्रतीवरुन जन माहिती अधिकारी यांनी पोलीस निरीक्षक देवणी यांच्या मार्फत दिनांक ०७-०३-२००७ रोजी माहिती देण्याची व्यवस्था केली व त्याप्रमाणे अपिलार्थीस ती माहिती प्राप्त झाली. तथापि अपिलार्थी यांच्या मते श्री. राजेंद्र कांबळे यांचा दिनांक १६-०३-२००६ चा जबाब व दिनांक १७-०३-२००६ रोजीच्या अर्जाची दुसरी बाजू त्यांना प्राप्त होऊ शकली नाही. वरील दोन्ही कागदपत्रांच्या झेराक्स प्रती आयोगासमोर, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हस्तांतरीत केल्या. या दोनही प्रतीवरुन अर्जदाराने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी पूर्ण होत असल्याचे दिसते. आयोगाकडे केलेल्या अपिलामध्ये अपिलार्थीने श्री. राजेंद्र कांबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जावर आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत. त्यांनी मूळ माहितीची मागणी करतांना श्री. कांबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाखाली केलेल्या अर्जाचा कोणत्याही प्रकारचा संदर्भ केला नसल्यामुळे अपिलार्थीचा हा मुद्दा विचारात घेण्यात येत नाही. येथे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळाटाळ केल्याचे किंवा ती दडविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाही. तथापि त्यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांचे

अधिपत्यखालील प्रत्येक पोलीस स्टेशनवर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची माहिती दर्शविणारे फलक संबंधीत इमारतीच्या दर्शनी भागात लावावेत जेणेकरुन अर्ज व अपिल नेमके कोणाकडे करावयाचे याचे मार्गदर्शन जनसामान्यांना प्राप्त होऊ शकेल. अपिलार्थीस आता पूर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ३०-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. काशीनाथ हणमतंराव बिराजदार, रा. नेकनाळ, पो. तळेगाव (भो.), तालुका देवणी, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, निलंगा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८३५

निर्णय दिनांक ३१-०१-२००८

श्री. शंकर मारोती इंगळे, : अपिलार्थी

आनंदनगर चौक,

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा अवर सचिव, पदुम विभाग, मंत्रालय,

मुंबई – ३२

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप सचिव, पशू व दुग्धव्यवसाय

विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अवर सचिव, पदुम-६, कृषि, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

जन अपिलीय अधिकारी : उप सचिव, कृषि, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

<u>**निर्णय**</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शंकर मारोती इंगळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, कृषि, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, प्रणाली चिटणीस (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, पदुम-६, कृषि, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते दिनांक ०७-०६-२००६ या कालावधीतील श्री. दामोधर विठोबा खिल्लारे माजी महाव्यवस्थापक शासकीय दुध योजना, नांदेड यांनी केलेल्या कथित गैरकारभारासंबंधी करण्यात आलेल्या कारवाईबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१. दामोधर विठोबा खिल्लारे हे नांदेड येथे महाव्यवस्थापक असतांना त्यांनी तूपात व दूधात केलेल्या घोटाळ्याबाबत व अकार्यक्षमतेबाबत भाग्यलक्ष्मी महिला स. दूध संस्था लहान यांनी गेल्या ४ ते ५ वर्षापासून पाठपुरावा केला होता. त्या बाबतीत झालेल्या (शासनातर्फे) चौकशी रिपोर्टची प्रत सोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रकासह द्यावी.

२. या बाबतीत मा. आयुक्त दूग्धव्यवसाय विकास यांचेकडून आलेल्या अभिप्रायाची प्रत द्यावी.

३. खिल्लारे २००६ मध्ये निलंबीत झाले होते. त्यांचे निलंबनाची प्रत द्यावी.

४. त्यांना पुन्हा कामावर घेण्यात आले त्या आदेशाची प्रत द्यावी.

५. त्यांना मे २००६ मध्ये पुन्हा नोटीस देण्यात आली त्याची प्रत द्यावी.

६. त्यांनी केलेल्या दूधा तूपातील सुमारे रु. ३३ लाख घोटाळ्यापैकी रक्कम वसुलीसाठी शासन काय कारवाई करीत आहे ? किती रक्कम वसूल केली ?

७. पूणे येथे महाव्यवस्थापक असतांना त्यांनी कोणता गैरप्रकार केला त्याबाबत काय कारवाई झाली व कोणती कारवाई होणे बाकी आहे.

८. सध्या ते कोठे व कोणत्या पदावर शासनाच्या सेवेत आहेत.”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्यापोटीचे एकूण शुल्क रुपये ७३ /- हे त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर पत्र प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने दिनांक ०५-०७-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ७३ /- रुपये मनीऑर्डरने पाठविले. सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांना दिनांक १५-०७-२००६ रोजी प्राप्त झाले.

अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपिलामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, केवळ शास्ती लावू नये म्हणून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती

देण्यापोटीचे शुल्क पत्राव्दारे कळविले आहे. वास्तविकतः माहिती दिली नाही त्यामुळे त्यांच्या वर कलम २० प्रमाणे कारवाई करावी.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०५-०९-२००६ रोजी पाठविली असल्यामुळे अपील अर्जावर सुनावणी घेण्याची आवश्यकता नाही असे कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या सदर निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर निर्णय न घेतल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अपूर्ण माहिती दिली असल्यामुळे त्यांच्यावर कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तसेच त्यांना उर्वरीत माहिती त्वरीत व विनामूल्य प्राप्त करुन देण्यात यावी आणि माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे भरलेले शुल्क रुपये ७३ /- त्यांना परत देण्याचे आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना ५३ दिवस इतक्या विलंबाने माहिती प्राप्त झाली. त्यांनी माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी भरलेले शुल्क रुपये ७३ /- त्यांना परत मिळावेत. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ५३ दिवसाच्या विलंबाने माहिती दिल्याबाबत त्यांच्यावर कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई व्हावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्या या पदावर ०१ जानेवारी २००८ पासून कार्यरत आहेत. त्यांच्या विभागातंर्गत दूग्धव्यवसाय विकास, पशूसंवर्धन व मत्स्यव्यवसाय असे तीन विभागाशी संबंधीत विषय हाताळले जात होते. संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांना दुग्धव्यवसाय, पशूसंवर्धन व मत्स्यव्यवसाय या तीनही विभागाचे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले असल्याने, प्रमाणापेक्षा जास्त कार्यभार होता. सद्यस्थितीत आता त्यांच्याकडील कार्यभाराचे विभजन करुन प्रत्येक विभागाकरिता स्वतंत्र माहिती अधिकारी नेमले आहेत. अपिलार्थीने केलेल्या दिनांक १६-०८-२००६ रोजीच्या अपिलाची सुनावणी का होऊ शकली नाही असे विचारले असता त्यांनी त्यावेळी त्या कार्यरत नव्हत्या असे सांगितले.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जाची सुनावणी घेतली नाही. सुनावणी न घेण्याचे कारण, त्यांनी ०५-०९-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली असल्याचे दिले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती बरोबर नाही. अपिलार्थीचा दिनांक १६-०८-२००६ रोजीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) अन्वये सदर अपिलावर ३० दिवसाचे आत सुनावणी घेऊन आपले आदेश जारी करणे जरुरीचे होते. अपिलार्थीस माहिती दिली असल्यामुळे सुनावणी घेण्याचे कारण नाही असा उल्लेख त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक २८-१०-२००६ रोजीच्या पत्रामध्ये केला आहे. त्यांचे सदर वर्तन माहितीचा अधिकार अधिनियमाचे अवमान करणारे आहे असे आयोगाचे मत आहे. येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रथम अपिलावर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून ते नोंदवून त्यावर आपले आदेश विहित मुदतीत पारीत करावेत असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने दिनांक ०५-०७-२००६ रोजी मनीऑर्डरने रुपये ७३ /- इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे जमा केले. सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०७-२००६ रोजी प्राप्त झाले. सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क भरण्यासाठी लावलेला कालावधी लक्षात घेता दिनांक २१-०७-२००६ रोजी अगर तत्पूर्वी त्यांना प्राप्त होणे अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या पत्राव्दारे माहिती प्राप्त झाली आहे. म्हणजेच अपिलार्थीस सदर माहिती ४५ दिवस इतक्या विलंबाने प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही श्री. दामोधर विठोबा खिल्लारे यांनी ते नांदेड येथे महाव्यवस्थापक पदावर कार्यरत असतांना केलेल्या कथित गैरव्यवहारासंदर्भातील आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे आयोगास सादर करण्यात आलेल्या दिनांक २८ जानेवारी २००८ च्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या पत्रामध्ये ३, ४, ५, ७ व ८ या मुद्दयावरील माहिती दिलेली आहे. तथापि आज सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी मुद्दा क्रमांक ८ ची माहिती अद्याप प्राप्त झाली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. याचबरोबर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दा क्रमांक ७ ची माहिती अपूर्ण दिल्याचे म्हटले आहे. त्यावर त्यांच्या असे निदर्शनास आणून दिले गेले की, अपिलार्थीस दिलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अंशतः माहिती दिली गेली असून उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुढे नमूद केलेल्या कारणास्तव त्यांना दिलेली नाही. मुद्दा क्रमांक १, २ व ६ संदर्भातील माहिती अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (ङ) (छ) नुसार नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांनी

आयोगासमोर असे स्पष्ट केले की, सदर प्रकरणात त्यांच्या खात्यांतर्गत संबंधिताविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू असून अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ६ व अंशतः ७ संदर्भातील माहिती उघड केल्याने चौकशीच्या पुढील प्रक्रियेमध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो त्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात जी माहिती अपिलार्थी यांना सद्यःस्थितीत देय आहे ती माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. जन माहिती अधिकारी यांचा हा मुद्दा आयोग मान्य करत आहे. त्यांनी मुद्दा क्रमांक ८ ची माहिती अद्याप अपिलार्थीस दिली नाही व जी दिली ती विलंबाने दिली हा मुद्दा शेवटी विचारार्थ राहतो. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ४५ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याबद्दल व मुद्दा क्रमांक ८ ची माहिती न दिल्याचे निःसंशयपणे सिध्द झाल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीन्वये कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्यासंदर्भात त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण (४५ दिवसाकरिता) रुपये ११,२५० /- (अक्षरी- रुपये आकरा हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भातील माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस विहित कालावधीपेक्षा ४५ दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थी यांनी जमा

केलेले माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये ७३ /- अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस सदर शुल्क त्यांचे मुख्यालयी प्राप्त होईल अशी व्यवस्था जन माहिती अधिकारी यांनी करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ८ संदर्भातील माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहिती देण्यापोटी घेतलेले शुल्क रुपये ७३ /- त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसाचे आत, त्यांचे मुख्यालयी देण्याची व्यवस्था करावी.

४. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण (४५ दिवसाकरिता) रुपये ११,२५० /- (अक्षरी-रुपये आकरा हजार दोनशे पन्नास फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक ३१-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शंकर मारोती इंगळे, आनंदनगर चौक, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, पदुम-६, कृषि, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, कृषि, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८३७

निर्णय दिनांक ३१-०१-२००८

| | | |
|---|---|---|
| १ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर,<br>व्दारा- बुद्रुककर निवास, नविन माध्यमिक<br>शाळेमागे, विद्यानगर, परळी वैजनाथ,<br>तालुका परळी, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उप कुलसचिव, (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब<br>आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा संचालक, बी. सी. यु. डी.<br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ श्री. मंझा इश्वरसिंग रायभान

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, बी. सी. यु. डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे आस्थापना विषयक काही बाबीवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे मागितली होती.

"१. कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी वै. येथील इतिहास विषयाच्या प्रथम रोस्टरनुसार मान्य केलेली पूर्णवेळ / अर्धवेळ / तासीका तत्वावरील मान्य पदे व मान्यता प्रत.

२. सप्टें २००३ मध्ये इतिहास विषयाचे रोस्टरनुसार मान्य केलेली प्रवर्गानुसार पूर्णवेळ / अर्धवेळ / तासीका तत्वावरील मान्य पदे व मान्यता प्रत.

३. रोस्टर व प्रवर्गानुसार मान्य केलेले इतिहास विषयाचे पूर्णवेळचे पद तासीका तत्वावर व तासीकातला वरचे पद पूर्णवेळ करता येते का ? त्यासंबंधी विद्यापीठ व शासन नियमांची प्रत. "

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने विचारलेली माहिती सह संचालक (उच्च शिक्षण) यांच्या कक्षेतील बाब असल्याचे दिनांक ०९-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. तथापि जन माहिती अधिकारी यांचे पत्र अपिलार्थी यांना प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी या सुनावणीमध्ये सांगत आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याचे टाळले व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास माहिती देण्याचे आदेश न देता सुनावणी न घेता सत्य माहिती लपवून ठेवली असे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दिनांक २४-०४-२००६ च्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन आपला कोणताही निर्णय अपिलार्थीस त्यांच्या अपिलासंदर्भात कळविला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) च्या तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील ४५ दिवसाच्या आत ठरविणे भाग होते. याप्रमाणे सदर अपिलाच्या निर्णयची मुदत दिनांक ०८-०६-२००६ अशी होत आहे. तेव्हा अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे उशिरात उशिरा दिनांक ०८-०९-२००६ रोजी व्दितीय अपील अर्ज करणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये अभिप्रेत होते. तथापि उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील (दिनांक ३०-०९-२००६) विहित मुदतीत केले नसल्यामुळे सदर अपील कालबाह्य ठरत आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळून लावण्यात येत आहे.

प्रसंगवशात जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी आपले कर्तव्य पुरेशा जबाबदारीने व गांभीर्याने पार पाडले नसल्याचे या ठिकाणी सिध्द होत असल्याने त्यांच्या बेजबाबदार वर्तनाची व कार्यशैलीची नोंद कुलगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ३१-०१-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर, व्दारा- बुद्रुककर निवास, नविन माध्यमिक शाळेमागे, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, बी. सी. यु. डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१३५

निर्णय दिनांक : ३१-०१-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ॲड. सचिन जालिंदर तांबे, माऊलीनगर, पाटोदा जि. बीड | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा, तहसीलदार, पाटोदा,जि.बीड | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार ॲड.सचिन जालिंदर तांबे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पाटोदा श्री. भानुदास यशवंतराव गोरे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. ९.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, त्यांनी उत्तरवादी यांचेकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. तथापि, उत्तरवादी यांनी माहिती न देता ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यापोटीचे शूल्क रु. १२,५५,०००/- (अक्षरी रु. बारा लक्ष पंचावन्न हजार मात्र) इतक्यांचा भरणा त्यांच्या कार्यालयाकडे करण्याचे निर्देशित केले. त्यांनी मागितलेली माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याचेदेखील या पत्रामध्ये पुढे नमुद केले आहे. या तक्रारीमध्ये असे नमुद केले आहे की, उत्तरवादी यांनी सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना तक्रारदाराचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक कळविला, यामुळे सर्व संबंधित दुकानदारांनी तक्रारदाराच्या कुटुंबियांना व त्यांना धमकावण्यास सुरुवात केली व त्यांचेबरोबर

हाणामारी करण्याचा प्रयत्न केला. या तक्रार अर्जामध्ये तक्रारदाराने असे आणखीही नमुद केले आहे की, पाटोदा तालुक्यामध्ये ७० टक्के लोक मजूरीसाठी वर्षातून सहा महिने तालुक्याबाहेर असतात, त्यांचे नावे असलेले रॉकेल व धान्य उत्तरवादी यांच्या सहकार्याने काळया बाजारात विकले जात होते. अर्जाच्या अखेरीस तक्रारदार यांनी संबंधित उत्तरवादी यांची चौकशी करुन त्यांना तात्काळ सेवेतून निलंबित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडे मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडून विस्तृत व मोठया प्रमाणात माहिती मागविल्याचे दिसून येत आहे.दि. २३.८.२००७ रोजीच्या माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारदाराच्या सदर अर्जास उत्तरवादी यांचेकडून दि. ३०.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये विहित मुदतीत प्रतिसाद देण्यात आला. त्यामध्ये तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे नमुद करुन सदर माहिती तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांकडून व केरोसीन परवानाधारकांकडून संकलीत करावी लागणार असल्याची तक्रारदारास कल्पना दिलेली आहे. सदर माहिती संकलीत करण्यासाठी तीन ते चार महिन्याचा कालावधी लागणार असल्याचेही उत्तरवादी यांनी तक्रारदारास या पत्रामध्ये कळविले आहे. याच पत्रामध्ये उत्तरवादी यांनी तक्रारदारांनी मागितलेली माहिती एकूण रु. ६,२७,००० इतक्या पृष्ठांची होणार असल्याचे नमुद करुन प्रतिपृष्ठ रु. २/- याप्रमाणे तक्रारदारास रु. १२,५५,०००/- इतकी शुल्काची रक्कम त्यांचे कार्यालयात भरण्याची त्यांनी सूचना केली आहे. तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचे या पत्रावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे सरळ कलम १८ खाली तक्रार केली आहे. आज दि. ३१.१.२००८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये तक्रारदार यांच्या तक्रारीतील सर्व मुद्यांचा परामर्ष घेण्यात आला. तक्रारदार यांनी सदर तक्रार अर्जात नमुद केलेल्या मुद्यांच्या समर्थनार्थ उत्तरवादी यांनी असा युक्तीवाद केला आहे की, तक्रारदार यांनी मागितलेली माहिती १३१ स्वस्त धान्य दुकानदार व १२० केरोसीन परवानाधारकांकडून संकलीत करण्यासाठी साधारणतः तीन ते चार महिने लागण्याची शक्यता होती. कोणत्याही एका स्वस्त धान्य दुकानदाराकडील अभिलेख्यांची पृष्ठे सुमारे २५०० इतके होतात. एकूण २५१ केरोसीन परवानाधारकांकडील माहिती तपासून ती गोळा करण्यासाठी एकूण ६,२७,५०० पृष्ठे होतात. या प्रमाणे त्यांनी प्रतिपृष्ठ रु.२/- प्रमाणे तक्रारदार यांना रु. १२,५५,०००/- इतके शुल्क भरण्याची विनंती केली होती.

उत्तरवादी यांनी, तक्रारदाराने मागितलेली माहिती तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांकडून तसेच नायब तहसीलदार (पुरवठा) व रोहयो विभागाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी सर्व स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारकांना दि. ३०.८.२००७ रोजी पत्र लिहिले असून त्यांनी तक्रारदार यांनी मागितलेली माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. या पत्रामध्ये तक्रारदाराच्या नावाचा उल्लेख केला आहे परंतु त्यांचा दूरध्वनीक्रमांक दिल्याचे आढळून येत नाही.

तक्रारदार यांनी मागितलेली माहिती चार वर्षाची असून या कालावधीत पाटोदा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे मोठया प्रमाणावर रोहयो अंतर्गत कामे चालू होती. तसेच तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीच्या अर्जास उत्तरवादी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ आधारे विहित मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे. उत्तरवादीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी कोठेही हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याचे, आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांनी मागितलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्येबाबत व लागणाऱ्या खर्चाबाबत विहित मदतीत कल्पना दिली आहे

आता तक्रारदार यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांचेकडे तयार असून त्याप्रमाणे तक्रारदारास त्यांचेकडील दि. १८.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कल्पना देखिल दिलेली आहे. तक्रारदाराने केलेल्या तक्रारीत वरीलप्रमाणे कोणताही तथ्यांश नसल्याचे दिसून येत आहे.

तक्रारदार यांनी ज्या माहितीसाठी उत्तरवादी यांचेकडे अर्ज केला होता ती संपूर्ण माहिती आज रोजी उत्तरवादी यांचेकडे तयार आहे. त्यामुळे आवश्यक असल्यास तक्रारदारास हवी आवश्यक असलेली माहिती त्यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयात जाऊन तपासावी व त्यातील त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०१-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ ॲड. सचिन जालिंदर तांबे, माऊलीनगर, पाटोदा, जि.बीड

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पाटोदा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१५१

निर्णय दिनांक : ३१-०१-२००८

१ श्री. विजय कौतिक वानखेडे, : तक्रारदार
रा. देवपूर, ता. जि.धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी
तथा, तालुका कृषी अधिकारी, नांदगाव
जि. नाशिक.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०१-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. विजय कौतिक वानखेडे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी श्री. सुभाष केशव राऊत ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी उत्तरवादी यांचेकडून दि. २०.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये काही माहिती मागितली होती. सदर अर्ज त्यांनी उत्तरवादी यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता. तथापि उत्तरवादी यांनी त्या रजिस्टर्ड पोस्टाचे पाकीट स्वीकारुन पावती नष्ट केली व त्यांचे पत्र मिळाले नाही, असे दाखविले, याचप्रमाणे दि. ३.८.२००६ उपविभागीय कृषी अधिकारी मालेगाव यांचेकडे प्रथम अपील केले असता अपिलीय अधिकारी यांनी मूळ माहितीचा अर्ज उत्तरवादी यांना प्राप्त झाला नसल्याचे कारण दाखवून त्यांचे अपील फेटाळले. तक्रारदार यांनी या संदर्भात संबंधित पोस्ट ऑफीस कडे चौकशी केली असता, पोस्ट ऑफीस, धुळे यांनी तक्रारदाराचे रजिस्टर्ड पत्र दि. २०.६.२००६ रोजी दिलेल्या पत्त्यावर पोचविण्यात आले असल्याचे त्यांच्या

दि. ७.११.२००६ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. तक्रारदार यांनी आयोगास केलेल्या तक्रारीमध्ये, पुढे त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्यामुळे, संबंधितांविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार शास्ती लावण्याची व विभागीय चौकशी करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांनी दिनांक २०.६.२००६ रोजी उत्तरवादी यांचेकडे रोहयोअंतर्गत तालुक्यातील जलसंधारणाच्या कामांसंदर्भात काही माहिती मागितली होती. तक्रारदार यांनी सदर अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला होता. तक्रारदाराचा सदर अर्ज उत्तरवादी यांचेकडे पोहचविल्याचे संबंधित पोस्ट ऑफीसच्या अधिकाऱ्यांनी त्यांचेकडील दि. ७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. तक्रारदार यांना उत्तरवादी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ३.८.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपील केले होते. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता तक्रारदारास त्यांच्याकडील दि. १२.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा मूळ अर्ज उत्तरवादी यांचेकडे प्राप्त न झाल्याने, त्यांचा अपील अर्ज दप्तरी दाखल करुन त्यांचा अर्ज निकाली काढल्याचे कळविले आहे. आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांचा माहितीचा अर्ज उत्तरवादी यांचे कार्यालयात पोहचविल्याचे पोस्ट खात्याच्या दि. ७.११.२००६ रोजीच्या पत्रावरुन दिसत आहे. त्यामुळे तक्रारदाराच्या या दि. २०.६.२००६ च्या अर्जाद्वारे त्यांना हवी असलेली माहिती उत्तरवादी यांनी तक्रारदारास पुरविणे, माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अनिवार्य आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी तक्रारदारास त्यांचे म्हणणे मांडू देण्याची संधी न देता तक्रारदाराचे प्रथम अपील परस्पर निकाली काढले आहे. ही त्यांची कृती चुकीची आहे.

तक्रारदाराचा अपील अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर तक्रारदार व उत्तरवादी यांना तक्रारदाराच्या अर्जातील माहिती देण्यासंदर्भात निर्णय देण्यात आला असता तर, तक्रारदारास आयोगाकडे तक्रार करण्याचे काही कारण उरले नसते. तक्रारदार यांना, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती, आता उत्तरवादी हे विनामूल्य देण्यास तयार आहेत. सबब असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदार यांनी दि. २०.६.२००६ रोजी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. तद्वतच तक्रादाराचा मूळ अर्ज उत्तरवादी यांचे कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्याकडून गहाळ केला गेला असेल, त्या कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक

यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच २ महिन्याचे आत करुन त्यानंतर १ महिन्याचे आत अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांनी दि. २०.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य देण्यात यावी.

२. विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही, हे आदेश निर्गमित झाल्यापासून २ महिन्याचे आत करुन त्यानंतर १ महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०१-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजय कौतिक वानखेडे, ३३, फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी, देवपूर, धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, नांदगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात तक्रारदाराच्या दि. २०.६.२००६ च्या मूळ अर्जाच्या प्रतिसह रजिस्टर्ड पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी.

३ कृषी सहसंचालक, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती